अग्रलेख

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

* वर्ष ५४ * अंक २२५ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## खरीखरी...

# मणिपूरचा वणवा

मणिपूर राज्य भारतात आहे असे म्हणतात. पण मणिपूरात भारत आहे काय? हा यक्षप्रश्न आहे. मणिपूर मधील मैतेई आणि कुकी या दोन जमातींमधील हिंसक संघर्ष थांबण्याचे नाव घेत नाही. देशाचे पंतप्रधान या विषयावर मौन आहेत. गृहमंत्री निवडणुकीत व्यस्त होते. पण परिस्थिती अति गंभीर बनल्यामुळे गृहमंत्री महोदयांना अखेर महाराष्ट्रातील निवडणूक प्रचार बंद करून मणिपूरच्या विचार करावा लागला. ते तडक नागपूरहून 18 तारखेला दिल्ली दाखल झाले. त्या राज्याचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंग यांचे सरकार सपशेल कोसळलेले आहे. मुख्यमंत्र्याच्या घरात शेकडो बंडखोर घुसतात आणि जसे काही परकीय आक्रमण आले आहे, अशा थाटात मुख्यमंत्री वावरतात. मुख्यमंत्री आणि इतर अनेक मंत्र्यांच्या घरावर झालेले हल्ले म्हणजे त्या सरकारचे मोठेच अपयश आहे. मंत्र्यांच्या घरात बंकर उभारणे आणि मंत्र्यांनी आपला जीव वाचवण्यासाठी शस्त्र बाळगणे. यापेक्षा लाजिरवाणी दुसरी कोणती गोष्ट असेल. मणिपूर मधील भारतीय जनता पक्षाच्या सरकारचे इतके मोठे अपयश आहे की, त्यांचे स्वतःचे 19 आमदार गायब आहेत. एका पक्षाने आपल्या सात आमदारांसह सरकारचा पाठिंबा काढून घेतलेला आहे. तरीही अल्पमतात असल्यावरही मुख्यमंत्री म्हणून बिरेन सिंग इतके मुजोर आहेत की, त्यांनी आपला राजीनामाही दिलेला नाही. ते राजीनामा देत नाहीत म्हणून केंद्रातील सरकार एका शब्दानेही त्याबद्दल बोलण्यास तयार नाही. उलट मणिपूर मधील उद्रेक म्हणजे एक कारस्थान आहे. असे मानून हे सरकार निर्लज्जपणे आपला बचाव करीत आहे. आता किती लोकांचे जीव गेल्यावर या सरकारला जाग येईल. हे काही आम्हाला सांगता येणार नाही. पण आता सगळेच मुसळ केरात आहे. आता नव्याने उफाळून आलेला हिंसाचार केंद्रीय राखीव दलाच्या जीवावर उठलेला आहे. चकमकीत अनेक बंडखोर ठार झाले असले, तरी हिंसाचार थांबलेला नाही. बंडखोरांच्या नव्या नव्या तुकड्या मैदानात येत आहेत आणि राज्य सरकार म्हणा किंवा केंद्र सरकार म्हणा, डोळ्यावर पट्टी बांधून बसलेले आहे. थोडक्यात हे राज्य ज्या परिस्थितीत मधून जात आहे. ती अतिशय चिंताजनक आहे. काही दिवसांपूर्वी जी चकमक झाली होती. त्यावेळी अधिक काळजी घेतली असती. तर कुठेतरी हे प्रकार थांबले असते. पण दुदैर्वाने मणिपूरच्या जनतेला ज्या दिव्यातून जावे लागत आहे. ते निश्चितच भारतासारख्या देशाला जगात मान खाली घालण्यासाठी पुरेसे आहे. मणिपूर सारख्या या छोट्याशा राज्याची परिस्थिती हाताळता येत नसेल. तर निदान त्या नादान मुख्यमंत्र्याला तरी जबाबदार धरून त्याची खुर्ची खाली खेचायला पाहिजे. पण दुदैर्वाने कितीही भयानक घटना घडल्या. तरी तेथील राज्य शासन ढिम्म आहे आणि केंद्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून बसलेले आहे. दोन जमाती मधील वैमनस्य मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. त्यामुळेच राज्यातील जे कट्टरपंथी आहेत, त्यांना बळ मिळत आहे. कोणालाही परिस्थितीमध्ये सुधार करण्याची इच्छा दिसत नाही. ज्यांना जगता येईल त्यांनी जगावे. ज्यांना जगता येत नसेल त्यांनी मरावे, असे सरकारने ठरवलेले दिसते. एकूणच हे सर्व प्रकार कसे थांबतील. याची उच्च स्तरावरून चौकशी करून कठोरपणे पावले उचलल्या खेरीज दुसरा कोणताही पर्याय नाही. पण आपण अजूनही पक्षीय राजकारणात गुंग आहोत. हेच या देशाचे दुर्दैव आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तातडीने दिल्ली गाठली हे बरेच झाले. पण दिल्लीला अजूनही मणिपुरातील शांततेची किल्ली सापडलेली नाही. हे अधोरेखित करणे गरजेचे आहे. चाणक्य आणि चंद्रगुप्त यांनी गुप्त न होता, सुप्त पणातून बाहेर पडून मणिपूर वाचवावे आणि मणिपूरचे 'कंठमणी' व्हावे, हीच सगळ्या देशवासीयांची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## महाराष्ट्रात २६ तारखेनंतर

# राष्ट्रपती राजवट ?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. २१ :
राज्यात विधानसभेसाठी बुधवारी मतदान पार पडले. पोल पाहिले तर एका पक्षाला किंवा आघाडी-युतीला सत्ता स्थापन करता येईल असे दिसून येत नाही. यातच 26 नोव्हेंबर रोजी विधानसभेचा कार्यकाळ संपणार आहे. म्हणजे सत्ता स्थापनेचा दावा करण्यासाठी कोणत्याही पक्षाकडे अत्यंत कमी तासांचा कालावधी आहे. अन्यथा राज्यात राष्ट्रपती राजवट लागू शकते.

महाराष्ट्र विधानसभेचा निकाल 23 नोव्हेंबरला लागणार आहे आणि 26 नोव्हेंबरला विधानसभेचा कार्यकाळ संपणार आहे, त्यानंतर महाराष्ट्राची विधानसभा विसर्जित केली जाईल. तो पर्यंत सत्ता स्थापनेचा दावा केला गेला नाही तर राज्यात राष्ट्रपती



राजवट लागू शकते.

2019 मध्ये 9 नोव्हेंबर रोजी विधानसभा विसर्जित करण्यात आली. राज्यपालांनी वेळ देऊनही शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेसने सत्ता स्थापनेचा दावा केला नाही. यानंतर 12 नोव्हेंबरला राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली. यावेळी मविआ आणि महायुतीकडे निकालानंतर सत्तास्थापनेचा दावा करण्यासाठी 2 दिवस आहेत.

संविधानाच्या कलम 356 नुसार, एखाद्या राज्यातील प्रशासन घटनात्मक पद्धतींने चालत नसल्यास राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते. संविधानाच्या कलम 356 नुसार, एखादे राज्य सरकार केंद्राच्या निदेशांकडे दुर्लक्ष करत असल्यासही त्या संबंधित राज्यात राष्ट्रपती राजवट घोषित करणे शक्य असते. ▶▶ पान ८ वर

## दिल्ली विधानसभा निवडणूक आपची पहिली यादी जाहीर



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :
दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पार्टीने उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यादीत 11 नावे आहेत. यामध्ये भाजप किंवा काँग्रेस सोडून 'आप'मध्ये दाखल झालेले सहा नेते आहेत.

ब्रह्मसिंह तंवर, बीबी त्यागी आणि अनिल झा यांनी नुकतेच भाजप सोडले होते. तर झुबेर चौधरी, वीरसिंग धिंगण आणि सुमेश शौकीन यांनी काँग्रेसमधून आपमध्ये प्रवेश केला आहे.

दिल्ली विधानसभेचा सध्याचा कार्यकाळ 23 फेब्रुवारी 2025 रोजी संपत आहे. सध्याच्या सभागृहाचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपण्याच्या तारखेपूर्वी निवडणूक आयोग निवडणूक प्रक्रिया पूर्ण करतो. गेल्या विधानसभा निवडणुका फेब्रुवारी 2015 मध्ये झाल्या होत्या, ज्यामध्ये आम आदमी पक्षाने पूर्ण बहुमत आणि 70 पैकी 62 जागा जिंकल्या होत्या. भारतीय जनता पक्षाला (भाजप) केवळ 8 जागा जिंकण्यात यश आले, तर काँग्रेसचे खातेही उघडले नाही. दरम्यान, यावेळी आपने संपूर्ण शक्तीनिशी लढण्याची तयारी केली असून, काँग्रेस आणिभ भाजपाने आपले पत्ते उघड केले नाहीत.

## राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार!

### फडणवीसांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१:
महाराष्ट्र मध्ये मतदानाची टक्केवारी वाढली आहे. आजपर्यंतचा अनुभव पाहता जेव्हा जेव्हा टक्केवारी वाढली आहे, तेव्हा तेव्हा भाजप आणि मित्र पक्षाला त्याचा फायदा होतो. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये भाजप आणि मित्र पक्षाचे सरकार स्थापन होईल, असा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.



राज्यात वाढलेली मतदानाची टक्केवारी ही महिलांची असल्याचा दावा देखील त्यांनी केला. नागपूर विमानतळावर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला, या वेळी ते बोलत होते.

आम्ही मतदारसंघातील बुथ वरील आकडेवारी जमा केली आहे. आणि प्राथमिक फीडबॅक नुसार महिलांची टक्केवारी वाढलेली असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी ▶▶ पान ८ वर

## भाजपकडे कार्यकर्तेच उरले नाहीत

### पटोले यांचा टोला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१:
काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

भाजप पैसा व दारू वाटून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांचा हा नोट जिहाद आहे की दारू जिहाद आहे? महाराष्ट्रात महाविकास



आघाडीचे सरकार येणार असून, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असे ते म्हणाले.

नाना पटोले पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होईल. मतदानाची आकडेवारी व कल पाहता काँग्रेसचेच सर्वाधिक उमेदवार निवडून येतील. मविआचे सरकार येणार यावर ▶▶ पान ८ वर

## पॅसेंजर व्हॅनवर हल्ला ३८ ठार

■ वृत्तसंस्था
इस्लामाबाद, दि. २१:
पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात प्रवासी व्हॅनवर हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात 38 जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय अनेक जण जखमीही झाले आहेत. खैबर पख्तूनख्वामधील कुर्रम खोऱ्यात ही घटना घडली. ही व्हॅन पेशावरहून कुर्रमच्या दिशेने जात होती. कुर्रम डीपीओनुसार, जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याआधी मंगळवारी रात्री खैबर पख्तुनख्वा प्रांतातील बन्नू जिल्ह्यात लष्कराच्या चौकीवर आत्मघाती हल्ला झाला होता. या हल्ल्यात 12 पाकिस्तानी सैनिक मारले गेले. तेथे सहा दहशतवादीही मारले गेले.

माहिती देताना पाकिस्तानी लष्कराच्या मीडिया विंगने सांगितले की, दहशतवाद्यांनी चेक पोस्टच्या भिंतीवर वाहन घुसवले आणि त्यात ठेवलेल्या स्फोटकांद्वारे स्फोट घडवून आणला. या स्फोटात 12 जवान शहीद झाले होते. प्रत्युत्तरादाखल लष्करानेही 6 दहशतवाद्यांचा खात्मा केला.

16 नोव्हेंबर रोजी पाकिस्तानच्या पश्चिमेकडील बलुचिस्तान प्रांतात लष्कराच्या चौकीवर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात पाकिस्तानी सुरक्षा दलाचे 7 जवान शहीद झाले. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (इछअ) या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

## एकनाथ शिंदे, शरद पवार एकत्र येणार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१:
विधानसभा निवडणुकीतील जनतेचा कौल मतदान यंत्रामध्ये बंद झाल्यानंतर आता राज्यात कुणाची सत्ता येणार? याविषयी विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत.

त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संभाव्य युतीचे संकेत दिलेत. यामुळे निवडणूक निकालानंतर राज्याच्या राजरकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची चिन्हे आहेत.

## केंद्रीय दलाच्या आणखी ८ कंपन्या मणिपूरमध्ये

■ वृत्तसंस्था, इंफाळ, दि. २१:
मणिपूरमध्ये वाढत्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या (उअढऋ) आणखी 8 कंपन्या बुधवारी राजधानी इंफाळमध्ये पोहोचल्या. एक दिवस आधी सीएपीएफच्या 11 कंपन्या मणिपूरला पोहोचल्या होत्या.

सीएपीएफ आणि बीएसएफच्या प्रत्येकी चार कंपन्या राज्याच्या संवेदनशील आणि सीमावर्ती भागात तैनात केल्या जातील. सीएपीएफची यापैकी एक कंपनी महिला बटालियनची आहे.

केंद्र सरकारने नुकतीच घोषणा केली होती की मणिपूरमध्ये 50 नवीन सीएपीएफ कंपन्या तैनात केल्या जातील.



मणिपूर काँग्रेसने बुधवारी पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पी चिदंबरम यांच्या वादग्रस्त पोस्टसाठी त्यांच्यावर कारवाई करण्याचे आवाहन केले. चिदंबरम यांनी प्रादेशिक स्वायत्ततेचा पुरस्कार केला होता.

खरगे यांना लिहिलेल्या पत्रात नेत्यांनी म्हटले आहे की, "आम्ही पी चिदंबरम यांच्या पोस्टचा निषेध करतो. राज्यातील वाढता तणाव, सार्वजनिक शोक आणि राजकीय संवेदनशीलतेचे सध्याचे वातावरण पाहता त्यांची भाषा आणि भावना अयोग्य होत्या."

## शिरसाट यांच्या दाव्याने भाजपमध्ये खळबळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१:
विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत जाणार असल्याचा दावा भाजपने जोरकसपणे फेटाळून लावला आहे. एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीविरोधात निवडणूक लढवली आहे. त्यामुळे ते त्यांच्यासोबत जातील अशी कोणतीही शक्यता नाही. आमदार संजय शिरसाट यांनी यासंबंधी मांडलेली भूमिका त्यांच्या पक्षाची नाही, असे भाजपने म्हटले आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले की, संजय शिरसाट यांची भूमिका ही काही त्यांच्या पक्षाची अधिकृत भूमिका आहे असे मला वाटत नाही. त्यांच्या पक्षाची ही अधिकृत भूमिका असती तर मी त्यावर भाष्य केले असते.

# मतदारांनी रचला नवा विक्रम

## २० वर्षात प्रथमच ६५.११ टक्के मतदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१:
विदर्भासह महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे मतदान संपले. राज्यातील जनतेने मतदानात नवा विक्रम केला आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात 65.11 टक्के मतदान झाले.

गेल्या 20 वर्षात महाराष्ट्र विधानसभेत यावेळी सर्वाधिक मतदान झाले आहे. उपराजधानी नागपुरातही यावेळी बंपर मतदान झाले आहे.

बुधवारी महाराष्ट्र विधानसभेच्या 288 जागांसाठी मतदान झाले. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभा निवडणुकीसाठी जनतेमध्ये प्रचंड उत्साह होता. राज्यातील सर्वच मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची गर्दी दिसून आली.

जनतेच्या या उत्साहाने राज्यातील विधानसभा मतदानाचे यापूर्वीचे अनेक विक्रम मोडीत काढत नवा विक्रम निर्माण केला. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या अंतिम आकडेवारीनुसार राज्यात 65.11 टक्के मतदान झाले. गेल्या 20 वर्षात राज्यात कोणत्याही विधानसभा निवडणुकीतील हा उच्चांक आहे. 2014 मध्ये सर्वाधिक 63.5 टक्के मतदान झाले होते. यावेळी 65.11 टक्के मतदान झाले.

### विदर्भातील ११ जिल्ह्यांतील मतांची टक्केवारी

नागपूर: ६०.४९%
अकोला : ६४.९८%
बुलढाणा: ७०.३२%
गोंदिया : ६९.५३%
गडचिरोली : ७३.६८%
भंडारा : ६९.४२%
अमरावती : ६५.५७%
यवतमाळ : ६९.०२%
वाशिम : ६६.०१%
वर्धा: 68.30%
चंद्रपूर : 71.27%



समृद्ध शेतीसाठी यंत्र, तंत्र व व्यापार वाढीचे मंत्र
मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन
ॲग्रो व्हिजन
कार्यशाळा, राष्ट्रीय कृषि प्रदर्शन व परिसंवाद
२२ ते २५ नोव्हेंबर २०२४

आज भव्य उद्घाटन
वेळ : सकाळी १०.३० वाजता
स्थळ : पीडीकेव्ही ग्राउंड, दाभा, नागपूर

कार्यक्रमाचे अध्यक्ष



मा.श्री. नितीन गडकरी
केंद्रिय मंत्री, भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग, भारत सरकार, मुख्य प्रवर्तक ॲग्रोव्हिजन

उद्घाटक



मा.डॉ. मोहन यादव
मुख्यमंत्री, मध्यप्रदेश

प्रमुख अतिथी



मा.श्री. देवेन्द्र फडणवीस
उपमुख्य मंत्री, महाराष्ट्र

प्रमुख उपस्थिती
डॉ. शरद गडाख – कुलगुरू, पीडीकेव्ही, अकोला
डॉ. पी.जी. पाटील – कुलगुरू, एमपीकेव्ही, राहूरी
डॉ. नितीन पाटील – कुलगुरू, माफसू, नागपूर
श्री. मिनेश शहा – अध्यक्ष व प्रबंध संचालक, एन.डी.डी.बी.
श्री. अरविंद कुमार – महासंचालक, एसटीपीआय
श्री. दिपक शहा – अध्यक्ष, क्रॉप केअर फेडरेशन
श्री. विक्रम वाघ – सीईओ, महिंद्रा ट्रॅक्टर्स
श्री. टी.आर. केसवन – समूह अध्यक्ष - कॉर्पोरेट रिलेशन्सआणि अलायन्स टॅफे ट्रॅक्टर्स

भव्य राष्ट्रीय कृषी प्रदर्शन
• ४०० पेक्षा जास्त संस्थांचा सहभाग
• नवे कृषी तंत्रज्ञान, नवी उत्पादने व कृषी क्षेत्रातील घडामोडी बघण्याची संधी
• एमएसएमई व स्टार्टअप चे विशेष दालन
• शेतकऱ्यांसाठी ४० कार्यशाळा

ॲग्रोव्हिजन सल्लागार समिती



डॉ. सी.डी. मायी – अध्यक्ष, सल्लागार समिती



गिरीश गांधी – संयोजक



रवि बोरटकर – आयोजन सचिव



रमेश मानकर – आयोजन सचिव

सदस्य : डॉ. एन.जी. पाटील, डॉ. इंद्रमणी मिश्रा, डॉ. वाय. जी. प्रसाद, डॉ. दिलीप घोष, डॉ. एस. के. शुक्ला, श्रीमती रीना सिन्हा, श्री. एम. जी. शेंबेकर, कॅप्टन डॉ. एल. बी. कलंत्री

ॲग्रोव्हिजन फाउंडेशन सदस्य
श्री. शिरीष भगत, श्री. सुधीर दिवे, श्री. आनंदराव राऊत, श्री. मिलींद टिचकुले, श्री. प्रशांत कुकडे, श्री. प्रशांत वासाडे, श्री. श्रीधर ठाकरे, डॉ. सुनिल सहातपुरे, डॉ. पिनाक दंदे, श्री. माधव कोटस्थाने, श्री. विजय जाधव, श्री. नितीन कुळकर्णी, डॉ. के.डी. ठाकूर, डॉ. हितेंद्र सिंग

सर्व शेतकरी बांधवांनी व कृषी संबंधी सर्वांनी हेच निमंत्रण समजून यावे.

आज आयोजित विशेष कार्यशाळा
विदर्भातील दुग्ध व्यवसाय वाढीच्या संधी
दुपारी १२.३० वाजता

इतर महत्वाच्या विषयांवर आयोजित विशेष कार्यशाळा
२३ नोव्हेंबर २०२४
ऊस उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञान
तरुणांचा शेतीतील सहभाग
माहिती तंत्रज्ञानाचा शेतीतील वापर
२४ नोव्हेंबर २०२४
अन्न प्रक्रिया उद्योग
शेतकरी उत्पादकसंस्था
२५ नोव्हेंबर २०२४
संत्रा उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान
विदर्भातील मत्स्यव्यवसाय
(मत्स्यपालन सोसायटीच्या सदस्यांचा मेळावा)

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

आयोजक
ॲग्रोव्हिजन फाउंडेशन
सहयोग

महासागर आवृत्त्या ▌नागपूर ▌अकोला ▌अमरावती ▌खामगांव ▌यवतमाळ ▌वर्धा ▌गडचिरोली ▌वाशीम ▌भंडारा ▌गोंदिया ▌मुंबई ▌पालघर (ठाणे) ▌नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# अजितदादा लाखांच्या मताधिक्यानी निवडून येतील-रुपाली चाकणकर



**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील बारामती विधानसभा मतदारसंघ चर्चेत राहिला. या मतदारसंघातून मागील ३० वर्षांपासून अजित पवार हे प्रतिनिधित्व करीत आले आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फुट पडल्यानंतर या मतदारसंघातून अजित पवार यांच्या विरोधात कोण असणार अशी चर्चा कित्येक महिन्यांपासून सुरू असताना, शरद पवार यांनी युगेंद्र पवार यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. यामुळे या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शरद पवार गटाकडून आणि अजित पवार गटाकडून आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले. या आरोप प्रत्यारोपानंतर आज मतदानाचा दिवस उजाडला असून राज्यभरात ११ वाजेपर्यंत १८.१४ टक्के इतके मतदान झाले. तर दुसऱ्या बाजूला बारामती येथे १८.८१ टक्के इतके मतदान झाले आहे. तर यंदा नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह पाहण्यास मिळत आहे. पण राज्यातील जनतेचे बारामतीच्या लढतीकडे लक्ष लागून राहिले आहे. काका की पुतण्या जिंकणार, याबाबत अनेक अंदाज वर्तविले जात आहे.

त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या की, लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी सत्ताधारी पक्षाचा अपप्रचार करून काही प्रमाणात जागा जिंकल्या. पण आता राज्यातील जनतेला विरोधकांबाबत सर्व गोष्टी कळल्या आहेत. यामुळे राज्यातील जनता विरोधकांना मतदान करणार नाही. कारण मागील वीस दिवसांत राज्यभरात दौरे झाले. त्या दरम्यान महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. राज्यात महायुतीचं सरकार आल्यावर सर्व सामान्य नागरिक ते शेतकऱ्यांच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने महिला भगिनींकरिता मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली. यामुळे राज्यातील महिला भगिनींमध्ये आनंदाचे वातावरण असून राज्यातील महिला महायुतीच्या पाठीशी निश्चित राहतील आणि आमची सत्ता येणार असल्याचा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

यंदा पहिल्यांदाच बारामतीमध्ये काका विरुद्ध पुतण्या अशी लढत होत आहे. यामुळे अजित पवार हे लाखांचं मताधिक्य कायम राखणार का अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्या प्रश्नावर त्या म्हणाल्या की, मागील ३० वर्षांपासून अजित पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघासह पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केल आहे. राज्यभरात विकास कामे केली आहेत. अजित पवार यांच्या कामाची पद्धत राज्यातील जनतेला माहितीच आहे. पण बारामतीच्या जनतेला देखील माहिती आहे. यामुळे अजित पवार यांच्या समोर कोणताही उमेदवार असला तरी अजितदादा लाखांच्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'हिंदुत्व तोडणारा राक्षस'

## कालीचरण यांच्या विधानानंतर मनोज जरांगे पाटील यांचे जोरदार प्रत्युत्तर

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ : प्रतिनिधी**

स्वयंघोषित महाराज कालीचरण यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या एका धार्मिक सभेत मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्यावर वादग्रस्त टिप्पणी केली होती. मनोज जरांगे पाटील यांचे नाव न घेता त्यांनी मराठा आरक्षणाचा नेता असा उल्लेख केला होता. त्यांच्या वादग्रस्त टिप्पणीनंतर संताप व्यक्त करण्यात येत आहे. मराठवाड्यातच सदर विधान केले केल्यामुळे येथील वातावरण तापले गेले आहे. यानंतर ज्यांच्या मतदारसंघात सदर कार्यक्रम झाला त्या संजय शिरसाट यांनी यावर भूमिका मांडली असून कालीचरण यांच्या टिप्पणीपासून हात झटकले आहेत. तसेच मनोज जरांगे पाटील यांनीही कालीचरण यांच्या विधानाचा आक्रमकपणे समाचार घेतला असून हिंदुत्वाबाबत भाष्य केले आहे.

**काय म्हणाले संजय शिरसाट?**

संजय शिरसाट म्हणाले, माझ्या मतदारसंघात कालीचरण यांची जी सभा झाली, त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही. मी त्यांना भेटलेलो नाही किंवा त्याठिकाणी माझा बॅनर लागलेला होता. पण माझे नाव सभेशी जोडले गेल्यामुळे गैरसमज निर्माण होत आहे. जरांगे पाटील आणि माझ्यात जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्या आंदोलनात पहिल्या दिवसांपासून आम्ही त्यांना सहकार्य करत आलो आहोत. मराठा समाजामध्ये गैरसमज झाला तर त्याचा परिणाम वाईट होतो. याची जाणीव मला आहे.

**टिकली लावली म्हणून कुणी संत होत नाही – जरांगे पाटील**

दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनीही कालीचरण यांच्या



विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले, "मी साधू-संताचा आदर करतो. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदुत्व मानतो. माझ्याबद्दल जे बरळत आहेत, त्यांना बरळू द्यावे. कारण ज्याने एका पक्षाचा ठेका घेतला आहे, अशांबद्दल आपण काही बोलले नाही पाहिजे. संत-महात्म्यांचा आदर करणे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शिकवले आहे. आम्ही ज्या हिंदू धर्मात आहोत, त्यातील सर्वात कट्टर वर्ग आहे मराठा समाज. पण हाच समाज आज अडचणीत आलेला आहे."

**मराठा कट्टर हिंदू**

"आम्ही आरक्षण मागतो, याचा अर्थ आम्ही जातीवाद करत नाहीत. आम्ही हिंदूच आहोत. पण गरीबांच्या मुलांना आरक्षण दिले जात नाही. वाकडी टिकली लावलेले स्वतःला धर्माचे रक्षक मानतात. पण धर्माची खरी रक्षक जनता आहे. जनता स्वतःच्या अंगावर वार सोसते. हे टिकली लावणारे संत फक्त सुपाऱ्या, नारळ, पैसे घेऊ शकतात. खरा हिंदू धर्म वारकरी, गरीब जनता चालवत आहे. हरळ खाऊन जगणारे लोक धर्माचे ठेकेदार नाहीत. मराठा कट्टर हिंदू आहे आणि राहणारच", असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आंतरवाली सराटीत आंदोलन सुरू असताना आमच्या आयाबहिणींवर लाठी हल्ला झाला तेव्हा हा कुठे होता? त्या आयाबहिणी हिंदू नव्हत्या का?,' असाही सवाल मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे. आमच्या पोरांनी फाशी घेतली तेव्हा हा बाबा कुठे होता. ते हिंदू नव्हते का? टिकल्या लावतो. नथ घालतो. मराठे हिंदू नाहीत का? हिंदूमध्ये अर्धा मराठा आहे. धर्मावर संकट येते तेव्हा आमच्यासारखे गरीब हिंदूच रक्षण करतात. मराठे, ओबीसी आणि अठरापगड जाती स्वतःवर वार झेलतात. तुमच्यासारखे कुलुप लावून बसतात,' असा घणाघातही जरांगे पाटील यांनी केला.

# राज्याचे किमान तापमान 11 अंशांवर

## कुठे पडलीये कडाक्याची थंडी ? मुंबईत मात्र उकाडा कायम

**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढत असताना आणि हिमाचल, काश्मीरवरून शीतलहरी देशाचा मध्य भाग व्यापत असतानाच महाराष्ट्रावरही याचा परिणाम दिसून येऊ लागला आहे. राज्यातील विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये तापमानात लक्षणीय घट झाल्याची बाब निदर्शनास आली असून, कोकण क्षेत्रही यास अपवाद नाही. उत्तरेकडील वाऱ्यांमुळं महाराष्ट्रात गारठा वाढत असतानाच मुंबईत मात्र एकाएकी उकाडा वाढण्यास सुरुवात झाली आहे. हवामानातील हा अनपेक्षित बदल नागरिकांच्या जीवाची काहिली करताना दिसत आहे.

निफाड, नाशिक, नागपूर, गडचिरोली इथं किमान तापमानात घट नोंदवण्यात आली आहे. राज्यातील परभणी इथं नीच्चांकी तापमान धुळे 11 अंश, 11.3 अंश असून किमान तापमानाचा हा आकडा निफाडमध्ये 13 अंशांदरम्यान असल्याचं पाहायला मिळत आहे. बहुतांश जिल्ह्यांमध्ये किमान



तापमान 15 अंशांहून कमी झाल्याचं लक्षात येत आहे. पुढील 24 तास आणि त्यानंतरच्या कालावधीमध्ये राज्यातील तापमानाचा आकडा 2 ते 4 अंशांनी आणखी घटण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

राज्यातील दक्षिणेकडील भाग आणि कोकण किनारपट्टी क्षेत्र मात्र या हिवाळ्याच्या स्थितीला अपवाद ठरत आहे. देशातील कोमोरिन क्षेत्रामध्ये चक्राकार वाऱ्यांची निर्मिती होत असल्यामुळं दक्षिण भारतामध्ये पावसानं हजेरी लावली आहे. हवामानात मोठ्या प्रमाणात सातत्यानं हे बदल होत असतानाच राज्यात सोमवारी सर्वाधिक किमान तापमान सोमवारी कुलाबा येथे नोंदवण्यात आलं. मुंबईत पहाटे काहीसा गारवा जाणवण्यास सुरूवात झाली असली तरीही सूर्य डोक्यावर येताना मात्र प्रचंड उकाडा जाणवू लागला आहे.

मुंबईत किमान तापमानासह कमाल तापमानाचा पारा अद्यापही चढा असल्या कारणानं उष्मा कायम आहे. मुळात थंडी पडण्यासाठी किमान तापमानासोबतच कमाल तापमानातही घट अपेक्षित आहे. त्यामुळं मुंबईकरांना पुढील 48 तास तरी थंडीची प्रतीक्षा करावी लागणार आहे. या दरम्यान शहरातील किमान तापमान साधारण 18 ते 22 अंशांदरम्यान राहणार असून, उकाडा आणि गारठ्याची ही जुगलबंदी इतक्यात संपणार नाही हेच स्पष्ट होत आहे.

# समाज माध्यमात बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी गुन्हा

**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

समाज माध्यमात बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी एकाविरुद्ध कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी अझहर तांबोळी आणि साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रशांत सुदामराव जगताप (वय ४७, रा. अनुसया निवास, वानवडी) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

हडपसर विधानसभा मतदार संघातून जगताप निवडणूक लढवत आहेत. जगताप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) उमेदवार आहेत. अझहर तांबोळी आणि साथीदारांनी समाज माध्यमात जगताप यांच्याविरुद्ध बदनामीकारक मजकूर प्रसारित केला. तांबोळी आणि साथीदारांनी दिशाभूल करणारा संदेश प्रसारित केल्याचे जगताप यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक बेंद्रे तपास करत आहेत.

# स्विगी इंस्टा मार्टवरुन मागवलेल्या भाजीवरुन SCAM

**मुंबई, दि. २१ : प्रतिनिधी**

शहरांमध्ये इंस्टंट कॉमर्स मार्केट अगदी झपाट्याने आपलं जाळ पसरत आहे. अनेक असे ॲप्स आहेत जे 10 ते 15 मिनिटांमध्ये गरजेचे सामान घरी पोहोचवतात. अनेक लोक या सेवेवर पूर्णपणे अवलंबून असतात. अशाच प्रकारचं एक ॲप आहे ते म्हणजे स्विगी इंस्टामार्ट. ज्याचा वापर सर्रास करताना दिसत आहे. पण या स्विगी इंस्टामार्टवरुन स्कॅम झाल्याच एका युझरने म्हटलं आहे.

स्विगी इंस्टामार्टवरुन मागवलेल्या भाजीच्या वजनात फेरबदल झाल्याचा दावा एका ग्राहकाने केला आहे. एका रेडिट युझरने हा दावा केला आहे तसेच त्यांनी स्क्रीनशॉर्ट देखील शेअर केले आहेत. रेडिटवर एका व्यक्तीने लिहिले आहे की, फ्लॉवर 400 ते 600 ग्रॅम लिहिलं होतं पण जी भाजी डिलिव्हरी झाली ती फक्त 145 ग्रॅम होती.

**वजनात केली गडबड**


याशिवाय, युझरने शिमला मिरचीचा एक फोटो शेअर केला आहे ज्याचे वजन ॲपवर 250 ग्रॅम दाखवले गेले होते. तर डिलिव्हरी फक्त 170 ग्रॅम शिमला मिरचीची होती. फोटोसोबतच्या कॅप्शनमध्ये त्या व्यक्तीने सांगितले आहे की, त्याने श्राद्धाच्या वेळी भाज्या मागवल्या होत्या पण बहुतेक भाज्यांचे वजन कमी होते पण पैसे जास्त खर्च झाले. तक्रार केल्यानंतर स्विगी 177 रुपयांचा अर्धा म्हणजेच 88 रुपये परत करण्याबाबत बोलत आहे.

# मुंबई, ठाण्यातून फक्त 17 मिनिटांत नवी मुंबई एअरपोर्ट गाठता येणार; हायस्पीड वॉटर टॅक्सीतून सुसाट प्रवास

**मुंबई, दि. २१ : प्रतिनिधी**

नवी मुंबईत विमानाचं लवकरच टेक ऑफ होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर यशस्वी चाचणी घेण्यात आली. हवाई दलाचं सुखोई 30 विमान धावपट्टीवरून उडान केले. लवकरचं हे विमानतळ प्रत्यक्षात कार्यान्वित होणार आहे. मात्र, या विमानतळावर पोहचण्याआधी प्रवाशांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागणार आहे ते म्हणजे वाहतूक कोंडी. मात्र, यावर मोठा पर्याय शोधण्यात आला आहे. मुंबई, ठाण्यातून फक्त 17 मिनीटांत नवी मुंबई एअरपोर्ट गाठता येणार आहे. हायस्पीड वॉटर टॅक्सीतून प्रवाशांचा हा सुसाट प्रवास होणार आहे.

नुकतीच हायस्पीड वॉटर




टॅक्सीची घोषणा करण्यात आली आहे. या हायस्पीड वॉटर टॅक्सीच्या माध्यपातून मुंबईहून आता नवी मुंबई विमानतळ फक्त 20 मिनिटांत गाठता येणार आहे. तर, ठाणे ते नवी मुंबई विमानतळ हा प्रवास फक्त 17 मिनीटांत पूर्ण होणार आहे. नवी मुंबई विमानतळाजवळ जेट्टी उभारली जाणार आहे. जेट्टीसाठी लवकरच जागा निश्चित करण्यात येणारंय. या जेट्टीच्या माध्यमातून हायस्पीड वॉटर टॅक्सीचा प्रकल्प सुरु करण्यात येणार आहे. यामुळे तासा दीड तासाचा प्रवास करावा लागणार नाही. अवघ्या काही मिनीटांत नवी मुंबई विमानतळ गाठता येणार आहे.

मुंबईमध्ये लवकरच पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी सुरू होण्याची शक्यता आहे.. माझगाव डॉक शिप बिल्डिंग लिमिटेड कंपनीने 6 वॉटर टॅक्सींची निर्मिती केली.. तर यातील 1 टॅक्सी खरेदी करणा-या कंपनीने, इलेक्ट्रिक टॅक्सी सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव देखील राज्य आणि केंद्र सरकारकडे मांडला आहे.. यामुळे या प्रस्तावाला सरकारने मान्यता दिल्यास, मुंबईतही पहिली स्वदेशी इलेक्ट्रिक टॅक्सी धावणार... तसेच, गेट ऑफ इंडिया आणि बेलापूर जेट्टीवर चार्जिंग पॉइंटसह आवश्यक सुविधा उभारण्यासाठी देखील विनंती करण्यात आलीय.

# मतदानाच्या दिवशी, रायगडमध्ये देवदेवस्कीचा प्रकार ?

**उरण, दि. २१ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठीच्या मतदान प्रक्रियेला राज्यभरात दणक्यात सुरुवात झाली. बुधवारी सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांनी रांगा लावल्याचं पाहायला मिळालं. काही मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशिनमध्ये झालेल्या बिघाडामुळं मतदान प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण झाल्याचंही पाहायला मिळालं.

इथं राज्यात विधानसभेसाठी मतदानाची धामधूम असतानाच मतदानाच्याच दिवशी सकाळीच महाडमध्ये धक्कादायक प्रकार उघडकीस आला. बिरवाडी शहराच्या नाक्यावर रस्त्याच्या मधोमध, तिन रस्ते एकत्र येत असलेल्या तिठ्यावर एकावर एक दोन मडकी आणि त्यावर नारळ ठेवण्यात आल्याचं पाहायला मिळालं.

मडक्यांची तोंडं लाल आणि काळ्या फडक्याने बांधून ठेवण्यात आली होती. हा देव देवस्कीचा प्रकार असल्याचा संशय प्रथमदर्शनी अनेकांनीच व्यक्त केला. सदर प्रकाराने ग्रामस्थांमध्ये भीती आणि संतापाचं वातावरण पाहायला मिळालं. हा प्रकार कुणी केला असावा याचीच चर्चा सध्या परिसरात सुरू आहे.

मतदानाच्या दिवशी एकिकडे महाडमध्ये देवदेवस्कीसम प्रकार घडल्याचं वृत्त समोर आलेलं असतानाच राज्यातील काही मतदार संघांमध्ये मतदारांनी मतदानाच्या हक्कावर बहिष्कार टाकल्याचं पाहायला मिळालं. तर, काही ठिकाणी ईव्हीएममधील बिघाडानं मतदारांना पश्चाताप सोसावा लागला.

पुण्यातील कोथरूड मतदार संघातील EVM मशीन बंद असल्याचं वृत्त समोर आलं. अण्णासाहेब पाटील शाळेतील ईव्हीएम पाऊण तासापासून बंद असून, तांत्रिक बिघाडामुळं ईव्हीएम बंद झाल्याची अधिकाऱ्यांची माहिती. तिथं येवल्यात जनता विद्यालय येवला या ठिकाणी मतदान केंद्रावर मतदान सुरू होण्यापूर्वीच यंत्रात बिघाड झाला होता. मुंबईतही शिवडी मतदार संघातील आर.एम. भट शाळेतील मतदान केंद्रावर असंच चित्र पाहायला मिळालं.

मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदार मतदान केंद्रांकडे जात असतानाच तिथं कोकणाच्या दिशेनं निघालेल्या वाहनांचा आकडाही मोठा असल्याचं पाहायला मिळालं. मुंबई- गोवा महामार्गावर बुधवारी पहाटेपासूनच वाहतूक कोंडी झाल्याचं लक्षात आलं.

# खराब हवेमुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढला! संशोधनातील निष्कर्ष

**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

सध्या प्रदूषणाची पातळी वाढली असून, खराब हवेमुळे अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. आता प्रदूषित हवेमुळे शरीरात दाह निर्माण होऊन त्यामुळे हृदयविकाराच्या धोक्यात लक्षणीय वाढ होत असल्याचे एका संशोधनातून समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्यतज्ज्ञांनी काळजी घेण्याचा सल्ला हृदयविकाराच्या रुग्णांना दिला आहे.

अमेरिकेतील सॉल्ट लेक सिटीतील इंटरमाउंटन हेल्थमधील संशोधकांनी हे संशोधन केले आहे. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या वतीने शिकागोमध्ये आयोजित वैज्ञानिक परिषदेत हे संशोधन सादर करण्यात आले. प्रदूषण वाढल्यानंतर हृदयविकाराच्या रुग्णांमध्ये इन्फ्लेमेटरी मार्कर (दाह निदर्शक) सीसीएल २७ आणि आयएल १८ यामध्ये वाढ होत असल्याचे संशोधनात समोर आले आहे. याच वेळी हृदयविकाराचा त्रास नसलेल्या रुग्णांमध्ये ही वाढ होत नसल्याचेही निष्पन्न झाले आहे. भारतात हृदयविकारामुळे मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे हे संशोधन भारतासाठी महत्त्वाचे आहे.

देशात सध्या प्रदूषणाची पातळी चिंताजनक आहे. अनेक शहरांत पीएम २.५ या सूक्ष्म धूलिकणांची पातळी मर्यादेपेक्षा जास्त नोंदविण्यात येत आहे. प्रदूषित हवेमुळे हृदयविकाराच्या रुग्णांना अधिक धोका वाढत आहे. पर्यावरणीय बदलांचा सामना करण्यासाठी हृदयविकाराचे रुग्ण तयार नसतात. त्यामुळे शरीरातील बदल त्यांच्यासाठी धोकादायक बनतात. या संशोधनात हृदयविकाराचे ४४ रुग्ण आणि हृदयविकार नसलेल्या ३५ जणांचा अभ्यास करण्यात आला. त्यात जास्त प्रदूषण असलेल्या दिवशी हृदयविकाराच्या रुग्णांमध्ये दाह निदर्शकांची पातळी वाढल्याचे निष्पन्न झाले. याच वेळी हृदयविकार नसलेल्या व्यक्तींमध्ये हा बदल दिसून आला नाही.

**पुण्यातील हवा खराब पातळीवर**

पुण्यातील हवेची पातळी मंगळवारी सायंकाळी ५ वाजता खराब नोंदविण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कात्रज डेअरी येथील केंद्राने हवा गुणवत्ता निर्देशांक २३८ नोंदविला. त्या खालोखाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील केंद्रात निर्देशांक २०९ नोंदविण्यात आला. दोन्ही ठिकाणी हवेची पातळी खराब होती. याच वेळी कर्वे रस्ता, शिवाजीनगरमधील रेव्हेन्यू कॉलनी, म्हाडा कॉलनी आणि आळंदी परिसरात हवा गुणवत्ता निर्देशांक सुमारे १२५ नोंदविण्यात आला. त्यामुळे या ठिकाणी हवेची पातळी समाधानकारक होती.

# ठाण्यात चार हजार परवानाधारक शस्त्र झाली म्यान, 59 बेकायदेशीर रिव्हॉल्व्हर जप्त

**ठाणे, दि. २१ : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीमुळे आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे तसेच पोलिसांचा मनाई आदेशही लागू असल्यामुळे मतदान प्रक्रीया शांततेत पार पडण्यासाठी ठाणे शहर पोलिस आयुक्तालयातील चार हजार ४५२ परवानाधारक शस्त्र धारकांपैकी तब्बल तीन हजार ८०५ शस्त्रे पोलिसांकडे जमा झाली आहेत. तर ३० शस्त्रांचा परवाना रद्द झाल्यामुळे ती पोलिसांकडे जमा झाली. त्याचबरोबर कोंबिंग ऑपरेशन दरम्यान ५९ बेकायदेशीर शस्त्रे आणि ८५ जिवंत काडतुसे जप्त केल्याची माहिती ठाणे पोलिसांनी मंगळवारी दिली.

निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर १५ ऑक्टोबर २०२४ पासून आचारसंहिता लागू झाली. त्यानंतर पोलिस ठाणे पातळीवर विशेष अभियानांतर्गत कोंबिंग ऑपनेशन, ऑपरेशन ऑल आऊट आदी विविध मोहिमा राबवून आतापर्यंत ५९ गावठी कट्टे आणि रिव्हॉल्व्हर तसेच चाकू आणि सुरे अशी २५२ हत्यारे जप्त करुन संबंधितांवर कडक कारवाई केली आहे.

मतदान कालावधीमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी परवानाधारक चार हजार ४५२ पैकी तीन हजार ८०५ रिव्हॉल्व्हरसारखी शस्त्रे पोलिसांकडे जप्त झाली. यातून धोका असलेले नामांकित बिल्डर, डॉक्टर आणि काही राजकीय पदाधिकारी अशा ४६४ जणांना या मनाई आदेशातून वगळले आहे.

गेल्या महिनाभरात सुमारे १३ हजार लीटर बेकायदेशीर देशी, विदेशी आणि गावठी दारु जप्त केली. याशिवाय, गावठी दारु तयार करण्यासाठी लागणारे एक लाख ४५ हजार ३२० लीटर रसायन नाश केले आहे. त्याचबरोबर ६५ किलोग्राम गांजा, एमडी आणि एक कोटी दोन लाख ७२ हजार २१८ रुपयांचा गुटखाही जप्त केला आहे.

# कात्रज भागात जुगार अड्ड्यावर छापा; 16 जणांविरुद्ध गुन्हा

**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

कात्रज भागात जुगार अड्डयावर भारती विद्यापीठ पोलिसांनी (आंबेगाव) छापा टाकला. पोलिसांनी याप्रकरणी जुगार अड्ड्याचा चालकासह १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. मोबाइल संच, जुगार खेळण्याचे साहित्य, रोकड असा एक लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी जुगार अड्ड्याचा चालक किशोर सातपुते (रा. दांडेकर पूल), साहिल इब्राहिम साठी (रा. धनकवडी), किरण डिंबळे, रोहिदास गोरड (दोघे रा. पर्वती), हर्षद थोरवे (रा. शुक्रवार पेठ), गणपत सुतार (रा. नऱ्हे), दत्ता जोगी, विराज पाटील, मुन्नवर शेख, इम्रान दलाल (चौघे रा. कात्रज), वसंत वाध (रा. शिवणे), योगेश घुमक (रा. सिंहगड रस्ता), धमेंद्र सिंग (रा. हडपसर), दत्ता सितप (रा. नऱ्हे), राजेश उत्तेकर, लक्ष्मण मानकर (दोघे रा. धनकवडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोलीस शिपाई बालाजी पांचाळ यांनी भारती विद्यापीठ (आंबेगाव) पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंबेगाव परिसरात जांभुळवाडी भागात एका इमारतीत किशोर सातपुते, साहिल साठी जुगार अड्डा चालवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तेथे छापा टाकून कारवाई केली. पोलिसांनी तेथून पत्ते, १६ मोबाइल संच, रोकड असा मुद्देमाल जप्त केला. मुंबई जुगार अधिनियमान्वये पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मोहन कळमकर तपास करत आहेत.

# स्वाइन फ्लूमुळे राज्यात 57 मृत्यू

**पुणे, दि.२१ : प्रतिनिधी**

राज्यात यंदा स्वाइन फ्लूमुळे ५७ जणांचा मृत्यू झाला आहे. या वर्षी जानेवारी ते १८ नोव्हेंबर या कालावधीत राज्यात स्वाइन फ्लूचे २१ लाख ३३ हजारांहून अधिक संशयित रुग्ण आढळले आहेत. सध्या २५ रुग्ण रुग्णालयात दाखल असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाने स्वाइन फ्लूबाबतचा अहवाल जाहीर केला आहे. या अहवालानुसार, राज्यात यंदा १८ नोव्हेंबरपर्यंत एकूण २१ लाख ३३ हजार ६९५ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. यातील ५ हजार ७५१ रुग्णांना ऑसेलटॅमीवीर हे औषध देण्यात आले आहे. स्वाइन फ्लूचा उपप्रकार एच१एन१ आणि एच३एन२ या दोन्ही विषाणूंची बाधा झालेल्या रुग्णांची संख्या २ हजार ३२४ आहे. राज्यात एच१एन१मुळे ५६ जणांचा मृत्यू झाला असून, एच३एन२मुळे एकाचा मृत्यू झाला आहे.

# पुन्हा एका उमेदवारावर प्राणघातक हल्ला दुचाकीवर आलेल्या सात गुंडांनी

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. २१ :** स्वराज्य पक्षाचे जळगाव-जामोदचे उमेदवार प्रशांत डिक्कर हे आपल्या सहकाऱ्यांसमवेत आज मतदानाच्या निमित्ताने बुथ पाहणीसाठी शेगावकडे येण्यास निघाले होते. यावेळी दुचाकीवरून आलेल्या पाच ते सात गुंडांनी त्यांची गाडी अडवली व गाडीवर दगडफेक सुरू केली. यामध्ये ते गंभीर जखमी झाले असून घटनेने जळगाव मतदारसंघ, बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात खळबळ उडाली आहे.

शेगाव तालुक्यातील कालखेड जवळ धारधार शस्त्रांनी हल्ला चढवला. या हल्ल्यात प्रशांत डिक्कर व चालक गंभीर जखमी झाले. याचवेळी प्रशांत डिक्कर यांना छातीत असह्य वेदना झाल्याने ते अद्यापही बेशुद्धावस्थेत आहेत. त्यांची प्रकृती अत्यवस्थ असून पुढील उपचारांसाठी त्यांना अकोला येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. डिक्कर समर्थकांकडून , हा हल्ला विरोधक गुंडानी केला असल्याचे सांगितले जात आहे. छत्रपती संभाजीराजे यांनी डिक्कर यांच्यासाठी ३ सभा १ रॅली केली होती. त्यावेळी उमेदवारासह संभाजीराजेंनी देखील याभागातील दहशती विषयी चिंता व्यक्त केली होती. एक विस्थापित भूमिहीन शेतमजुराचा मुलगा, शेतकरी चळवळीतील सामान्य कार्यकर्ता प्रथापितांसमोर मोठे आव्हान उभे करतो, हे प्रस्थापित नेत्याला पाहवले नाही. लोकशाही पद्धतीने आपला पराभव दिसत असल्याने वैफल्यग्रस्त झालेल्या स्थानिक मोठ्या नेत्याने हा भ्याड हल्ला घडवून आणलेला आहे. हा माज आम्ही उतरवू, अशी प्रतिक्रिया संभाजीराजे छत्रपती यांनी प्रसिद्धीस दिली आहे.



शेगाव कालखेड गावाजवळ हल्ल्यानंतर प्रशांत डिक्कर यांना शेगावमधील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले परंतु प्रकृती गंभीर असल्याने डिक्कर यांना अकोला येथील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारांसाठी पाठविण्यात आले आहे. त्यांना अटॅक आल्याची शक्यता आहे.

दरम्यान महाराष्ट्र स्वराज्य पक्षाने या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे अकोल्यातील ओझोन रुग्णालयाला भेट देणार असून, प्रशांतच्या मागे ठामपणे उभे आहे,

असे सांगण्यात आले आहे. जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघातील स्वराज्य पक्षाचे उमेदवार प्रशांत डिक्कर शेतकऱ्यांचा आवाज असून त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा जाहीर निषेध करीत असल्याचे पक्षातर्फे प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे. जळगाव जामोद मध्ये गुंडांकडून स्वराज्य पक्षाचे उमेदवार प्रशांत डिक्कर यांच्यावर जीवघेणा भ्याड हल्ला झाला असून त्यांच्यावर उपचार चालू आहे. प्रशांत चळवळीतील लढवय्या कार्यकर्ता असून निवडणुकातील पराभव समोर दिसत असल्याने काही प्रस्थापित नेत्यानी हा हल्ला केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# अकोला जिल्ह्यात २४.८७ टक्के, तर वाशीम जिल्ह्यात २४.३१ टक्के मतदान

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २१ :** लोकशाहीच्या उत्सवात मतदारांनी हिरहिरीने सहभाग घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी केंद्राबाहेर सकाळपासूनच मतदारांच्या रांगा लागल्या आहेत. युवा मतदारांसह ज्येष्ठ मतदारांमध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण दिसून आले. अकोला जिल्ह्यातील पाचही मतदारसंघांमध्ये दुपारी एक वाजेपर्यंत सरासरी २४.८७. टक्के, तर वाशीम जिल्ह्यातील तीन मतदारसंघात २४.३१. टक्के मतदान झाले.

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सकाळी ७ वाजतापासून मतदानाला उत्साहात सुरुवात झाली. मतदानासाठी सकाळपासूनच मतदारांनी केंद्रावर गर्दी करण्यास सुरुवात केली. अकोला जिल्ह्यातील विधानसभेच्या पाचही मतदारसंघांमध्ये मतदानासाठी मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडले आहेत. जिल्ह्यात सकाळी पहिल्या दोन तासात६.०८ . टक्के मतदान झाले. त्यानंतर मतदानाला वेग आला. सकाळी ११ वाजेपर्यंत १६.३४. टक्के मतदान झाले. दुपारनंतर मतदान केंद्राबाहेरील रांगांमध्ये वाढ झाली. दुपारी वाजेपर्यंत मतदानाच्या पहिल्या सहा तासांमध्ये अकोला जिल्ह्यात सरासरी २४.८७. टक्के मतदान झाले आहे. यामध्ये अकोट मतदारसंघात २८.७०., बाळापूर २८, अकोला पश्चिम ३२.०६., अकोला ३०.५४. व मूर्तिजापूर मतदारसंघात २४.६६. टक्के मतदान झाले. अकोला जिल्ह्यात खासदार अनुप धोत्रे, वंचित आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर, रणधीर सावरकर आदींनी कुटुंबीयांसह आपला मतदानाचा हक्क बजावला.



वाशीम जिल्ह्यामध्ये तीन विधानसभा मतदारसंघ येतात. या तिन्ही मतदारसंघांमध्ये सकाळपासून शांततेत मतदानाची प्रक्रिया सुरू आहे. काही ठिकाणी मतदान यंत्र बंद पडल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या.

प्रशासनाने त्याची दखल घेऊन मतदान प्रक्रिया सुरळीत केली. वाशीम जिल्ह्यात मतदानाच्या पहिल्या सहा तासांमध्ये सरासरी २४.३१. टक्के मतदान झाले. यामध्ये सर्वाधिक मतदान ३३.७४. टक्के मतदान वाशीम मतदारसंघात झाले. रिसोड मतदारसंघात २४.४२. टक्के, तर सर्वात कमी २३.४४. टक्के मतदान कारंजा मतदारसंघामध्ये झाले आहे. आता शेवटच्या पाच तासात मतदानाची टक्केवारी किती वाढते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### चिन्मयने दिला राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचा संदेश

शहरातील जठारपेठ भागातील रहिवासी दिव्यांग चिन्मय विनोद देव यांनी आज सकाळी ७ वाजताच महाराष्ट्र शाळेतील मतदान केंद्रावर पोहोचून मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचा संदेश दिला. गृहमतदानाची सुविधा उपलब्ध असतानाही ती नाकारून थेट मतदान केंद्रामध्ये व्हीलचेअरवर दाखल होत त्याने मतदान केले. प्रत्येकाने मतदान करून लोकशाही बळकट करण्यास मदत करावी, असे आवाहन चिन्मय याने केले.

# अकोला जिल्ह्यात सरासरी ६५ टक्क्यांपर्यंत मतदान! मतदान केंद्राबाहेर रांगा; मतदार यंत्रात बिघाडी

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २१ :** लोकशाहीच्या उत्सवात मतदारांनी हिरहिरीने सहभाग घेतला. विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी केंद्राबाहेर सकाळपासूनच मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. युवा मतदारांसह ज्येष्ठ मतदारांमध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण दिसून आले. अकोला जिल्ह्यातील पाचही मतदारसंघांमध्ये सायंकाळी वाजेपर्यंत सरासरी . टक्के मतदान झाले. अनेक मतदान केंद्रावर उशीरापर्यंत मतदान सुरू होते. एकूण सरासरी मतदान टक्के झाल्याचा अंदाज आहे. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सकाळी वाजतापासून मतदानाला उत्साहात सुरुवात झाली. मतदानासाठी सकाळपासूनच मतदारांनी केंद्रावर गर्दी करण्यास सुरुवात केली. अकोला जिल्ह्यातील विधानसभेच्या पाचही मतदारसंघांमध्ये मतदानासाठी मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडले. जिल्ह्यात सकाळी पहिल्या दोन तासात . टक्के मतदान झाले. त्यानंतर मतदानाला वेग आला. सकाळी वाजेपर्यंत . टक्के मतदान पार पडले. दुपारनंतर मतदान केंद्राबाहेरील रांगांमध्ये वाढ झाली. दुपारी वाजेपर्यंत मतदानाच्या पहिल्या सहा तासांमध्ये अकोला जिल्ह्यात सरासरी . टक्के मतदान झाले होते. दुपारी वाजेपर्यंत . टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला. सायंकाळी वाजेपर्यंत . टक्के मतदान झाले असून त्यामध्ये अकोट मतदारसंघात ., बाळापूर ., अकोला पश्चिम ., अकोला . व मूर्तिजापूर मतदारसंघात . टक्के मतदान झाले होते. सायंकाळी वाजेपर्यंत मतदानाची मुदत होती.

शेवटच्या टप्प्यात मतदान करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. त्यामुळे सायंकाळी उशीरापर्यंत केंद्रावर मतदारांच्या रांगा दिसून आल्या. जिल्ह्यातील सरासरी मतदान टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. किरकोळ अपवाद वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. बाळापूर तालुक्यातील वाडेगाव, अकोला शहरातील बी.आर हायस्कूल येथे मतदान यंत्रात बिघाड झाल्याचे प्रकार समोर आले. याशिवाय देखील काही ठिकाणी मतदार यंत्रात बिघाडाच्या तक्रारी होत्या.



प्रशासनाने याची तत्काळ दखल घेऊन पर्यायी व्यवस्था केली. प्रशासनाच्यावतीने विविध ठिकाणी तयार केलेले आदर्श मतदान केंद्र आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले.

अकोला जिल्ह्यात खासदार अनुप धोत्रे, वंचित आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर, भाजपचे प्रदेश सरचिटणीस रणधीर सावरकर, अकोला पश्चिमचे विजय अग्रवाल, वंचित समर्थित अपक्ष हरीश आलिमचंदानी, काँग्रेसचे अकोटचे उमेदवार ड. महेश गणगणे, मूर्तिजापूरचे भाजप उमेदवार हरीश पिंपळे आदींनी कुटुंबीयांसह आपला मतदानाचा हक्क बजावला.

# मेळघाटातील सहा गावांचा मतदानावर बहिष्कार, हे आहे कारण

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. २१:** मेळघाटातील रंगूबेली, धोकडा, कुंड, किन्हीखेडा, खोकमार आणि खामदा या सहा गावांमध्ये मतदान केंद्रांवर गावातील एकही नागरिक फिरकला नाही.



ग्रामस्थांनी मतदानावर बहिष्कार टाकल्यामुळे या गावातील मतदान केंद्र ओस पडले आहे. ग्रामस्थांनी मतदान करावे, यासाठी प्रशासनाकडून बरेच प्रयत्न करण्यात आले, मात्र ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. या गावांमध्ये एकूण हजार मतदार आहेत.

सर्वच मतदारांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. गावामध्ये रोड, पाणी, नाल्या, वीज या संदर्भात समस्या आहेत. या समस्या न सुटल्यामुळे नागरिक आक्रमक झाले आहेत. आधी सोयी सुविधा द्या, मग मतदान मागायला या अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.लोकसभा निवडणुकीच्या वेळी मेळघाटातील चार गावांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. यात यावेळी दोन गावांची भर पडली आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी रंगूबेली, धोकडा, कुंड आणि खामदा येथील गावकरी मतदान केंद्रांवर फिरकले नव्हते. मेळघाटात अतिदुर्गम भागात वसलेल्या या चारही गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. या गावात कुठले वाहन देखील पोहोचू शकत नाही, अशी अवस्था आहे. यासह वीज पुरवठा या चारही गावांमध्ये नाही, पिण्याचे पाणी देखील नाही. यासह आरोग्य सेवा देखील या गावांमध्ये उपलब्ध नाही. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी आणि निवेदने सादर करून देखील गावाच्या कुठल्याही प्रश्नांसंदर्भात कोणी दखल घेतली नाही. त्यामुळे या चारही गावातील ग्रामस्थांनी आम्ही मतदान करणार नाही, आमचा निवडणुकीवर बहिष्कार आहे, अशी भूमिका घेतली आहे. नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासनाकडून नागरिकांची मनधरणी करण्याचा प्रयत्न करण्यात आले. मात्र गावकरी बहिष्काराच्या भूमिकेवर ठाम आहेत. जिल्ह्यात शांततेत मतदान आज सकाळी वाजतापासून मतदानाला उत्साहात सुरुवात झाली. मतदानासाठी सकाळपासूनच मतदारांनी केंद्रावर गर्दी करण्यास सुरुवात केली. अमरावती जिल्ह्यातील विधानसभेच्या आठही मतदारसंघांमध्ये मतदानासाठी मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडले आहेत. जिल्ह्यात सकाळी पहिल्या दोन तासात . टक्के मतदान झाले. त्यानंतर मतदानाला वेग आला. सकाळी वाजेपर्यंत . टक्के मतदान झाले. दुपारनंतर मतदान केंद्राबाहेरील रांगांमध्ये वाढ झाली. दुपारी वाजेपर्यंत मतदानाच्या पहिल्या सहा तासांमध्ये अमरावती जिल्ह्यात सरासरी . टक्के मतदान झाले आहे. टक्क्यांच्या वर मतदानाचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# नागपुरात एमबीबीएसला प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली ७० लाखांची फसवणूक

**नागपूर :** शिक्षण प्रत्येकासाठी महत्त्वाचे असून आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी कुटुंबे कोणत्याही थराला जाऊ शकतात. अशीच एक घटना नागपूरच्या जरीपटका पोलीस ठाण्यांतर्गत उघडकीस आली असून, मुलीला पीजी वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली वडिलांकडून७० लाख रुपये उकळण्यात आले आहेत. मात्र, पैसे भरूनही प्रवेश न मिळाल्याने प्रकरण पोलीस ठाण्यात पोहोचले. आता पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.जरीपटका येथील रहिवासी व्यापारी सतीश लालवानी आपल्या मुलीला उच्च शिक्षण देण्यासाठी चांगल्या महाविद्यालयाच्या शोधात होते.यावेळी त्याची ओळख मेडिकल चौकात राहणारा सौरभ कुलकर्णी याच्याशी झाली. ज्याने आपल्या मुलीला केम्पेगौडा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, केआयएमएस मेडिकल कॉलेज, बेंगळुरू येथे एमडी टर्मिनोलॉजीमध्ये प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवले.यासाठी त्याने इतर मित्र के. कृष्णमूर्ती, नन्ना अनिश आणि जुनैद यांच्याशी ओळख करून दिली. आणि प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली२ २ कोटी ३६ ३६ लाख रुपयांना करार झाला. त्यासाठी आरोपीने आधी त्याच्याकडून ७० लाख रुपये घेतले.त्यानंतर त्यांच्या मुलीला प्रवेश न मिळाल्याने लालवानी यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. जरीपटका पोलीस स्टेशनमध्ये लालवानी यांनी कुलकर्णी याच्याविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरु केला आहे.




# अमरावतीत तिरंगी लढतीत कुणाची बाजी?

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. २१:** जिल्ह्यातील राजकारणावर दीर्घकाळ वर्चस्व ठेवून असलेल्या तीन दिग्गजांची अमरावती विधानसभा मतदारसंघातील लढत ही लक्षवेधी ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) उमेदवार सुलभा खोडके, काँग्रेसचे डॉ. सुनील देशमुख आणि भाजपचे बंडखोर जगदीश गुप्ता यांच्यासाठी ही निवडणूक राजकीय अस्तित्वाची परीक्षा घेणारी आहे.







सुलभा खोडके यांनी सर्वजातीय मतांची मोट बांधण्याचे प्रयत्न केले असताना डॉ. सुनील देशमुखांची मदार ही मुस्लीम मतांवर आहे. जगदीश गुप्तांनी हिंदुत्वाचा झेंडा हाती घेऊन वातावरण तापवले आहे. जातीयदृष्ट्या संमीश्र असलेल्या या मतदारसंघात काँग्रेसचे वर्चस्व अनेकवेळा सिद्ध झाले आहे. गेल्यावेळी सुलभा खोडके या काँग्रेसच्या उमेदवारीवर निवडून आल्या होत्या. त्यांची जवळीक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत असल्याने त्या काँग्रेसच्या स्थानिक राजकारणापासून दूर होत गेल्या. पण, त्यांचे पती राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके यांच्या कार्यकर्त्यांचे जाळे हे सुलभा खोडके यांच्यासाठी बलस्थान आहे. सर्वच समाजघटकांचे सहकार्य मिळवण्याचा खोडके यांचा प्रयत्न प्रचारादरम्यान दिसून आला. गेल्या पाच वर्षात मतदारसंघात केलेल्या विकासकामांच्या आधारे त्यांनी मतदारांना आवाहन केले.

डॉ. सुनील देशमुख यांनी देखील त्यांच्या कार्यकाळात केलेल्या विकासकामांना प्रदर्शित करून मते मिळवण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसची परंपरागत मते हा जनाधार टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले आहेत.

अमरावती विधानसभा मतदारसंघातील एकगठ्ठा मुस्लीम मतांवर अनेकांचा डोळा आहे. प्रहारच्या उमेदवारीवर निवडणूक लढविणारे डॉ. सैय्यद अबरार यांनी अखेरच्या माघार घेत काँग्रेसला पाठिंबा दिल्याने डॉ. सुनील देशमुख यांचे बळ वाढले आहे. पण, त्याचवेळी निवडणूक रिंगणात इतर सहा मुस्लीम उमेदवार रिंगणात आहेत.

याशिवाय मनसेचे पप्पू पाटील यांच्यामुळे होणारी मतविभागणी कुणाच्या पथ्यावर पडणार, याचे औत्सुक्य आहे.

दुसरीकडे, भाजपचे बंडखोर उमेदवार जगदीश गुप्ता यांनी आपल्या पालकमंत्रीपदाच्या काळात शहरात झालेली विकासकामे आणि नंतर झालेली दुरवस्था मांडत मते मागण्यास सुरूवात केली, पण त्यांचा भर हिंदुत्ववादी मतांच्या एकत्रिकरणावर आहे.

हिंदी भाषिकांची मते ही त्यांची मतपेढी किती वाढते, यावर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवा) पक्षाचे गणित ठरणार आहे. बडनेराचे आमदार रवी राणा हे महायुतीचे घटक असले, तरी त्यांनी जगदीश गुप्ता यांना समर्थन दिल्याने महायुतीत ठिणगी पडली. आमदार प्रवीण पोटे यांचा गट खोडकेंसोबत आहे.

प्रवीण पोटे यांच्या गटाला राणा दाम्पत्याचा भाजपमधील वाढता हस्तक्षेप हा खटकणारा ठरला आहे. त्याविषयी पोटे यांनी उघड नाराजी देखील व्यक्त केली आहे. तरीही राणा हे उघडपणे खोडके यांच्या विरोधात समोर आले. प्रवीण पोटे यांचे बळ खोडकेंना कितपत लाभते, याची उत्सुकता आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **TUSHAR MANDAL.** NOW MY NEW NAME IS **TUSHARKANTI MANDAL.**
**ADD :** SAMPA MANDAL, FLAT 2 FLOOR NO 1, SHIVDYAL APARTMENT, 12 HINDUSTAN COLONY ROAD, AMRAVATI ROAD, NAGPUR, MAHARASHTRA 440033

MY OLD NAME WAS **ANWAR HUSSAIN SIDDIQUI.** NOW MY NEW NAME IS **ANWAR AHMED SIDDIQUI.**
**ADD :** NEAR KAWARE NURSING HOME, BADA BAJAR, MUSLIM LAIBRARY ROAD, JAMANALAL BAJAJ WARD, BHANDARA - 441904

MY OLD NAME WAS **RUKHSANA PARVEEN ANWAR HUSSAIN SIDDIQUI.** NOW MY NEW NAME IS **RUKHSANA ANWAR SIDDIQUI.**
**ADD :** NEAR KAWARE NURSING HOME, BADA BAJAR, MUSLIM LAIBRARY ROAD, JAMANALAL BAJAJ WARD, BHANDARA - 441904

MY OLD NAME WAS **SHAB NOOR BEE D/O SHAIKH CHAND.** NOW MY NEW NAME IS **SHABNOOR HAMID KHAN.**
**ADD :** PATEL NAGAR, BORGAON, NAGPUR 440013 MS

MY PASSPORT NO.G3793058 ISSUANCE AT NAGPUR IS MY INCORRECT NAME WAS **VISHAL JADHAO** MY NEW NAME IS **VISHAL GAJANAN JADHAO**
**ADD:** 23/A, HARIOM COLONY, SAI NAGAR, AMRAVATI 444007 MS

**फॉर्म क्रमांक URC-2**
**अंतर्गत नोंदणीची सूचना देणारी जाहिरात**
**अध्याय XXI चा भाग I**
**कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३७४(ब) आणि कंपनी (नोंदणीसाठी अधिकृत) नियम, २०१४ च्या नियम ४(१) नुसार**

१. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३६६ च्या पोटकलम (२) च्या अनुषंगाने, पंधरा दिवसांनंतर, परंतु त्यानंतरच्या ३० दिवसांची मुदत संपण्यापूर्वी एक अर्ज प्रस्तावित आहे मुंबई येथील रजिस्ट्रारला बीए ॲग्री सोल्यूशन्स एलएलपी- मर्यादित दायित्व भागीदारी कंपनी कायदा २०१३ च्या अध्याय XXI च्या भाग I अंतर्गत, शेअर्सद्वारे मर्यादित कंपनी म्हणून नोंदणीकृत केली जाऊ शकते.

२. कंपनीचे मुख्य उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहेत:

अ. खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, कीटकनाशके आणि कीटकनाशके, पशुवैद्यकीय आणि पशुधन फीड्स आणि खाद्य पूरक आहार, फिश फीड यांसारख्या सर्व प्रकारच्या कृषी निविष्ठांमध्ये उत्पादक, आयातदार, निर्यातदार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, व्यापारी आणि डीलर म्हणून व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी आणि त्याचे पूरक, कृषी उपकरणे, कृषी यंत्रे, ई-कॉमर्स पोर्टलद्वारे व्यवहार करण्यासह.

ब. आयात, निर्यात, विक्री आणि सर्वसाधारणपणे सर्व प्लांट आणि यंत्रसामग्री, अवजारे, उपकरणे, साधने, वस्तू किंवा वस्तू खरेदी करण्यासाठी आणि सर्व प्रकारची आधुनिक कृषी अवजारे, पशुवैद्यकीय, पशुधन आणि कुक्कुटपालन उपकरणे तसेच कुक्कुटपालन, शेती, कृषी व्यवसाय, मत्स्यपालन आणि संबंधित क्रियाकलाप चालवणे.

क. दलाल, व्यापारी, एजंट, सी आणि एफ एजंट, शिपर, कमिशन एजंट, वितरक, प्रतिनिधी, फ्रँचायझी २ सल्लागार, सहयोगी, स्टॉकिस्ट, संपर्ककर्ता, जॉब वर्कर, वस्तूंचे निर्यात गृह, व्यापारी यांची नियुक्ती करणे.

३. मसुदा मेमोरँडमची प्रत आणि प्रस्तावित कंपनीच्या असोसिएशनच्या लेखांची प्लॉट नं.११, आकाश इस्टेट, स्वागत को-ऑपरेटिव्ह गृहनिर्माण संस्था, नागपूर, सोनेगाव-४४००२५ येथील कार्यालयात तपासणी केली जाऊ शकते.

४. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की या अर्जावर आक्षेप घेणारी कोणतीही व्यक्ती आपली हरकत केंद्रीय नोंदणी केंद्र (सीआरसी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए) प्लॉट नं. ६,७,८, सेक्शन ५५, आयएमटी, मानेसर, जिल्हा गुडगाव (हरियाणा), पिनकोड १२२०५० ही सूचना प्रकाशित झाल्यापासून एकवीस दिवसांच्या आत, कंपनीला त्याच्या नोंदणीकृत कार्यालयात रजिस्ट्रारला लेखी कळवू शकते.

दिनांक २१ नोव्हेंबर २०२४ रोजी.

बीए ॲग्री सोल्यूशन्स एलएलपी साठी
श्री. अक्षय देव/श्री. दिलीप पांडे
नियुक्त भागीदार
पीआय नं.११, आकाश इस्टेट, स्वागत कंपनी ऑप. गृहनिर्माण संस्था,
नागपूर, सोनेगाव-४४००२५

# पिक्चर अभी बाकी है...!





महाराष्ट्रात बुधवारी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडले. मतदानाची वेळ संपल्यानंतर एग्झिट पोल्सचे आकडे जाहीर झाले. बहुतांश एग्झिट पोल्सनी महायुतीला बहुमत मिळेल, असा अंदाज वर्तवला आहे. काही एग्झिट पोल्सच्या दाव्यानुसार महाविकास आघाडी सुद्धा बाजी मारु शकते.

एग्झिट पोल्सच्या आकड्यांवर नजर टाकली, तर यंदाची निवडणूक पूर्णपणे एकतर्फी होणार नाही. बहुतांश एग्झिट पोल्सचे आकडे पाहिल्यानंतर महाराष्ट्रात सत्ता स्थापनेसाठी अटी-तटीचा सामना होईल असं दिसते. एग्झिट पोल्सचे आकडे योग्य ठरले, तर यंदा सत्ता स्थापनेत महाराष्ट्रात अपक्ष किंगमेकर ठरु शकतात. 23 तारखेला निकाल जाहीर झाल्यानंतर चित्र स्पष्ट होईल. महाराष्ट्रात एकूण सात प्रमुख पक्ष निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा मुख्य सामना आहे. मनसे स्वतंत्रपणे निवडणूक लढवतोय.

महाराष्ट्राच्या यंदाच्या निवडणुकीचा निकाल यासाठी सुद्धा खास आहे, कारण यावेळच्या विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक 65.1 टक्के मतदान झालय. मागच्या 30 वर्षात सर्वाधिक मतदान महाराष्ट्रात झालाय. मुंबईबद्दल बोलायच झाल्यास 36 पैकी 34 सीट्सवर मतदानाची टक्केवारी वाढली आहे. मतदान संपल्यानंतर वेगवेगळ्या आघाड्या आपल्या विजयाचा दावा करत आहेत. लाडकी बहिण योजना गेमचेंजर ठरेल. निवडणुकीत याचा फायदा होईल असा महायुतीचा दावा आहे. पूर्ण बहुमताने पुन्हा सत्तेवर येणार असा महायुतीचा दावा आहे. लाडकी बहिण योजनेचे पैसे थेट महिलांच्या खात्यात जमा करण्याचा मोठा फायदा होईल याबद्दल महायुतीचे नेते आशावादी आहेत.

### एक्झिट पोलवर अविश्वास

एक्झिट पोलच्या आकड्यांवर सध्या तरी विश्वास ठेवण्याचे कारण नाही, कारण लोकसभा निवडणूक आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या वेळी हे आकडे चुकले होते.

लोकसभेला बहुतांश एक्झिट पोल्सनी भाजपा स्वबळावर 272 चा आकडा ओलांडणार असं म्हटलेलं. पण प्रत्यक्षात तसं घडलं नाही. भाजपाला 240 जागांवर समाधान मानाव लागलं.

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्यावेळी सर्वच एग्झिट पोल्सनी भाजपाचा दारुण पराभव होईल असा अंदाज वर्तवलेला. कारण दहा वषार्पासून सत्तेत असल्यामुळे प्रस्थापित सरकार विरोधात लाट आहे, त्यात भाजपाचा पराभव होईल असा कयास होता. पण प्रत्यक्षात घडलं उलटं. भाजपाचा विजय झाला.

महाराष्ट्रासंदर्भातही एक्झिट पोल्सच्या आकड्यांवर विश्वास ठेवण्यात पॉईंट नाही. कारण मतदान संपल्या, संपल्या एक्झिट पोल्सचे आकडे जाहीर झाले. पण शेवटच्या दोन-तीन तासात मतदानाचा जोर जास्त होता. शिवाय यंदा महाराष्ट्रात 30 वषार्तील सर्वात जास्त मतदान झालय. त्यामुळे एक्झिट पोल्सच्या आकड्यांवर कितपत विश्वास ठेवावा, हा प्रश्नच आहे.

ज्यावेळी मतदान जास्त होतं, त्याचा अर्थ असा काढला जातो की, प्रस्थापित सरकार विरोधात एक लाट असते. पण सरकारने लाडकी बहिण सारख्या अन्य कल्याणकारी ज्या योजना आणल्या, त्यामुळे सुद्धा मतदानाची टक्केवारी वाढल्याची एक शक्यता नाकारता येत नाही. तथापि, मतदानाची टक्केवारी वाढणे पोषक असल्याचे दिसते.

### सट्टा बाजाराचा अंदाज काय?

राज्यात सट्टा बाजाराला सुद्धा विधानसभा निवडणुकीचा रंग चढला आहे. सट्टा बाजाराकडे अनेकांचे लक्ष लागले होते. फलोदी सट्टा बाजाराच्या आकडेवारीनुसार, राज्यात भारतीय जनता पक्षाला मोटे यश मिळत असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर येत आहे. राज्यात भाजपाला 90 ते 95 जागा मिळण्याची शक्यता आहे.

### शिवसेना शिंदे गटाला किती जागा?

भाजपासोबत मित्र पक्ष शिवसेना शिंदे गट सुद्धा सत्तेत आहे. शिंदे गटाला राज्यात 36 ते 40 जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. तर महायुतीत सहभागी अजित पवार राष्ट्रवादी पक्षाला सट्टा बाजाराच्या अंदाजानुसार, 12 ते 16 जागांवर विजयाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. फलोदी सट्टा बाजाराच्या अंदाजानुसार, राज्यात महायुती 142-151 जागा काबीज करेल आणि पुन्हा महायुतीचे सरकार सत्तेत येईल.

### बीकानेर, महादेव ऑनलाईनचा कौल

फलोदी सट्टा बाजारच नाही तर बीकानेर सट्टा बाजार आणि महादेव ऑनलाईन सट्टा बाजाराने पण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील विजयाचा अंदाज वर्तवला आहे. या दोन्ही सट्टा बाजारांनी महायुतीवर शिक्कामोर्तब केले आहे. पण या दोन्ही सट्टा बाजारांनी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये सत्ता स्थापनेसाठी कॉंटे की टक्कर असेल असा दावा केला आहे.

दोन्ही गटात अत्यंत कमी फरक असेल. त्यामुळे राज्यात अपक्ष आणि बंडखोरांना अधिक भाव असेल असा अंदाज वर्तवला आहे. यावेळी अपक्षांशिवाय कोणतेही सरकार सत्तेत येणार नाही, असा दावा मतदानापूर्वीच वर्तवण्यात येत होता.

### अपक्षांचे भाव वाढणार?

राजकीय विश्लेषकांच्या मते राज्यात महायुती किंवा महाविकास आघाडी यापैकी कुणालाही एकहाती सत्ता मिळेल, असे चित्र सद्धयातरी दिसत नाही. देशात प्रचंड प्रमाणात वाढलेली महागाई, भ्रष्टाचार, वाढती गुन्हेगारी, प्रकल्पांचे राज्यातून पलायन, धार्मिक आणि जातीय तेढ, पक्ष फोडाफोडी, मराठा आरक्षणाचा रेंगाळलेला विषय आणि या सर्वांबाबत महाविकास आघाडीने घेतलेली आक्रमक भूमिका यामुळे महायुती बहुमताच्या वर जाईल, असे संकेत नाहीत.

दुसरीकडे, आघाडीकडे स्टार प्रचारकांची वाणवा, आपसातील गोंधळ, पैशांची कमतरता आणि अशाच काही कारणांमुळे आघाडी बहुमतात आघाडी घेईल, असेही दिसत नाही. एकूणच, काय तर प्रत्येकाची धाकधूक वाढली असून, शनिवारी चित्र स्पष्ट होईल.

●●●●●●●●

# यावेळीही तोच गोंधळ!

राज्यात काही ठिकाणच्या किरकोळ घटना वगळता यंदाची विधानसभा निवडणूक तशी व्यवस्थित पा पडली. ४१३६ उमेदवारांचे भवितव्य मशीनबंद झाले. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, आध्यात्मिक संस्था, संप्रदाय, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले.

मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, मतदारांना मतदानासाठी फार लांब जावे लागू नये म्हणून यंदा मतदान केंद्रांची संख्याही वाढवण्यात आली होती. सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते. देशातील महनीय व्यक्तींच्या फोन कॉलसह बस स्टॅन्ड, रेल्वे स्थानके यांसारख्या ठिकाणी अनाउन्समेंट करून लोकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले;

मतदारांना करण्यात आलेले धार्मिक आवाहन हें यंदाच्या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती करूनही दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. लोकसभेच्या तुलनेत मुंबईतील मतदानाचा टक्का वाढला असला तरी ज्या प्रमाणात जनप्रबोधन झाले होते त्या तुलनेने वाढलेली टक्केवारी अगदीच नगण्य आहे. मतदारांतील निरुत्साह यंदा पुन्हा दिसला. असे असले तरी यंदा उत्साही मतदारांची ठिकठिकाणी घोर निराशा झाल्याचे चित्रही अनेक ठिकाणी दिसले.

वयाची कितीतरी मतदारांची नावे त्यावेळेसही मतदार याद्यांमधून गायब झाली होती. मुंबईतील घरे भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती.

एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी लोकसभा निवडणुकीला मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का?

भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात?

मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते ?

निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे ? लोकसभा निवडणुका झाल्यानंतर विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता. या काळात याद्या अध्यवत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला. या गोंधळाला उत्तरदायी असणा?यांवरही कठोर कारवाई करण्याची मागणीही केली जात आहे. निवडणूक आयोगाचा हा भोंगळ कारभार नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी अविश्वास तर निर्माण करतोच, शिवाय बोगस मतदानासही वाव मिळवून देत आहे असे मत राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले गेले आहे. याशिवाय अनेक मतदार याद्यांमध्ये महिला मतदाराच्या नावासमोर पुरुषाचे छायाचित्र तर पुरुष मतदारांच्या नावापुढे महिलेचे छायाचित्र लावल्याचे दिसून आले. काही मतदारांची नावे यंदा नेहमीच्या मतदान केंद्रात न येता भलत्याच मतदान केंद्रांना जोडली गेल्याने त्यांना विनाकारण धावपळ करावी लागत होती. काही ठिकाणी ईव्हीएम मशिन्स बंद पडल्याने मतदारांचा संताप अनावर झालेला पाहायला मिळाला.

राज्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही.

नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे.

निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात.

केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का?

या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायाला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या विधानसभा निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

●●●●●

# दूरदर्शनः एक दृकश्राव्य माध्यम!

**विश्व दूरदर्शन दिन २१ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. जागतिक दूरचित्रवाणी दिन साजरा करण्याचा उद्देश जगभरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांपलीकडे दूरदर्शनचे महत्त्व पटवून देणे, हा आहे. जागतिक दूरचित्रवाणी दिन हा केवळ उपकरणांचा उत्सव नसून दूरदर्शनमागील तत्त्वज्ञान आहे.**

---

जागतिक दूरदर्शन दिन- वर्ल्ड टेलिव्हिजन डे दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. त्याचा शोध लागल्यापासून, टेलिव्हिजन हे सामान्य लोकांच्या जीवनातील मनोरंजनाचे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे. दूरचित्रवाणीच्या माध्यमातून लोक अनेक वर्षांपासून शिक्षण, बातम्या, राजकारण, मनोरंजन आणि गप्पांचा आनंद घेत आहेत.

जागतिक दूरचित्रवाणी दिन साजरा करण्याचा उद्देश जगभरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांपलीकडे दूरदर्शनचे महत्त्व पटवून देणे हा आहे. जागतिक दूरचित्रवाणी दिन हा केवळ उपकरणांचा उत्सव नसून दूरदर्शनमागील तत्त्वज्ञान आहे. टेलिव्हिजनचा शोध लागल्यापासून ते मनोरंजनाचा एक मुख्य स्त्रोत बनले आहे. लोकांचे मनोरंजन करण्यात सोबतच लोकांपर्यंत माहिती, शिक्षण आणि प्रसारित करण्यात टेलिव्हिजनने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

या लेखात, तुम्हाला जागतिक दूरचित्रवाणी दिनाचा इतिहास, महत्त्व आणि महत्त्वाच्या तथ्यांबद्दल माहिती मिळेल. का साजरा केला जातो जागतिक दूरदर्शन दिन? त्याचा शोध लागल्यापासून दूरदर्शन हे लोकांसाठी मनोरंजनाचे एक महत्त्वाचे साधन आहे.

१५ सप्टेंबर १९५९ रोजी भारतात पहिल्यांदा टेलिव्हिजन लाँच करण्यात आले. त्यावेळी दूरचित्रवाणीने देशाला एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्या काळात हम लोग, बुनियाद, रामायण आणि महाभारत यांसारखे लोकप्रिय शो टेलिव्हिजनवर यायचे, ते पाहण्यासाठी टीव्हीच्या पडद्यासमोर लोकांची गर्दी व्हायची.

म्हणूनच केवळ इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या पलीकडे जनमताची मांडणी करण्याची ताकद असलेल्या शिक्षणाचा स्त्रोत म्हणून टेलिव्हिजनचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी जागतिक दूरदर्शन दिनाची स्थापना केली.

जागतिक दूरदर्शन दिन दरवर्षी कोणत्याही विशिष्ट थीमसह साजरा केला जात नाही. यामध्ये विविध विषयांवर चर्चा करून, त्याची सोडवणूक केली जाते. वर्षानुवर्षे, टेलिव्हिजनचा एक अद्वितीय जागतिक व्यासपीठ म्हणून वापर करणे, सांस्कृतिक सहअस्तित्व आणि बंधुत्वाच्या माध्यमांना प्रोत्साहन देणे, विविध संस्कृतींच्या लोकांमधील दरी कमी करणे आणि राष्ट्राच्या भल्यासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन देणे, ही भूमिका भौगोलिक कार्यात दूरदर्शन इत्यादी चर्चेचा एक भाग आहे.

जागतिक दूरदर्शन दिनाची पार्श्वभूमी- संयुक्त राष्ट्रांनी डिसेंबर १९९६ मध्ये २१ नोव्हेंबर हा जागतिक दूरचित्रवाणी दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. त्यात झालेल्या पहिल्या वर्ल्ड टेलिव्हिजन फोरमच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी जागतिक दूरदर्शन दिन साजरा केला जातो.

लोकांच्या निर्णयक्षमतेवर दृकश्राव्य माध्यमांचा वाढता प्रभाव आणि इतर प्रमुख मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात त्याची संभाव्य भूमिका ओळखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी नंतर एक ठराव स्वीकारला. त्यामुळे जनमताची माहिती, व्यवस्था आणि प्रभाव पाडण्याचे प्रमुख साधन म्हणून दूरदर्शन स्वीकारले गेले. दूरचित्रवाणी देखील आज संप्रेषण आणि जागतिकीकरणाचे प्रतिनिधित्व करते.


जागतिक दूरदर्शन दिनाचे महत्त्व- युनायटेड नेशन्स- युएनने ही कल्पना लोकप्रिय केली की, टेलिव्हिजन हे समकालीन जगात जागतिकीकरण आणि संवादाचे प्रतीक आहे. लोकांच्या मनोरंजनासोबत कुटुंबाला एकत्र ठेवण्यासाठी टेलिव्हिजनने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दूरचित्रवाणीने कुटुंबातील सदस्यांना एकमेकांच्या जवळ आणले.

दूरदर्शन हे माहिती आणि शिक्षणाचे प्रमुख स्त्रोत आहे, ते लोकांच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेवर देखील प्रभाव टाकते. कारण ते जगात होत असलेल्या संघर्षांकडे लोकांचे लक्ष वेधून घेते. जागतिक दूरचित्रवाणी दिन देखील समाजावर परिणाम करणा?या महत्त्वाच्या समस्या आणि घटनांबद्दल निःपक्षपाती माहिती प्रदान करण्यासाठी, दूरचित्रवाणी माध्यमांच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी सरकार, संस्था आणि व्यक्तींच्या भूमिकेचे कौतुक करण्यासाठी साजरा केला जातो.

दूरदर्शन आणि त्याचा शोध- टेलिव्हिजन हे प्रसारण माध्यम म्हणून परिभाषित केले आहे. यामध्ये प्रतिमा किंवा चित्रे विद्युत सिग्नलमध्ये रूपांतरित केली जातात, जी नंतर निवडक माध्यमावर प्रसारित केली जातात आणि प्रतिमा योग्य बाह्य स्क्रीनवर प्रदर्शित केल्या जातात.

सन १९२४ मध्ये स्कॉटिश अभियंता जॉन लोगी बेयर्ड यांनी टेलिव्हिजनचा शोध लावला होता. युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशनच्या सहकार्याने भारतात सन १९५९मध्ये नवी दिल्ली येथे टेलिव्हिजनची सुरुवात झाली.

सन १९९१च्या आर्थिक सुधारणा होईपर्यंत सरकारी मालकीचे दूरदर्शन हे एकमेव राष्ट्रीय चॅनेल राहिले होते. त्यानंतर खाजगी आणि परदेशी प्रसारकांना मर्यादित ऑपरेशन्समध्ये गुंतण्याची परवानगी देण्यात आली.!! आंतरराष्ट्रीय टीव्ही दिवसाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



कृष्णकुमार गोविंदा
निकोडे गुरूजी
रामनगर, गडचिरोली.
९४२३७१४८८३.

●●●●●●

# अपक्षांचे बल्लेबल्ले...

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे मतदान नुकतंच पार पडले. यंदाच्या निवडणुकीत महाविकासआघाडी विरुद्ध महायुती अशी लढत पाहायला मिळाली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या मतदानानंतर आता

महाराष्ट्रातील एक्झिट पोल समोर आले. टीव्ही 9 रिपोर्टरच्या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुतीला 129 ते 139 जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर महाविकासआघाडीला 136-145 जागा मिळू शकतात असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. तर इतर आणि अपक्ष यांना 13 ते 23 जागा मिळू शकतात असा अंदाज आहे.

त्यातच आता प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी एक मोठा दावा केला आहे. महाराष्ट्रात आमच्याशिवाय सरकार स्थापन होऊ शकत नाही, असे विधान बच्चू कडू यांनी केले आहे.

बच्चू कडू यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या निकालासंदर्भात काही प्रश्न विचारण्यात आले. प्रहार जनशक्ती पक्षाचे १५ आमदार निवडून येणार आहे. त्यासोबतच अनेक अपक्ष आमदारांच्याही आम्ही संपर्कात आहोत. त्यामुळे आमच्याशिवाय सरकार स्थापन होऊ शकत नाही, असा दावा बच्चू कडू यांनी केला आहे.

माझ्या मतदारसंघात भाजपने अतिशय खालच्या पातळीवर राजकारण केले आहे. कॉंग्रेस आणि भाजप हे संभ्रमात आहे. मात्र माझा विजय हा निश्चित होणार आहे. राज्यात आम्हीच सत्ता स्थापन करणार आहे, हे सूर्यप्रकाशाएवढं सत्य आहे.

आम्ही सत्ता स्थापन करु आणि एखाद्या मोठया पक्षाला आम्हाला पाठिंबा द्यावा लागेल. आमच्या शिवाय सरकार स्थापन होऊ शकत नाहीह्व, असा दावा बच्चू कडू यांनी केला आहे.

आमचे 15 आमदार निवडून येणार आहेत. अनेक अपक्ष आमदारांच्या आम्ही संपर्कात आहोत. आम्ही अपक्ष आमदारांची मोटं बांधणी करु. आम्ही कोणाला सोबत घ्यायचं ते आता आम्ही ठरवणार आहे. आम्ही कुणासोबत जाणार हे मोठे पक्ष ठरवू शकत नाही. राज्यातील सरकार अपक्ष आणि लहान पक्ष चालवणार आहे.

सरकार आमचं असेल. मोठे पक्ष पाठिंबा देतील. आता मोठ्या पक्षासाठी आमचा फोन नॉट रीचेबल राहील, असे बच्चू कडूंनी म्हटले.

●●●●●





# हिवाळ्यात राहा निरोगी बनवा गुळाच्या स्वादिष्ट रेसिपी

गुळाचे कार्य फक्त जेवणाची चव वाढवणे हेच नसून तर गुळ आरोग्यासाठी देखील अत्यंत फायदेशीर आहे. गुळामध्ये प्रथिने, पोटॅशियम, हेल्दी फॅट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, लोह, व्हिटॅमिन बी, कॅल्शियम यासारख्या पोषक तत्त्वांचा समावेश आहे. गूळ हा गरम असतो त्यामुळे हिवाळ्यात त्याचे सेवन करणे फायदेशीर मानले जाते.

**तिळगुळाचे लाडू :** १ वाटी गूळ २ कप भाजलेले तीळ १ चमचा तूप १ टीस्पून वेलची पावडर १ टेबलस्पून बारीक वाटलेले बदाम १ टेबलस्पून बारीक वाटलेले काजू

कढईमध्ये तूप गरम करून त्यात गूळ घालून वितळू द्या. यानंतर त्यामध्ये वेलची पावडर बदाम, काजू आणि भाजलेले तीळ मिक्स करा. हे मिश्रण थंड झाल्यावर त्याचे लाडू बांधून घ्या.

**शेंगदाणा चिक्की :** २५ ग्रॅम लोणी किंवा तूप २५० ग्रॅम शेंगदाणे २०० ग्रॅम गूळ १/२ कप पाणी

सर्वप्रथम शेंगदाणे भाजून बारीक करून घ्या. पाक तयार करण्यासाठी पाण्यात गुळ घालून पाक घट्ट होईपर्यंत शिजवा. शिजल्यानंतर ट्रे मध्ये पाक टाका आणि त्यावर शेंगदाणे टाका. यानंतर हे मिश्रण कापून एका बाजूला ठेवा.

**गोड शेव :** २०० ग्रॅम बेसन २५० ग्रॅम गूळ २ चमचे तेल १ चमचा तूप

बेसन पिठामध्ये दोन थेंब तेल आणि थोडे पाणी घालून मळून घ्या. आता कढईत तेल घालून बेसन पिठाला शेवचा आकार देऊन तळून घ्या. दुसरीकडे पाण्यात गुळ मिसळून पाक तयार करा. तयार पाक शेव वर टाका. गोड शेव खाण्यासाठी तयार आहे.

**गुळाची खीर:** १ कप भाजलेले तांदूळ 2 लिटर दूध १०० ग्रॅम गूळ ४ हिरव्या वेलची १/२ कप ड्राय फ्रूट्स १ टीस्पून चारोळी

सर्वप्रथम एका पातेल्यात दूध आणि भाजलेले तांदूळ शिजवायला ठेवा. दूध आणि तांदूळ शिजल्यानंतर वेलची आणि चारोळी मध्यम आचेवर शिजवून घ्या. नंतर यात गुळाचे तुकडे घालून खीर गूळ वितळेपर्यंत उकळवा. शेवटी ड्रायफ्रूट्स घालून खीरचा आस्वाद घ्या. ■ ■

# अशोकायन

## दिल थामके बैठो..!

झालं गेलं पार पडलं
एकदाचं मतदान
ईव्हीएममधे दडलयं काय
चर्चेला आलय उधाण..!

पारावरच्या चिलमी गप्पा
भलत्याच रंगताहेत
मिशीवर ताव देऊन
शर्यती लावताहेत..!

जो तो म्हणतो आमचाच
उमेदवार निवडून येणार
किसमे कितना दम चा
तेवीसला पदार्फाश होणार..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## 'एग्जिट पोल' म्हणजे निकालापूर्वीचे मनोरंजन!

वाचक लिहितात

राज्याच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या आणि तासाभरात राज्यातील समस्त वृत्तवाहिन्यांनी एग्जिट पोलचा निकष दाखवण्यास सुरुवात केली. मागील काही वर्षांपासून निवडणुकानंतर एक्सिट पोलचे निकाल दाखवण्याची प्रथा भारतात जोर धरू लागली आहे.

कोणत्यातरी संस्थांच्या मार्फत हे एग्जिट पोल आखले जातात आणि वृत्तवाहिन्यांशी संगनमत करून ते लोकांसमोर ठेवले जातात. हें एग्जिट पोल वृत्तवाहिन्यांच्या पडद्यावर दाखवताना स्टुडिओमध्ये चर्चा घडवून आणण्यासाठी प्रमुख पक्षांच्या प्रतिनिधींना, राजकीय विश्लेषकांना निमंत्रित केले जाते.

एग्जिट पोलने दाखवलेल्या आकडेवारीच्या अनुषंगाने एखाद्या क्षेत्रातील पक्षाची घसरण अथवा प्रगतीच्या अनुरूप पक्षाच्या प्रतिनिधिला प्रश्न विचारले जातात आणि त्यातून आम्ही दाखवलेला एग्जिट पोल कसा खरा आहे हे त्यांच्याकडून वदवण्याचा प्रयत्न केला जातोः मात्र या प्रयत्नांना यश कधीच येत नाही.

प्रत्येक पक्षाच्या प्रतिनिधीची उत्तरे ठराविक आणि एकसारखीच असतात ती म्हणजे 'खरे काय ते निकालाच्या दिवशीच कळेल'.

'राज्याच्या विकासासाठी यावेळेस जनतेने आम्हालाच मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे' 'आम्हालाच स्पष्ट बहुमत मिळून राज्यात आमचेच सरकार बनेल'. मुलाखतकाराने कितीही उलट सुलट प्रश्न विचारले तरी या मंडळींच्या उत्तरांमध्ये मात्र फारसा फरक पडत नाही.

वृत्तवाहिन्यांवरील एकूणच माहोल पाहता एग्जिट पोलचा दिवस म्हणजे वृत्तनिवेदकांची, संपादकांची आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची जणू रंगीत तालीम असते. लाखो रुपये व्यय करून मांडण्यात येणारे हें एग्जिट पोल वेगवेगळ्या वाहिन्यांवर थोड्याबहुत फरकाने वेगवेगळे असतील याची विशेष दक्षता घेतली जाते.

यापूर्वीच्या निवडणुकापूर्वी मांडण्यात आलेले एग्जिट पोलचे अंदाज आणि प्रत्यक्षात निवडणुकांतील आकडेवारी यामध्ये मोठी तफावत येत असल्याचे लक्षात आले आहे त्यामुळे यंदासुद्धा एग्जिट पोल्सने मांडलेल्या निकालाच्या अंदाजांना निकालापूर्वीच्या मनोरंजनाव्यतिरिक्त फारशी किंमत आहे असे वाटत नाही.

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

# वाहनाची दुचाकीस धडक; बाप-लेकाचाजागीच मृत्यू:हतेडी प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील घटना

**धडकेत बाप-लेक रस्त्याच्या काही फुट बाजूला फेकले गेले.**

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. २१ :** बुलडाणा भरधाव जाणाऱ्या प्रवासी वाहनाने समोरुन येत असलेल्या दुचाकीस जबर धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील बाप-लेकजागीच ठार झाल्याची घटना १४ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास बुलडाणा- धाड मार्गावरील हतेडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ घडली. विजय शेषराव जाधव (वय ) व कार्तिक विजय जाधव (वय ११) रा. कोलवड असे मृतक बाप लेकाची नावे आहेत. शहरापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या कोलवड येथील विजय शेषराव जाधव आणि त्यांचा मुलगा कार्तिक जाधव हे बाप-लेक दुचाकीने धाड कडून आपल्या गावी कोलवडला येत होते. दरम्यान बुलडाण्याहून धाडच्या दिशेने जात असलेल्या प्रवासी वाहनाने हतेडीच्या प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ त्यांच्या दुचाकीला समोरून जबर धडक दिली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, या धडकेत बाप-लेक रस्त्याच्या काही फुट बाजूला फेकले गेले.





अपघात घडताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेवून गंभीर अवस्थेत बाप लेकांना येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले, परंतु तपासणी करून डॉक्टरांनी बाप-लेकांना मृत घोषित केले आहे. या घटनेमुळे कोलवड गावावर शोककळा पसरली आहे. गावकऱ्यांतून हळहळ व्यक्त केली त आहे. मृत विजय जाधव व कार्तीक जाधव

# राणा दाम्पत्य दुचाकीने मतदान केंद्रावर



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. २१:** राज्यभर मतदानाचा उत्साह पहायला मिळत असताना अमरावतीत भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी मतदानानंतर पत्रकारांशी बोलताना मोठा दावा केला आहे.राज्यात महायुतीची सत्ता स्थापन होईल आणि भाजपचाच मुख्यमंत्री होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवनीत राणा म्हणाल्या, जनतेने महायुतीलाच पसंती दिली आहे. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार आहे. बडनेरा मतदारसंघातील युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा हे चौथ्यांदा निवडून येतील. जिल्ह्यात भाजपच्या कमळ या चिन्हावरील सर्व उमेदवार निवडून येतील आणि राज्यात भाजपचाच मुख्यमंत्री पाहायला मिळेल.

नवनीत राणा यांनी पत्रकारांशी बोलताना महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) उमेदवार सुलभ खोडके आणि दर्यापूरचे शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांची नावे घेण्याचे टाळले. अमरावतीतून यावेळी माचीस दिवा पेटवेल आणि दर्यापूरमधून युवा स्वाभिमान पक्षाचे रमेश बुंदिले हे निवडून येतील असा दावा त्यांनी केला.

अमरावतीत भाजपचे बंडखोर उमेदवार जगदीश गुप्ता हे माचीस या निवडणूक चिन्हावर उभे आहेत. हे विशेष.

# बोरगाव मंजू परिसरात ९ हजार ८५४ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

■ महासागर प्रतिनिधी,

**बोरगाव मंजू, दि. २१ :** अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघांत सर्वात मोठा भाग असलेल्या बोरगाव मंजू येथे १८ मतदान बुथ होते. १५ हजार ५८५ पैकी ४ हजार ८५४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. लोकसभा निवडणुकीत ६३.२२. टक्के मतदान झाले होते. ही मतदानाची टक्केवारी पाहता विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या वाढावी, यासाठी प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहिम राबवली. मात्र, मतदारांनी या निवडणुकीतही फारसा प्रतिसाद दिला नाही. काही ठिकाणी मतदारांनी रांगा मात्र लावल्या होत्या.





विधानसभा निवडणुकीची चाहूल लागताच सर्व राजकीय पक्षाचे प्रमुखांसह कार्यकर्ते कामाला लागले. मतदानासाठी सकाळी मतदारांनी चांगला प्रतिसाद दिला. दुपारी मतदान केंद्रावर तुरळक मतदान झाले. दुपार नंतर मतदानाचा प्रतिसाद मिळाला. बेरोजगारी, शेतीचे प्रश्न, वाढती महागाई हे मुद्दे प्रभावी ठरल्याचे दिसून आले. मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडली.

येथे झाले मतदान : निवडणूक विभागाने येथील १७ मतदान केंद्रावर मतदानाची व्यवस्था केली. यात परशुराम नाईक विद्यालय, येथील पाच बुथ, जिल्हा परिषद मराठी शाळा क्रमांक १ आठवडी बाजार पाच बुथ, जिल्हा परिषद मराठी शाळा क्रमांक दोन चार बुथवर, उर्दू शाळा क्रमांक एक दोन बुथ असे होते.

निवडणुक शांततेत पार पडावे यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, स्थानिक शाखेचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके, यांनी मतदान दरम्यान भेट देऊन आढावा घेतला. बोरगाव मंजूचे ठाणेदार अनिल गोपाळ यांनी

# दिंडी,कीर्तनाच्या गजरात रवाना होणार १०१ वी शेगावची वारी:राजकमल चौकातून आज निघणार शोभायात्रा

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. २१:** श्री सिद्धीविनायक देवदर्शन ग्रुपद्वारे गुरुवारी २१ नोव्हेंबरला रेल्वे स्थानकापुढील संत श्री गजानन महाराज मंदिरातून १०१ व्या वारीचे प्रस्थान होणार आहे. सिद्धीविनायक ग्रुपद्वारे शेगाव वारी करणाऱ्या भाविकांसाठी बसची सुविधा सुरू केली आहे. गुरुवारी १०१ व्या वारीचे प्रस्थान होणार आहे.

यानिमित्त दिंडी, भजन, कीर्तनासह राजकमल चौकातून शोभायात्रा काढणार आहे. त्यानंतर ही शोभायात्रा रेल्वे स्थानकापुढील श्री गजानन महाराज मंदिरात पोहोचेल. तेथून १०१ वी वारी शेगावसाठी रवाना होईल. दींडीत भाविक पारंपरिक पोशाखात सहभागी होतील. पायी दींडीची सुरुवात राजकमल चौकातून होऊन रेल्वे स्थानकापुढील संत गजानन महाराज मंदिरात तिचा समारोप होईल. मान्यवरांच्या हस्ते पुजा केली जाणार आहे. रेल्वे स्थानक चौकापासून गाडगेनगर, दर्यापूर, आकोट मार्गाने शेगावला पोहोचेल.



बसमध्ये भजन मंडळही उपस्थित राहणार आहे. शेगांवांत पोहोचल्यानंतर २ कि.मी.पायी दींडी श्री गजानन महाराज मंदिरात पोहोचेल, अशी माहिती देवदर्शन कंपनीचे महेंद्र श्रीवास्तव यांनी दिली.

# राणी सती धाम येथे उद्यापासून तीन दिवसीय दादी यांचा प्रकटोत्सव:२२ ते २४ नोव्हेंबर दरम्यान धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २१ :** राणी सती दादी यांच्या वार्षिक प्रगटोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जि. प. रस्त्यावरील राणी सती धाम येथे दादी यांचा प्रकटोत्सव २२ ते२४ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या तीन दिवसीय उत्सवात अनेक कार्यक्रमांची रेलचेल भक्तांना बघावयास मिळणार आहे.



उत्सवाचा प्रारंभ शुक्रवारी, २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता भजनकार गोपाल शर्मा हारे यांच्या भजन संध्येने होणार आहे. दादींच्या जगत कल्याणावर भजनकार गोपाल शर्मा हे भजने सादर करणार आहेत. दादींचा प्रकटोत्सव शनिवारी, २३ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येणार आहे.

यावेळी धाममध्ये सायंकाळी ६.४५. वाजता दादींचा ५६ भोग दर्शन सोहळा साकार करण्यात येणार आहे. यावेळी मातेची महाआरती भक्तांच्या समवेत होणार आहे. रविवारी, २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून ५६ भोग दर्शन व जात पूजा अर्चना सोहळा होणार असून दुपारी २ वाजता भजन गायिका निधी मंत्री यांचा भव्य दादी मंगलपाठ कार्यक्रम होणार आहे.

या उत्सवासाठी राणीसाठी धाममध्ये आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून भक्तांसाठी पूजा सामग्री, प्रसाद व विविध स्वादिष्ट व्यंजन व अल्पोपहाराचे स्टॉल लावण्यात येत आहेत. तसेच उत्सवात विशेष आकर्षण म्हणून लक्ष्मी नारायण व राधाकृष्ण झाकी साकार करण्यात आली आहे.

दादी भक्तांनी या तीन दिवसीय सोहळ्याचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन स्थानीय राणीधाम येथे धामचे अध्यक्ष जगदीश प्रसाद बाछुका यांनी केले.

उत्सवाच्या यशस्वितेसाठी जगदीशप्रसाद बाछुका यांच्या अध्यक्षतेत सचिव नवीन झुनझुनवाला, सज्जन अग्रवाल, श्याम चंगोईवाला, अनिल पाडिया, कमलकिशोर गुप्ता, आनंद अग्रवाल, मनीष बाछुका, फुलचंद पटवारी यांच्यासह राणी सती सेवा समिती, राणी सती कार्यकारिणी तथा राणी सती महिला कार्यकारिणीचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# लहुजी साळवे यांचे जातीभेद न मानता समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी कार्य

## लहुजी साळवे यांचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. २१ :** क्रांतीगुरु लहुजी साळवे यांच्या गंजपेठ, पुणे येथील आखाड्यात दांडपट्टा तलवार व विविध प्रकारचे शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण त्यांच्या आखाड्यात देत होते. लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासारखे दिग्गज त्यांच्या आखाड्यात प्रशिक्षण घेत होते. तत्कालीन समाजात अस्पृश्यता असली तरी लहुजी साळवे त्याकाळात राज्यात एकमेव वस्ताद असल्यामुळे ते जातीभेद न पाळता समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी सर्वांना शस्त्रे चालवण्याचे यथोचित प्रशिक्षण देत होते, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते अश्रु जाधव यांनी केले.





जगेल तर देशासाठी, मरेल तर देशासाठी अशी राष्ट्रप्रेमी प्रतिज्ञा घेणारे लहुजी साळवे यांची जयंती लहुजी साळवे सेवा निवृत्त बहुउद्देशीय कर्मचारी संस्थेच्या वतीने लॉर्ड बुद्धा कार्यालय, संविधान चौक येथे साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष साहेबराव खडसे, उद्घाटक माणिकराव खडसे, प्रा. डॉ. बाळकृष्ण सरकटे व राजेश अहिव यांची उपस्थिती लाभली होती. अश्रू जाधव याप्रसंगी प्रतिपादन करताना म्हणाले, पेशवाई, निजामशाही इंग्रजांच्या काळातील लहुजी साळवे यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक कार्यकर्तृत्वाचा विशाल पट त्यांनी उलगडून दाखवला.कार्यक्रमाचे उद्घाटक माणिकराव खडसे यांनी याप्रसंगी समाजाला एक होण्याचे आवाहन करुन समाजाचा उत्कर्ष करावा, असा मनोदय व्यक्त केला. डॉ. बाळकृष्ण सरकटे, ओंकेश्वर हिवराळे यांनी याप्रसंगी विचार व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. सरकटे, संचालन हिवराळे तर आभार तुळशीराम गवळी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अजाबराव रणखांब, अशोक बावणे, तुळशीराम गवळी यांनी परिश्रम घेतले. जयंती उत्सवाला बहुसंख्य समाज बांधवांची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी राजीव अहिव म्हणाले, लहुजी साळवे, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांना समता निर्माण व्हावी, यासाठी संघर्ष करावा लागला. लहुजींचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यांनी त्याकाळी शिक्षक व विद्यार्थिनींचे दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांपासून संरक्षण केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना साहेबराव खडसे म्हणाले. विद्यार्थ्यांनी आर्टी संस्थेचा शिक्षण, संशोधनासाठी लाभ घ्यावा. शिक्षण-प्रशिक्षणातू आपला शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास करून अधिकारी व्हावे. कुटुंबाच्या विकासासोबत समाजाचा विकास साधावा, असे प्रतिपादन केले.

# बालाजी महाराजांचा कार्तिक उत्सव

**विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, २५ नोव्हेंबर रोजी घट स्थापनेपासून लळित उत्सवाने होणार समारोप**


■ महासागर प्रतिनिधी,

**देऊळगावराजा, दि. २१ :** प्रतीतिरूपती म्हणून ख्याती असलेल्या देऊळगाव राजा येथील बालाजी महाराजांचा कार्तिक उत्सव प्रसन्न व मंगलमय वातावरणात नुकताच प्रारंभ करण्यात आला. या उत्सवाचा समारोप २५ नोव्हेंबर रोजी लळित उत्सवाने केला जाणार आहे. या उत्सवाचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावे असे आवाहन विश्वस्त राजे विजयसिंह जाधव यांनी केले आहे. प्रारंभी ११ नोव्हेंबर रोजी कार्तिक शु. रोजी या ठिकाणी मंडपोत्सव विधिवत उत्साहात पार पडला. या प्रसंगी सर्व समाजाचे मानकरी, सेवेकरी, ब्राम्हणवृंद, पुजारी वृंद, बालाजी संस्थानचे व्यवस्थापक, कर्मचारी व प्रसिद्धी प्रमुख सूरज गुप्ता यांची उपस्थिती होती. सर्वांच्या सहकार्याने व दोरांच्या सहाय्याने श्रींच्या मंदिरापासून गणपती मंदिरापर्यंत१६ कापडी मंडप उभारण्यात आले. रीतिरिवाजाप्रमाणे खोबऱ्याचे वाटप करून मंडपोत्सव संपन्न झाला. १४ नोव्हेंबर रोजी या ठिकाणी दीपोत्सवात सुरूवात करण्यात आली. यासाठी बालाजी महाराजांचा गाभारा विशेष मखराने सजवण्यात आला आहे. या उत्सवादरम्यान बालाजी संस्थानच्या वतीने बालाजी महाराजांच्या मंदिरासमोर स्टीलच्या कठड्यांवर दिव्यांची आरास ठेवून रोषणाई केली जाते. श्रींच्या दर्शनासाठी येणारे भक्त विशेषतः महिला दिव्यांमध्ये तेल घालून दिवे प्रज्वलित ठेवतात, त्यामुळे श्रींच्या मंदिरासमोरील वातावरण तेजोमय राहते. महा द्वाराजवळील मारोतीच्या बैठकीवर १५ नोव्हेंबर रोजी रात्री गोंधळाचा कार्यक्रम घेण्यात आला. जो कार्तिक लळीतापर्यंत दररोज असणार आहे. याप्रसंगी बालाजी व इतर देवी देवतांची भावगीते सादर केली जात आहे. १४ नोव्हेंबर रोजी अनुष्ठानाची समाप्ती करण्यात आली. यात २१ ब्रह्मवृंदांकडून घट स्थापनेपासून सुरू असलेल्या यात्रेच्या अनुष्ठानाची सांगता करण्यात आली. उत्सवानिमित्त कार्तिक लळित पर्यंत साजरा केला जाणार दीपोत्सव या उत्सवानिमित्त भगवान बालाजी मंदिरातील गाभाऱ्यात १४ नोव्हेंबर पासून दीपोत्सव प्रारंभ करण्यात आला आहे. यात स्टीलच्या कठड्यांवर दिव्यांची आरास ठेवून रोषणाई केली जात आहे. हा उत्सव दररोज कार्तिक लळित पर्यत साजरा केला जाणार आहे. २५ नोव्हेंबर रोजी होणार उत्सवाचा समारोप ११ नोव्हेंबर पासून प्रारंभ करण्यात आलेल्या कार्तिक उत्सव निमित्त या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे नियमित आयोजन केले जात आहे. या उत्सवाचा समारोप २५ नोव्हेंबर, रोजी लळित उत्सवात काल्याच्या कीर्तनाने केला जाणार आहे

# बंडोबांचा थंडोबा करण्याचे नेत्यांपुढे आव्हान; अकोला, वाशीम जिल्ह्यात उदंड जाहले बंड;तर राजकीय समीकरणाला फटाके

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २१ :** अकोला, वाशीम जिल्ह्यात सर्वच पक्ष, आघाड्यांमध्ये उदंड बंड झाले. त्यामुळे पक्षांच्या उमेदवारांपुढे मतविभाजनाची मोठी अडचण निर्माण झाली आहे. बंडाचा निशाणा फडकवणाऱ्या नेत्यांची मनधरणी करण्याची कसरत पक्ष नेतृत्वासह उमेदवारांना करावी लागेल. अन्यथा ऐन दिवाळीत मतदारसंघांमधील राजकीय समीकरणाला फटाके लागण्याची चिन्हे आहेत.



अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक ठिकाणी इच्छुकांनी बंडाचा झेंडा हातात घेतला. ४नोव्हेंबरला अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत असल्याने त्या अगोदर बंडखोरांना माघार घेण्यासाठी तयार करण्याचे आव्हान पक्षांपुढे राहील. अकोला जिल्ह्यात अकोला पश्चिम मतदारसंघात सर्वाधिक बंडखोरी झाली.

या मतदारसंघातून लढण्यासाठी सर्वच पक्षात इच्छुकांची प्रचंड गर्दी होती. पक्षांचे उमेदवार जाहीर झाल्यानंतर पक्षांतर्गत नाराजी पसरून अनेकांनी इतर पक्ष किंवा अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले. भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. अशोक ओळंबे यांनी प्रहार जनशक्ती पक्षाकडून उमेदवारी दाखल केली. भाजप नेते तथा माजी नगराध्यक्ष हरीश अलिमचंदानी यांनी देखील अपक्ष म्हणून दंड थोपाटले. काँग्रेसचे डॉ. झिशान हुसेन वंचितच्या तिकिटावर निवडणूक रिंगणात उतरले. भाजपचे संजय बडोणे, काँग्रेसचे माजी महापौर मदन भरगड, शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख राजेश मिश्रा, प्रकाश डवले यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले. अकोला पूर्व मतदारसंघात केवळ काँग्रेसचे डॉ.सुभाष कोरपे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. मूर्तिजापूर मतदारसंघात दोन पक्षांतर केल्यानंतर रवी राठी यांनी अपक्ष अर्ज भरला. वंचितच्या पुष्पा इंगळे यांनी देखील अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली. बाळापूरमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष कृष्णा अंधारे यांनी बंड करून अपक्ष म्हणून रिंगणात उतरले.

# नागपुरातील टेलिफोन एक्सचेंज परिसरात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने खळबळ!

■ महासागर प्रतिनिधी,

**नागपूर , दि. २१ :** राज्याची उपराजधानी असलेल्या नागपुरात काल विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडले. यातच आज शहरातील लकडगंज पोलीस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या टेलिफोन एक्सचेंज परिसरात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवला. या व्यक्तीची हत्या झाल्याचा संशय सूत्रांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



दरम्यान लकडगंज पोलिसांनी या घटनेचा छडा लावण्यासाठी पुढील तपास सुरु केला.

पोलिसांनी या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

## 'बिग बॉस'नंतरही प्रेम बहरले!



बिग बॉस मराठीचा पाचवा सिझन जोरदार गाजला. या सिझनमध्ये निक्की तांबोळी आणि अरबाझ पटेल यांची हॉट केमिस्ट्री चर्चेत राहिली. 'बिग बॉस मराठी' संपल्यानंतरही दोघांनी आपलं नात जपलं आहे. बिग बॉसच्या घराबाहेर पडल्यानंतर दोघांचे अनेक व्हिडीओ पहायला मिळाले. काही दिवसांपूर्वीच दोघे हिमाचल प्रदेशमध्ये एकमेकांसोबत वेळ घालवताना दिसले. दोघांचे नाते अजूनच खुलताना पहायला मिळत आहे. बिग बॉसच्या घरातून अरबाज बहेर पडल्यानंतर दोघांमध्ये मोठा दुरावा निर्माण झाला. निक्कीच्या आईने बिगबॉसच्या घरात येऊन निक्कीला अरबाजच्या साखरपुड्याविषयी सांगितले होते. बिग बॉस संपल्यानंतर निक्की आणि अरबाज काही दिवसांनी एकत्र दिसले. अरबाजने निक्कीच्या आधी लिझा ब्रिंदा हिला डेट केलं होतं. दोघांचा साखरपुडा झाल्याच्याही चर्चा होत्या. पण, निक्कीच्या प्रेमात पडल्यावर अरबाजने लिझा ब्रिंदासोबतच त्याचं नातं संपवलं. तर, अरबाजच्या आधी निक्की तांबोळीचं नाव बिझनेसमन मनन शाहबरोबर जोडण्यात आलं होतं. दोघे एकमेकांचे फोटो शेअर करायचे. तिने दोघांच्या नात्याची कबुली देखील दिली होती.

# ग्लॅम वर्ल्ड

## आर्यन खानचे दिग्दर्शनात पदार्पण



शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानच्या आगामी वेब सीरिजची अधिकृत घोषणा करण्यात आली. शाहरुखने मुलगा आर्यनच्या नेटफ्लिक्स मालिकेची घोषणा केली. या सीरिजची निर्मिती गौरी खानने केली असून दिग्दर्शन आर्यन खानने केले आहे. नेटफ्लिक्स आणि रेड चिलीज एंटरटेनमेंट ही सीरिज २०२५ मध्ये घेऊन येत आहेत. नेटफ्लिक्सने लॉस एंजेलिस इव्हेंटमध्ये या सीरिजची आणि रेड चिलीज एंटरटेनमेंटसोबत भागीदारीजाहीरकेली. या कार्यक्रमामध्ये नेटफ्लिक्सच्या चीफ कंटेंट ऑफिसर बेला बजारिया यांनी सीरिजबद्दल माहिती दिली. ते म्हणाले की ही सीरिज चित्रपटसृष्टीवर बेतलेली असून यात आपल्याला एका बाहेरच्या व्यक्तीचा संघर्षही पाहायला मिळणार आहे, जो बॉलिवूडच्या ग्लॅमरस आणि अवघड जगात आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न करतो. पोस्ट शेअर करताना शाहरुख खानने लिहिले की, रेड चिलीजसाठी हा खूप खास दिवस आहे. कारण आर्यन त्याच्या नवीन प्रवासाला सुरुवात करणार आहे. त्याची नवी वेब सिरीज लवकरच नेटफ्लिक्सवर येणार आहे. शाहरुख म्हणाला, 'आर्यन, पुढे जा आणि लोकांचे मनोरंजन कर. हे सुद्धा लक्षात ठेव की, मनोरंजनासारखा दुसरा चांगला व्यवसाय कोणताच नाही.' नेटफ्लिक्स आणि रेड चिलीज एंटरटेनमेंटने यापूर्वीही एकत्र काम केले आहे. ही वेब सिरीज नेटफ्लिक्स आणि रेड चिलीज एंटरटेनमेंट यांच्यातील सहावा चित्रपट आहे. याआधी दोघांनी डार्लिंग्स, भक्त, क्लास ऑफ '८३, बेताल आणि बार्ड ऑफ ब्लड सारखे चित्रपट एकत्र केले आहेत. या घोषणेवर कंगना रणौतची प्रतिक्रिया समोर आली. कंगनाची ही पोस्ट पाहून सर्वांना वाटले की, इतर सेलिब्रिटींप्रमाणे ती देखील आर्यनच्या पदार्पणावर नाराज होईल, पण यावेळी तिने दिलेली प्रतिक्रिया धक्कादायक आहे. तिने इंस्टाग्रामवर आर्यनसाठी एक खास नोट शेअर केली. ती म्हणाली, 'चित्रपट कुटुंबातील मुले केवळ मेक-अप लावणे, वजन कमी करणे, कपडे घालणे आणि स्वत:ला अभिनेता मानणे यापलीकडे जात आहेत हे छान आहे. आपण मिळून भारतीय चित्रपटांचा दर्जा उंचावला पाहिजे, ही काळाची गरज आहे आणि ज्यांच्याकडे संसाधने आहेत ते सहसा सोपा मार्ग स्वीकारतात. आम्हाला कॅमेऱ्यामागे आणखी लोक हवे आहेत. चांगली गोष्ट म्हणजे आर्यन खानने कमी प्रवास केलेला मार्ग स्वीकारला आहे. लेखक आणि चित्रपट निर्माता म्हणून पदार्पणाची आतुरतेने वाट पाहत आहे.' असे अभिनेत्रीने या नोटमध्ये लिहिले आहे.

## प्रदर्शनाआधीच 'इतके' कोटी

'गुलाबी' या चित्रपटाची कथा ही फक्त मैत्रीची नसून त्यांच्या संघर्षाची आणि आत्मसन्मानाच्या शोधाची गोष्ट आहे. या प्रवासात श्रुती मराठे, अश्विनी भावे आणि मृणाल कुलकर्णी यांच्या भूमिका मुख्य आहेत. तिघींच्या प्रवासाची रंगमय झलक आपण टीझर आणि ट्रेलरच्या माध्यमातून पाहिली. त्याशिवाय जयपूरमधील विविध रंगांचे आणि सौंदर्याचे दर्शनही त्यातून घडले. आता याच चित्रपटानं प्रदर्शनाच्या आधीच एक नवा रेकॉर्ड केला आहे. हा चित्रपट २२ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. मात्र, प्रदर्शनाच्या आधीच या चित्रपटाने एक कोटींचा गल्ला जमवला आहे. असा विक्रम साधणारा 'गुलाबी' हा पहिला मराठी चित्रपट ठरला आहे. चित्रपटाच्या घोषणेपासूनच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता होती. बुकिंग सुरू होताच महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांनी आगाऊ बुकिंग केली आहे. या चित्रपटाचे प्री-बुकिंग अवघ्या एक कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

दिग्दर्शक अभ्यंग कुवळेकर या विषयी बोलताना म्हणाले, पूर्वप्रदर्शनापूर्वीच प्रेक्षकांचा हा प्रतिसाद अपेक्षेपेक्षा खूप मोठा आहे. प्रेक्षकांचा हा पाठिंबा 'गुलाबी' चित्रपटासाठी खूप महत्त्वाचा आहे आणि आम्ही या प्रवासाचा आनंद घेत आहोत. 'गुलाबी' चित्रपटात मैत्री आणि स्वप्नांचा एक सुंदर प्रवास दाखवला आहे. लोकांच्या हृदयात 'गुलाबी'नं आधीच स्थान मिळवले आहे याचा खूप आनंद होतो. प्रेक्षकांना चित्रपट नक्की आवडेल याची खात्री आहे.'' व्हायोलेट फ्लेम मोशन पिक्चर्स प्रस्तुत, अभ्यंग कुवळेकर दिग्दर्शित 'गुलाबी' या चित्रपटाचे सोनाली शिवणीकर, शीतल शानभाग, अभ्यंग कुवळेकर आणि स्वप्नील भामरे निर्माते आहेत. यात चित्रपटात ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी, शैलेश दातार आणि निखिल आर्या यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. तर अमोल भगत या चित्रपटाचे एक्झिक्युटिव्ह प्रोड्युसर आहेत.



## रश्मिकाची धावपळ



रश्मिका मंदाना सध्या बरीच चर्चेत आहे. 'पुष्पा २' मधून ती रसिकांसमोर येणार आहे. यासोबतच ती 'सिकंदर' या आगामी चित्रपटाच्या चित्रिकरणातही व्यस्त आहे. 'पुष्पा २'चा सध्या शेवटचा टप्पा सुरू असून या दोन्ही चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी तिची धावपळ सुरू आहे. रश्मिका सकाळच्या वेळात 'पुष्पा २' चं चित्रिकरण करते आणि त्यानंतर लगेच ती सिकंदरच्या सेटवर दाखल होते. रात्रीच्या वेळेत ती या चित्रपटाच्या चित्रिकरणात व्यस्त असते. रश्मिकाची कारकिर्द सध्या फुलत असली तरी तिने तब्बेतीची काळजी मात्र घ्यायला हवी.

## 'हेराफेरी ३'ची प्रतीक्षा संपली!

बॉलीवूडच्या विनोदी चित्रपटांमध्ये 'हेरा फेरी' आणि 'फिर हेरा फेरी' या चित्रपटांनी स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. अतरंगी संवाद, अफलातून पटकथा आणि अक्षय कुमार, परेश रावल, सुनील शेट्टी यांच्यातील भन्नाट केमिस्ट्रीमुळे हे चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर कायमचे कोरले गेले आहेत. आजही या चित्रपटांचे विनोदी प्रसंग आणि संवाद चाहत्यांना खळखळून हसवतात.

या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची, 'हेरा फेरी ३' ची अनेक वर्षांपासून चाहते आतुरतेने वाट पाहत होते. यामध्ये पहिल्या दोन भागातील मूळ कलाकार पुन्हा एकत्र येणार असल्याच्या बातमीने प्रेक्षकांच्या अपेक्षा अधिकच उंचावल्या आहेत. अनेक अफवांनंतर अखेर 'हेरा फेरी ३' बद्दल एक खात्रीलायक बातमी आल्याने चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह पसरला आहे. एका मुलाखतीमध्ये अक्षय कुमारने 'हेरा फेरी ३' बद्दल महत्त्वाची माहिती दिली. त्याने सांगितले की, सध्या त्याची टीम 'वेलकम' चित्रपटावर काम करत आहे. मात्र, निर्मात्यांचे सध्याचे चित्रपट झाल्यानंतर 'हेरा फेरी ३'ची निर्मिती सुरू होईल. पुढील वर्षी चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात होण्याची शक्यता आहे, असेही त्याने नमूद केले. 'हेरा फेरी' हा चित्रपट प्रियदर्शन यांनी दिग्दर्शित केला होता. यामध्ये अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. एका पैशांच्या अफरातफरीच्या योजनांमध्ये अडकलेल्या या तिघांची कथा खळखळून हसवणारी ठरली. चित्रपट प्रचंड यशस्वी ठरला आणि त्यातील कलाकारांच्या कॉमेडीच्या उत्कृष्ट टायमिंगमुळे चित्रपट प्रेक्षकांना भावला. त्यानंतर आलेल्या 'फिर हेरा फेरी'मध्ये श्रीमंत झालेल्या राजू, श्याम आणि बाबूराव या तीन पात्रांची संपत्ती पुन्हा फसवणुकीत कशी गेली, याची कथा दाखवण्यात आली होती.



'हेरा फेरी ३' हा सिनेमा पहिल्या दोन सिनेमांप्रमाणे विनोदाचा ठसा कायम ठेवत प्रेक्षकांचे मनोरंजन करतो का, याबद्दल त्यांच्यामध्ये प्रचंड उत्सुकता आहे. अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल यांना पुन्हा एकत्र पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत. या चित्रपटाकडून प्रेक्षकांना मोठ्या प्रमाणावर मनोरंजनाची अपेक्षा आहे.

## क्रितीचा 'तेरे इश्क में'



अभिनेत्री क्रिती सेनॉन आनंद एल रायच्या आगामी 'तेरे इश्क में' या चित्रपटात दिसणार आहे. यात धनुष तिचा नायक असेल. हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होऊ शकतो. धनुष आणि क्रिती यांची जोडी रुपेरी पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षकही उत्सुक आहेत. 'तेरे इश्क में' हा अर्थातच एक रोमँटिक चित्रपट असेल. या चित्रपटासाठी क्रितीने तयारी चालू केली असून लवकरच्या याचं चित्रिकरण सुरू होईल. क्रितीला एका रोमँटिक भूमिकेत बघणं चाहत्यांसाठी निश्चितच पर्वणी ठरेल.

## 'ऐतराज'चा सीक्वेल येणार

अक्षय कुमार, करिना कपूर आणि प्रियांका चोप्रा यांनी 'ऐतराज' चित्रपटात काम केलं होतं. हा चित्रपट प्रदर्शित होऊन २० वर्षे उलटून गेली आहेत. चित्रपटात प्रियांकाने खलनायकी भूमिका साकारली होती. तिच्या अभिनयाचं बरंच कौतुकही झालं होतं. आता या चित्रपटाचा सीक्वेल येणार आहे. सुभाष घई यांनी ही घोषणा केली. लेखक आणि दिग्दर्शक अमित राय 'ऐतराज २' ची कथा लिहित असून अनेक निर्मितीसंस्था चित्रपटाच्या निर्मितीसाठी उत्सुक असल्याचं घई यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता' ऐतराज २' प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे नक्की!



## 'लाडकी जनता योजना!'

'हरिश्चंद्राची फॅक्टरी', 'एलिझाबेथ एकादशी' आणि 'वाळवी' या तीन मराठी चित्रपटांचे दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती - लेखिका मधुगंधा कुलकर्णी यांनी 'मु. पो. बोंबिलवाडी' या आगामी चित्रपटाची घोषणा केली आहे. २००१ साली रंगभूमीवर आलेले परेश मोकाशी यांचे 'मु. पो. बोंबिलवाडी' हे नाटक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले होते. याच नाटकावर आधारित हा सिनेमा येणार आहे. प्रशांत दामले, आनंद इंगळे, अद्वैत दादरकर आणि गीतांजली कुलकर्णी हे कलाकार या सिनेमात मुख्य भूमिकेत आहेत. नुकतंच या सिनेमाच्या टीमने 'लाडकी जनता योजना' आणली आहे. 'लाडकी जनता योजना' ही प्रेक्षकांसाठीची योजना आहे. यात प्रेक्षकांना याच चित्रपटातील एका गाण्यावर रील तयार करण्याची संधी मिळणार आहे. त्या रीलचा वापर करून ते रिल्स मोनेटाईज करून व्ह्यूज मिळवू शकणार आहेत. लाडकी जनता योजनेचं मुख्य वैशिष्ट्य हे या सिनेमातील एक गाणं आहे. या सिनेमाचं पहिलं गाणं प्रेक्षकांसाठी कॉपीराईट मुक्त करण्यात येणार आहे. मुक्काम पोस्ट बॉबीलवाडी या इन्स्टाग्राम अकाउंटवरून एक पोस्ट करण्यात आली आहे. पोस्ट मध्ये चित्रपटाच्या टीमने लिहिलं, मुक्काम पोस्ट बॉबिलवाडीची 'लाडकी जनता योजना!' आमचे गाणे तुमच्या खात्यावर! आम्ही मुक्काम पोस्ट बोंबीलवाडीचे पहिले गाणे खास प्रेक्षकांसाठी कॉपीराईट मुक्त केले आहे. तुम्ही हे गाणे शेअर करा, गाण्यावर रिल्स करा, डान्स करा आणि पैसे सुद्धा मिळवा. 'मु.पो. बोंबिलवाडी' हा सिनेमा १ जानेवारी २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. वैभव मांगले, मनमीत पेम, प्रणव रावराणे, गणेश मयेकर, रितिका श्रोत्री, यांच्या या सिनेमात मुख्य भूमिका आहे. परेश मोकाशी यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे.



# आमदारांसाठी काँग्रेसकडून विशेष विमान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी काल मतदान झाले. काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे. येथील ६२ जागांपैकी ३५ ते ४० जागा मिळतील, अशी अपेक्षा काँग्रेसला आहे. त्यामुळे मतदान होताच नियोजन सुरू झाले आहे.



विजयाची शक्यता असलेल्या अपक्ष आमदारांशीही संपर्क

मतदानाचा टक्का वाढल्यानंतर काँग्रेसचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावर पूर्व विदभार्तील आमदारांच्या व्यवस्थेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काँग्रेसच्या आमदाराशी दगाफटका होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येत आहे. २३ नोव्हेंबरला निकाल येताच आमदारांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच निवडून येण्याची शक्यता असलेल्या अपक्ष उमेदवारांच्या संपर्कात राहण्याची जबाबदारी विजय वडेट्टीवार यांच्यावरच सोपवण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर लगेचच एक्झिट पोल्सचे अंदाज यायला सुरुवात झाली. जवळपास सर्वच पोल्सनी महायुतीची सत्ता पुन्हा येणार असल्याचा अंदाज व्यक्त केला.

महाविकास आघाडीही बहुमतापासून किंचित लांब असल्याचे दिसते आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निकाल आल्यानंतरच निकालाचे खरे चित्र समजू शकेल. मात्र तत्पूर्वी ह्यएक्झिट पोल्सह्नी पक्षनिहाय जे अंदाज व्यक्त केले आहेत, त्यावरून काँग्रेस तयारीला लागले आहे.

लोकसभा आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या वेळी विविध वृत्तवाहिन्या आणि संस्थांचे अंदाज साफ चुकले असताना राज्य विधानसभा निवडणुकीतही विविध संस्थांनी संमिश्र अंदाज वर्तविले आहेत. काही संस्थांनी महायुती आणि महाविकास आघाडीत फार अंतर नसेल, असा अंदाज व्यक्त केला आहे.

रिंगणातील सहा पक्ष, छोटे पक्ष तसेच बंडखोरांमुळे नेमके चित्र स्पष्ट होत नाही. मात्र, काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे. पण, भाजपची राजकारणाच्या शैली आता जगजाहीर आहे. त्यामुळे काँग्रेस कुठलाही धोका पत्करण्यास तयार नाही. त्यासाठी पावले टाकली जात आहेत. आमदारांना कुठल्याही प्रकारचा दगाफटका होऊ नये म्हणून सुरक्षित स्थळी तातडीने नेण्यासाठी विशेष विमान नागपुरात सज्ज ठेवण्यात आले आहे, अशी माहिती आहे.

# बहुमत असो किंवा नसो... अपक्षांना सोबत घेणार

## भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
राज्यात मतांचा टक्का वाढला आहे. राज्यातील लाडक्या बहिणी आणि शेतक?यांनी आम्हाला मोठ्या प्रमाणात मतदान केले असल्याचा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. वाढलेल्या मतदानाचा आम्हाला फायदा आम्हाला होईल, असेही ते म्हणाले.



राज्यात महायुतीला बहुमत मिळाले तरी किंवा नाही मिळाले तरी सत्ता स्थापन करताना अपक्षांना सोबत घेणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. राज्यात महायुती पुन्हा सत्ता स्थापन करेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.
राज्यात बहुमता पेक्षा जास्त आमदार आमचे निवडून येतील, असे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे. आम्हाला सत्ता स्थापनेसाठी अपक्ष आमदारांची गरज भासली तरी त्यांची मदत घेणार आणि गरज भासली नाही तरी देखील त्यांची मदत घेतली जाणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. निवडून आलेला आमदार हा लोकांचा प्रतिनिधी असतो. निवडून आल्यानंतर त्याच्या मतदारसंघात विकासाची कामे होणे आवश्यक आहे. त्यामुळे बहुमत असले किंवा नसले तरी अपक्ष आमदार विकासासाठी भारतीय जनता पक्षाच्या बाजूने राहतील असा दावा देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे. त्यामुळे राज्यात देखील डबल इंजिनचे सरकार हवे, असे महाराष्ट्रातील जनतेचे मत आहे. राज्यात महायुती सरकार येणार असून, राज्यभरातील लाडक्या बहिणींनी आम्हाला मोठ्या प्रमाणात मतदान केल्याचा दावा त्यांनी केला आहे.

महायुतीला 150 पेक्षा जास्त जागा मिळणार आहेत. अपक्ष उमेदवार हे विकासासाठी आमच्या बाजूने असतील, असा दावा देखील बावनकुळे यांनी केला आहे. केंद्रात भाजपचे सरकार असल्यामुळे राज्यात देखील भाजप सरकार स्थापन होणार असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची देखील राज्यात चांगली कामगिरी आहे, असा दावा त्यांनी केला आहे.

# उड्डाणपुलावरून पडून महिलेचा दुर्दैवी मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
अमरावती रोडवरील धामणा येथे उडाण पुल रस्त्यावर झालेल्या अपघातात 50 वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. सुषमा ललित ठक्कर असे मृत महिलेचे नाव आहे. ती अमरावती शहराच्या मोती नगर येथील रहिवासी होती. त्याचवेळी अजय अंबादास दंडारे असे गंभीर जखमी कार चालकाचे नाव आहे.



धावत्या कारला ट्रकची धडक

घटनेच्या वेळी ठक्कर कुटुंब अमरावतीहून नागपूरच्या दिशेने कारने येत होते. धामना येथे पोहोचताच कारमध्ये अचानक पेट्रोल संपले, त्यामुळे घरातील सदस्यांनी गाडी जवळच्या पेट्रोल पंपावर जावी म्हणून धक्का मारून पुढे ढकलण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर ट्रकने कारला धडक दिली.

या अपघातात कारसमोर उभ्या असलेल्या सुषमा ठक्कर या धडकेनंतर पुलावरून खाली पडल्या आणि त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. कार चालक अजय दंडारे हाही गंभीर जखमी झाला असून त्याला नागपूरच्या रविनगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी आयशर ट्रकच्या चालकाला अटक केली असून याप्रकरणी तपास सुरू आहे. मृत महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती.

## दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :
महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून बोर्ड परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. 21 फेब्रुवारी ते 17 मार्च या कालावधीत दहावी बोर्डाची परीक्षा होणार आहे. तसेच 11 फेब्रुवारी ते 18 मार्च या कालावधीत बारावी बोडार्ची लेखी परीक्षा होणार आहे. राज्य मंडळाचे सचिव देविदास कुल्हाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे या अंतिम वेळापत्रकाबाबत माहिती दिली आहे.
महाराष्ट्र बोर्डाच्या या परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेतल्या जाणार आहेत. पहिली शिफ्ट ही सकाळी 11 ते दुपारी 2 पर्यंत असणार आहे, तर दुसरी शिफ्ट दुपारी 3 ते संध्याकाळी 6 पर्यंत असणार आहे. दहावीच्या परीक्षेची सुरुवात मराठीच्या पेपरने होणार आहे, तर बारावीचा पहिला पेपर इंग्रजीचा असणार आहे. महाराष्ट्र बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन वेळापत्रक डाउनलोड करता येऊ शकते. दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षांचे प्रवेशपत्र जानेवारी 2025 मध्ये जारी करण्यात येणार असल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले.

## मालवण शिवाजी महाराज पुतळा दुर्घटनेतील आरोपीची सुटका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :
सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्लयावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी चेतन पाटील याला अटक करण्यात आली होती. त्यासोबत जयदीप आपटे यालाही अटक केली होती. याप्रकरणी आज न्यायालयात सुनावणी पार पडली असून मुंबई न्यायालयाने चेतन पाटील याला दिलासा दिला आहे. न्यायालयाने चेतन पाटील याला जामीन मंजूर केला असून जयदीप आपटे हा अद्यापही तुरुंगातच आहे.

## सत्ता स्थापनेसाठी भाजपची तयारी

# बंडखोरांशी संपर्क करण्याची नेत्यांवर जबाबदारी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर राज्याच्या एक्झिट पोलची आकडेवारी सर्वच संस्थांनी जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार राज्यात कोणाचे सरकार येणार, हे स्पष्ट होत नसले तरी देखील भाजपा हा सर्वात मोठा पक्ष ठरणार असल्याचे म्हटले जात आहे.

या पार्श्वभूमीवर आगामी सत्ता स्थापनेची तयारी म्हणून भारतीय जनता पक्षाच्या वतीने विजयाची शक्यता असणाऱ्या भाजपच्या बंडखोर आमदारांशी संपर्क साधला जात आहे. अशा विजयी झालेल्या आमदारांवर पक्षांतर्गत झालेली कारवाई देखील मागे घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



अनेक मीडिया संस्थांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात सर्वात मोठा पक्ष भारतीय जनता पक्षच राहील, हे जवळपास स्पष्ट मानले जात आहे. त्यामुळे सत्ता स्थापनेचा दावा करताना अपक्षांची मदत लागू शकते. याची तयारी भारतीय जनता पक्षाने आतापासूनच सुरू केली आहे. भारतीय जनता पक्षाचे अनेक बंडखोर या निवडणुकीत उभे होते. यातील विजयाची शक्यता असणाऱ्या बंडखोरांशी आतापासूनच संपर्क ठेवण्याची जबाबदारी भाजपच्या राज्यातील नेत्यांवर सोपवण्यात आली आहे.

महायुतीकडून तिकीट प मिळाल्याने अनेकांनी बंडखोरी केली होती. त्यातील निवडून येण्याची शक्यता असलेल्या बंडखोरांना पुन्हा पक्षासोबत घेण्यासाठी पक्षाने प्रयत्न सुरू केले आहेत.

## ईव्हीएम दुचाकीवर नेण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २१ :
मतदान प्रक्रिया संपल्यानंतर मतदान पथकाने पाचही केंद्रातील ईव्हीएमबाहेर काढले. त्यापैकी चार ईव्हीएम वाहनात नेले तर एक ईव्हीएम दोन व्यक्ती दुचाकीवर घेऊन जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यावेळी नागरिकांच्या हा प्रकार लक्षात येताच गदारोळ झाला.

## अजितदादा ४० हजार मतांनी पडणार?

### जानकरांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वात हॉट सीट ठरलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात अजित पवार हे चाळीस हजार मतांनी पराभूत होणार असल्याचा दावा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माळशिरसचे उमेदवार उत्तमराव जानकर यांनी केला आहे.

अजित पवार यांना मत म्हणजे भारतीय जनता पक्षाला मत, असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे बारामतीमधील जनता शरद पवार यांना मतदान करणार असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र त्यांच्या या दाव्या नंतर अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी अजित पवार यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघात अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार अशी लढत झाली. युगेंद्र पवार हे अजित पवार यांचे पुतणे आहेत. मात्र या मतदारसंघात आता शरद पवार यांच्या विरोधात अजित पवार असाच सामना पाहायला मिळाला होता. यात बारामती मधील जनता ही शरद पवार यांचा साथ देईल, असा दावा जानकर यांनी केला आहे.

राज्यामध्ये महाविकास आघाडीच्या 180 ते 200 जागा नक्की निवडून येतील, असा दावा देखील त्यांनी केला. तर युगेंद्र पवार हे चाळीस हजारांपेक्षा अधिक मताधिक्याने निवडून येणार असल्याचे देखील ते म्हणाले.

**लाखभर मतांनी निवडून येतील - पटेल**

जानकर यांच्या या दाव्या नंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी देखील दावा केला आहे. अजित पवार हे किमान लाखभर मतांनी निवडून येतील, असा दावा ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल यांनी केला आहे.

पान १ वरून

### राष्ट्रपती राजवट...

महाराष्ट्रात आजपर्यंत 3 वेळा राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. यात पहिल्यांदा पुलोद सरकार बरखास्त करण्यात आले तेव्हा फेब्रुवारी 1980 ते जून 1980 या काळात राज्यात राष्ट्रपती राजवट होती. तर दुसऱ्यांदा 2014 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसमध्ये झालेल्या वादानंतर राष्ट्रवादीने काँग्रेसचा पाठिंबा काढून घेण्याचा निर्णय घेतला अन पृथ्वीराज चव्हाण यांच्या राजीनाम्यानंतर राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्यात आली.

यानंतर 2019 मध्ये राजकीय उलथा-पालथ झाल्यानंतर देखील महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लावण्यात आली. या तिन्ही राष्ट्रपती राजवटीचा अन शरद पवार यांचा प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष संबंध जोडला गेल्याचे दिसून येते. इनपुटवरून असे समजले की महायुती किंवा महाविकास आघाडी या दोघांनाही बहुमतासाठी आवश्यक 145 जागा मिळवणे कठीण आहे. अपक्षांशिवाय त्यांना पर्याय नाही.

### पुन्हा महायुतीचे ...

म्हटले आहे. सत्ता स्थापनेसाठी अपक्ष उमेदवारांची गरज लागेल का? त्यांच्याशी संपर्क साधण्यात येत आहे का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला होता. मात्र, यावर भारतीय जनता पक्ष आणि आम्ही अद्याप कोणाशी संपर्क साधलेला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. राहुल गांधी नेहमीच अदानींवर आरोप करतात. त्यात काय नवीन काहीच नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री पदाबाबत आतापर्यंत कोणतीही चर्चा झालेली नाही. निकाल आल्यानंतर तिन्ही पक्ष एकत्र बसून याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, असा दावा देखील देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. साधारणपणे मतदानाची टक्केवारी ज्या पद्धतीने वाढली आहे. त्यात सरकारच्या बाजूने लोकांचा कल असू शकतो, असा दावा फडणवीस यांनी केला आहे.

### भाजपकडे कार्यकर्तेच...

कोणतेही दुमत नाही. ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. भाजप सरचिटणीस विनोद तावडे हे पैसे वाटताना पकडले गेले. त्यानंतर त्यांनी आपण चिठ्ठ्या वाटण्यासाठी गेल्याचा दावा केला. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस चिठ्ठ्या वाटत असतील तर ही फार दुर्दैवी गोष्ट आहे. यावरून त्यांच्याकडे आता कार्यकर्तेच राहिले नसल्याचे स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाने भाजपला मतदान देण्याचा निर्णय घेतला. याला ब्राह्मण जिहाद म्हणता येईल का? काय सुरू आहे महाराष्ट्रात? मतदान हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे. त्या अधिकाराचे हनन करता येणार नाही. भाजपने पैसा व दारू वाटून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न केला आहे. हा नोट जिहाद आहे की दारू जिहाद आहे? असे नाना पटोले म्हणाले.

# चंद्रपूर जिल्हा बँकेतील ३६० पदांच्या भरतीला पुन्हा स्थगिती

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २१ :
न्यायालयात प्रलंबित अवमान याचिकेवरील सुनावणीपर्यंत चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकर भरतीला सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था पुणे यांनी स्थगिती दिली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा बल्लारपूरचे काँग्रेस उमेदवार संतोष सिंह रावत व संचालक मंडळांत खळबळ उडाली आहे.
चंद्रपूर जिल्हा बँकेतील ३६० जागांचे भरती प्रकरण सुरुवातीपासून चर्चेत आहे. विशेष म्हणजे, काँग्रेसने नोकर भरती प्रक्रियेचा विधानसभा निवडणुकीत प्रचाराचा मुद्दा बनविला होता. मात्र जिल्हा बँकेची नोकर भरती प्रक्रिया विधानसभा निवडणूक आदर्श आचारसंहितेमुळे यापूर्वीच स्थगित करण्यात आली आहे. १५ आणि १७ नोव्हेंबरला ही भरती प्रकीया राबविली जाणार होती. मागील अनेक वर्षांपासून बँकेतील नोकरी भरती अडकली आहे.

बँकेतील नोकर भरतीसंदर्भात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एक याचिका दाखल करण्यात आली होती. १९ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या सुनावणीवेळी बँकेने उच्च न्यायालयात एक शपथपत्र सादर केले. त्यात नोकर भरती टीसीएस या संस्थेमार्फत राबविली जाईल, असे नमूद केले. त्यानंतर ही याचिका २० ऑक्टोबर २०२३ रोजी निकाली काढली. मात्र बँकेच्या संचालक मंडळाने या शपथपत्राकडे दुर्लक्ष केले. ठराव घेवून आयटीआय लिमिटेड या कंपनीची नोकर भरतीसाठी निवड केली. भरती प्रक्रिया राबविली. ऑनलाईन परीक्षेची तारीख सुद्धा जाहीर झाली. मात्र आचारसंहितेमुळे ती पुढे ढकलण्यात आली. दुसरीकडे, बँकेच्या नोकर भरतीच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एक अवमान याचिका दाखल झाली आहे. या याचिकेत बँकेच्या नोकर भरतीला प्रक्रियेला स्थगिती देण्याची आणि टीसीएस व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कंपनीमार्फत नोकर भरती प्रक्रिया न करण्याबाबत बँकेला निर्देश देण्याची विनंती करण्यात आली आहे. या याचिकेवर येत्या ३ डिसेंबरला सुनावणी होणार आहे.

दरम्यान, बँकेचे संचालक मनोहर पाऊणकर यांनी सहकार आयुक्तांकडे एक तक्रार केली. त्यात टीसीएस ऐवजी आयटीआय लिमिटेड या कंपनीची बँकेने निवड केली, याकडे लक्ष वेधले आहे. बँकेतील नोकर भरतीस स्थगित करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी बँकेने न्यायालयातील शपथपत्रानुसार नोकर भरती प्रक्रिया केली नाही. त्यामुळे त्यांना भरतीपासून परावृत्त करण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश देणे आवश्यक असल्याचा अहवाल अपर आयुक्तांकडे सादर केला.

या अहवालानंतर आता उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होवू नये, त्यामुळे अवमान याचिकेवरील पुढील सुनावणीपर्यंत नोकर भरती प्रक्रिया पुढे ढकलावी, असे आदेश श्रीकृष्ण वाडेकर, अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी दिले आहे. भरतीला स्थगिती येताच संचालकांचे चेहरे पुन्हा एकदा पडले आहेत.

## 'बीस्ट'चा वर्ल्ड मराठी प्रीमियर; सन मराठीवर २४ नोव्हेंबरला

'जेलर'च्या भरघोस यशानंतर सन मराठी वाहिनी सादर करीत आहे सुपरस्टार विजय थलपतीचा सुपरहिट चित्रपट 'बीस्ट' चा वर्ल्ड मराठी प्रीमियर! रविवार दिनांक २४ नोव्हेंबर रोजी ७:०० वाजता. पूजा हेगडे, सेल्वा राघवन, अंकुर विक आणि ब?याच दिग्गज कलाकारांच्या दमदार अभिनयाचा अनुभव मराठी भाषेत घेण्यासाठी सज्ज व्हा.




लोकरंजन

ॲक्शन आणि ड्रामाचा दमदार अंदाज म्हणजे 'बीस्ट' हा चित्रपट. ज्यात विर राघवनच्या भूमिकेत विजय थलपती पाहायला मिळतो. यामध्ये विजय थलपतीच्या लूकने चाहत्यांची मन जिंकून घेतली. चित्रपटात विर राघवन हा 'रॉ' चा अधिकारी तीन महिन्यांपासून एका मिशनची तयारी करत आहे. शेवटच्या क्षणी भारत सरकारने मिशन मागे घेण्याचा निर्णय घेतला. परंतु वीर रघावनने स्वतःच्या बॉसच्या आदेशाविरुद्ध मूळ योजनेनुसार मिशन पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. तो हे मिशन यशस्वीरित्या पार पाडतो, पण या मिशनचा त्याच्या मानसिकतेवर परिणाम होतो. पुढे जे काही थरारक घडत जातं हे पाहणं प्रेक्षकांसाठी मनोरंजनात्मक ठरेल.

या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत बॉक्स ऑफिसवर तब्बल २५० कोटी कमवले. त्यामुळे मराठीमध्ये हा चित्रपट पाहणं प्रेक्षकांसाठी खास पर्वणी ठरणार आहे.

*म्हणूनच या ब्लॉकबस्टर चित्रपटाचा प्रीमियर पाहायला विसरू नका. त्यामुळे पाहायला विसरू नका 'बीस्ट' चा मराठी वर्ल्ड प्रीमियर २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७:०० वाजता आपल्या सन मराठीवर.

●●●

## मुरलेल्या प्रेमाचा गोडवा चाखवायला येणार गुलकंद

एव्हरेस्ट एंटरटेनमेंट प्रस्तुत, वेलक्लाऊड प्रॉडक्शन्स निर्मित गुलकंद हा मुरलेल्या प्रेमाचा गोडवा चाखवणारा चित्रपट नवीन वर्षात १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची सोशल माडियाद्वारे घोषणा करण्यात आली आहे.




सचिन मोटे लिखित, सचिन गोस्वामी दिग्दर्शित या चित्रपटात फॅमिली एंटरटेनमेंट आणि कॉमेडीचे अनोखे कॉम्बिनेशन पाहायला मिळणार आहे. यात सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, शार्विल आगटे अशी तगडी स्टारकास्ट असणार आहे. गुलकंदचे सचिन गोस्वामी, सचिन मोटे आणि संजय छाब्रिया निमार्ते आहेत.

चित्रपटाचे नाव, भन्नाट टीम यामुळे प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे.
चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, निर्माते सचिन गोस्वामी म्हणतात, या सगळ्यांसोबत मी आधी काम केलं असल्याने आमच्यात एक बॉण्डिंग आहे आणि आमची हिच केमिस्ट्री यातही प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

हा चित्रपट एक फॅमिली एंटरटेनर असून प्रेक्षकांना या मुरलेल्या गुलकंदाची चव चाखायला नक्कीच आवडेल. ही एक अशी कथा आहे, ज्याची

## हॅशटॅग तदेव लग्नमचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला

शुभम फिल्म प्रोडक्शनच्या हॅशटॅग तदेव लग्नम् या आगामी सिनेमाचा टीझर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांमध्ये या सिनेमाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. २० डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या या सिनेमात पहिल्यांदाच सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान यांची जोडी मोठ्या पडद्यावर एकत्र झळकणार आहे. नुकत्याच झळकलेल्या या जबरदस्त टीझरमधून लग्न या विषयावर आधुनिक पिढीचा वेगळा दृष्टीकोन पाहायला मिळत आहे.



सिनेमाच्या टीझरमध्ये घरच्यांच्या सांगण्यानुसार दोन मध्यमवयीन 'तरुण तरुणी' लग्नासाठी 'पाहाण्याच्या कार्यक्रमा निमित्ताने भेटत आहेत. यावेळी ते एकमेकांच्या वयाचा अंदाज बांधताना दिसत आहेत. टीझरमधील संवाद मजेशीर असून प्रेक्षकांच्या मनात घर करणार आहेत. सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान यांची केमिस्ट्री या टीझरमध्ये खुलून दिसत आहे. त्यामुळे आता थोडीशी लेट पण एकदम थेट सुरू झालेली ही सफर पाहायला मजा येणार आहे. यात सुबोध भावे, तेजश्री प्रधान यांच्यासह प्रदीप वेलणकर, मानसी मागिकर, संजय खापरे, शर्मिष्ठा राऊत यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन आणि लेखन आनंद दिलीप गोखले यांनी केले असून, निर्माते शेखर विठ्ठल मते आहेत.

लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच मजा घेऊ शकतात. ही अतिशय हृदयस्पर्शी कहाणी आहे.

●●●

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

नागपूर
महासागर
वृत्तसागर
शुक्रवार, दि. २२, नोव्हेंबर २०२४

# बंटीसह ५० हून अधिक कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

## शासकीय वाहनाची तोडफोड आणि कामात अडथडाचे प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

महालच्या झेंडा चौकात बुधवारी रात्री विभागीय निवडणूक अधिकारी यांना धक्काबुक्की करून शासकीय वाहनाचे नुकसान केल्याप्रकरणी मध्य नागपूरचे महाविकास आघाडीचे उमेदवार बंटी शेळके यांच्यासह 50 कार्यकर्त्यांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे सोपविला आहे. सध्या कोणालाही अटक झाली नाही. मात्र पोलिसांनी पाच कार्यकर्त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. रात्री उशिरापर्यंत त्यांची सखोल चौकशी सुरू होती.

मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघाचे विभागीय निवडणूक अधिकारी बुधवारी सायंकाळी झेंडा चौकाजवळील एका दुकानात कागदपत्रांची झेरॉक्स काढण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या वाहनात अतिरिक्त ईव्हीएम मशीन ठेवली होती. काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांना कारमध्ये ईव्हीएम मशीन दिसली. त्यांनी अधिकाऱ्याचा रस्ता अडवून प्रश्नांचा भडीमार केला. अधिकाऱ्याने ते अतिरिक्त मशीन असून त्यांचा मतदान केंद्रावर झालेल्या मतदानाशी कोणताही संबंध नसल्याची माहिती दिली आणि जाण्यास निघाले. मात्र कार्यकर्त्यांनी त्यांना घेराव घातला. काहींनी त्यांच्या सरकारी वाहनावर दगडफेक करून ईव्हीएम मशीन काढण्याचा प्रयत्न केला. माहिती मिळताच पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि सर्वांना तेथून पिटाळून लावले.

या दरम्यान भाजपचे उमेदवार प्रविण दटके आणि त्यांचे कार्यकर्ताही मोठ्या प्रमाणात झेंडा चौकात गोळा झाले. परिस्थितीवर नियंत्रण मिळविताना पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. निवडणूक अधिकाऱ्याच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी बंटी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा नोंदविला. तणावा दरम्यानच निखिल गाडगे नावाच्या तरुणावर कोणीतरी चाकूने वार करून गंभीर जखमी केले.

निखिलनुसार तो काँग्रेस कार्यकर्ता होता. त्याच्या तक्रारीवरूनही पोलिसांनी बंटी आणि त्यांच्या समर्थकांवर गुन्हा नोंदविला आहे. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता पोलिस आयुक्तांनी प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे सोपविला आहे. पोलिसांनी 5 तरुणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मात्र अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. गुरूवारी रात्रीपर्यंत त्यांची चौकशी सुरू होती.

# काँग्रेसकडून विजयाची शक्यता असलेल्या अपक्ष आमदारांशी संपर्क

## विजय वडेट्टीवार यांच्याकडे जबाबदारी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी काल मतदान झाले. काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे. येथील ६२ जागांपैकी ३५ ते ४० जागा मिळतील, अशी अपेक्षा काँग्रेसला आहे. त्यामुळे मतदान होताच नियोजन सुरू झाले आहे.

मतदानाचा टक्का वाढल्यानंतर काँग्रेसचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावर पूर्व विदभार्तील आमदारांच्या व्यवस्थेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काँग्रेसच्या आमदाराशी दगाफटका होवू नये म्हणून खबरदारी घेण्यात येत आहे. २३ नोव्हेंबरला निकाल येताच आमदारांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच निवडून येण्याची शक्यता असलेल्या अपक्ष उमेदवारांच्या संपर्कात राहाण्याची जबाबदारी विजय वडेट्टीवार यांच्यावरच सोपवण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर लगेचच एक्झिट पोल्सचे अंदाज यायला सुरुवात झाली. जवळपास सर्वच पोल्सनी महायुतीची सत्ता पुन्हा येणार असल्याचा अंदाज व्यक्त केला. महाविकास आघाडीही बहुमतापासून किंचित लांब असल्याचे दिसते आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निकाल आल्यानंतरच निकालाचे खरे चित्र समजू शकेल. मात्र तत्पूर्वी एक्झिट पोल्सनी पक्षनिहाय जे अंदाज व्यक्त केले आहेत, त्यावरून काँग्रेस तयारीला लागले आहे.

लोकसभा आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या वेळी विविध वृत्तवाहिन्या आणि संस्थांचे अंदाज साफ चुकले असताना राज्य विधानसभा निवडणुकीतही विविध संस्थांनी संमिश्र अंदाज वर्तविले आहेत.

काही संस्थांनी महायुती आणि महाविकास आघाडीत फार अंतर नसेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. रिंगणातील सहा पक्ष, छोटे पक्ष तसेच बंडखोरांमुळे नेमके चित्र स्पष्ट होत नाही. मात्र, काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे.

पण, भाजपची राजकारणाच्या शैली आता जगजाहीर आहे. त्यामुळे काँग्रेस कुठलाही धोका पत्करण्यास तयार नाही. त्यासाठी आतापासून पावले टाकली जात आहेत. आमदारांना कुठल्याही प्रकारचा दगाफटका होवू नये म्हणून आमदारांना सुरक्षित स्थळी तातडीने नेण्यासाठी विशेष विमान नागपुरात सज्ज ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती आहे.

# गांजा तस्करीत आरोपीची सुटका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

गांजा तस्करीत सापडलेल्या दिल्लीच्या तरुणाची न्यायालयाने आरोप सिद्ध होऊ न शकल्यामुळे सुटका केली आहे. अजय खेमानंद भट्ट (30) असे सुटका झालेल्या तरुणाचे नाव आहे. अजयविरुद्ध 30 मार्च 2021 रोजी पारडी ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता.

एक व्यक्ती एचआर-55/व्ही-5583 क्रमांकाच्या कारने आऊटर रिंगरोड मार्गे गांजाची तस्करी करून दिल्लीला जात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या एनडीपीएस सेलला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी महालगाव कापसी पुलावर सापळा रचला. माहितीच्या आधारावर वरील क्रमांकाचे वाहन थांबविण्यात आले. पंचासमोर कारची झडती घेतली असता डिक्कीत प्लॅस्टिकची 6 पोती आढळली. त्यामध्ये 160 किलो गांजा होता. चौकशीत अजयने गांजा तस्करीद्वारे दिल्लीला नेत असल्याची माहिती दिली होती. तसेच तो तेथे गांजा विक्रीचा व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. पोलिसांनी माल जप्त करून अजयविरुद्ध पारडी ठाण्यात गुन्हा नोंदवून अटक केली.

तपासाअंती पोलिसांनी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एच.सी.शेंडे यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. बचावपक्षाचे वकील रमेश रावलानी आणि अतुल रावलानी यांनी न्यायालयाला सांगितले की, एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविताना सुप्रिम कोर्टाच्या निदेर्शांचे आणि कायद्याचे पालन करण्यात आले नाही. तसेच तपासात हे सिद्ध होऊ शकले नाही की, सहा पोत्यांमध्ये गांजाच होता. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला संशयाचा लाभ देत सुटका करण्याचे आदेश दिले.

# गणेशपेठ येथून बससेवा पूर्ववत सुरु

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

विधानसभेच्या निवडणूकीसाठी दोन दिवस एसटी महामंडळाच्या बसेस उपलब्ध नसल्याने मंगळवार आणि बुधवारी प्रवाशांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागला होता. मात्र आता गुरुवारपासून एसटी महामंडळाच्या बसेस सर्व मार्गावर सुरु झाल्याने प्रवाशांनी व्यक्त केला आहे. याशिवाय मनपाच्या शहर बसेस सुध्दा उपलब्ध नसल्याने मोरभवन येथून सुटणाऱ्या बसेस दोन दिवस बंद होत्या. त्यामुळे प्रवाशांना ऑटो किंवा इतर वाहनातून प्रवास करावा लागला. दरम्यानच्या काळात ऑटोचालकांचा चांगला व्यवसाय झाला. मुख्यतः स्थानिक गणेशपेठ आणि मोरभवन येथील बसस्थानकावर गुरुवारी दिवसभर प्रवाशांची वर्दळ आली. सर्वच मार्गावर बस सेवा उपलब्ध असल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. निवडणूक प्रक्रियेसाठी एसटी महामंडळाच्या जवळपास २३० बसेस तर महानगरपालिकेच्या ४२५ बसेस दोन दिवसाकरिता व्यस्त असल्याने प्रवाशांना पयार्यी साधनाचा उपयोग करावा लागला. हजारोंच्या संख्येने असलेल्या निवडणूक कर्मचाऱ्यांना पोलिंग बुथ वर ने-आण करण्याकरीता या बसेसचा उपयोग करण्यात आला होता. मतदानाच्या आणि मतदानाच्या दिवशी रात्री उशिरापर्यंत एकूण ६५५ बसेस निवडणूकीच्या कामात लावण्यात आल्या होत्या. सर्वच्या सर्व बसेस गुरुवारी विविध मार्गावर धावत असल्याने एसटी महामंडळ व शहर परिवहन विभागाच्या बस स्थानकावर प्रवाशांची गर्दी होती. शहर व ग्रामीण भागातील पोलिंग बुथवर ईव्हीएम मशिनसह कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी १२ विधानसभा मतदारसंघात बसेस धावत होत्या. हिंगणा, कामठी-मौदा, सावनेर, उमरेड, रामटेक येथून रात्री उशिरा बसेस परत मिळाल्या. २० नोव्हेंबरच्या मध्य रात्री सर्व बसेस डेपोत परत आल्यानंतर सकाळपासून बस सेवा पूर्ववत करण्यात मदत झाल्याची माहिती एसटी महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक श्रीकांत गभणे व मनपाच्या परिवहन विभागाने दिली आहे.

# भाजपाच्या फोडाफोडीमुळे आम्ही अलर्ट : नाना पटोले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

निवडून आलेल्या आमदारांना तातडीने हलवण्याची तयारी आमची आहे. भाजपने राजकीय व्यवस्थेत आमदार फोडण्याची पद्धत सुरू केली आहे. त्यामुळे आम्ही अलर्ट राहू. आम्ही सगळीकडे नजर ठेवून आहोत अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी येथे माध्यमांशी बोलताना दिली.

अपक्ष उमेदवारांसोबतही आमचा संपर्क सुरू आहे असे ते म्हणाले. लढत थोडी टफ झाल्यास हरियाणामध्ये घातला तसा घोळ भाजपा इथे घालण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आम्ही अलर्ट राहणार आहोत. मी स्वतः उद्या सर्व उमेदवारांशी बोलणार आहे.



शिंदेसेनेचे प्रवक्ते शिरसाट यांनी शरद पवारसोबत जावू असे वक्तव्य केले आहे. परवा निकाल लागत आहे.

निकालानंतर महाराष्ट्रात अनेक घडामोडी होतील. भाजपबरोबर कोणीच राहायला तयार नाही. होणाऱ्या घडामोडींवर आम्ही लक्ष ठेवून आहो. राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार आहे. राहिला प्रश्न मुख्यमंत्री कोण होणार याचा. तर आधी बहुमत येवू द्या, मग पक्षश्रेष्ठी याचा निर्णय घेवू असे पटोले यांनी सांगितले. वाढलेल्या मतदानाचा लाभ आम्हालाच होईल असे ते म्हणाले.

नाना पटोले मुख्यमंत्री होणार असतील तर काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी त्यांचे नाव जाहीर करावे असे संजय राऊत म्हणाले. त्यावर बोलताना पटोले यांनी मुख्यमंत्री पदा संदर्भात कुठलीही चर्चा नाही. यासंदर्भात महाविकास आघाडी निर्णय घेईल असे ते म्हणाले. सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांना त्यांचा नेता मुख्यमंत्री व्हावा असे वाटते. हे चालत राहणार आहे. परवा निकाल येणार आहे.

# तडीपार महिला मिळाली घरी

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर जिल्ह्यातून तडीपार एका महिलेला तिच्या घरून अटक केली. नलिनी उर्फ सोनी सिद्धार्थ कांबळे (32) विक्तूबाबानगर, कामठी असे अटकेतील महिलेचे नाव आहे. परिमंडळ क्र. 5 च्या उपायुक्तांनी नलिनीला 16 सप्टेंबर 2024 रोजी नागपूर शहर व ग्रामीणमधून तडीपार केले होते. गुन्हे शाखेचे पथक कामठी पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान नलिनी तडीपार असतानाही विना परवानगी घरी येऊन रहात असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसरात सापळा रचून धाड टाकली असता ती घरी मिळाली. नलिनीला अटक करून तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# रेल्वे स्थानकावर महोत्सव साजरा

**नागपूरः** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील बारबटपूर रेल्वे स्थानकावर स्टेशन महोत्सव साजरा करण्यात आला. रेल्वेच्या वारशाची सर्वसामान्य नागरिकांना माहिती व्हावी,यासाठी रेल्वे प्रशासनाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. यात प्रामुख्याने रेल्वे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी सहभाग नोंदविला.



नागपूर : पश्चिम नागपूर विधानसभा मतदार संघातील श्रीमती पद्मावती प्रेमकरण सुराणा, रा. सिव्हिल लाइन्स नागपुर या १०५ वर्षीय वृद्ध आजीबाईने युगांतर हायस्कूल मधील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला.

# जागतिक शौचालय दिनी स्वच्छतादूतांचा सन्मान




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

नागपूर महानगरपालिका द्वारा जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून शहरातील शौचालयांची नियमित स्वच्छता करणाऱ्या स्वच्छता दूतांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. नागपूर महानगरपालिका आयुक्त तसा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या नेतृत्वात स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्याकडून जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून मनपा हद्दीतील सामुदायिक शौचालय आणि सार्वजनिक शौचालयांची नियमित रित्या स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सत्कार करण्यात आला.

तसेच शहरातील विविध सामुदायिक शौचालयांपुढे आकर्षक रांगोळी काढण्यात आली. याशिवाय शौचालयाचे देखरेख करणाऱ्या कर्मचाऱ्याचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

स्वच्छ, सुंदर, स्वस्थ व हरित नागपूर साकारण्यासाठी नागरिकांनी देखील पुढाकार घेत शहर स्वच्छतेसाठी सक्रीय सहभागी नोंदवावा असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

# ॲग्रोव्हिजनचे आज भव्य उद्घाटन

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी व मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांची प्रमुख उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ॲग्रोव्हिजनचे आज, 22 नोव्हेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता पीडीकेव्ही ग्राउंड, दाभा येथे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणा-या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एसटीपीआयचे महासंचालक अरविंद कुमार, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, एमपीकेव्ही राहुरीचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, माफसू नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, महिंद्रा ट्रॅक्टर्सचे सीईओ विक्रम वाघ, क्रॉप केअर फेडरेशनचे अध्यक्ष दिपक शहा, कार्पोरेट रिलेशन्स ॲड अलायन्स टॅफे टॅक्टर्सचे समूह अध्यक्ष टी. आर. केसवन व मदर डेअरीचे प्रबंध संचालक मनीश बंदलीश यांची प्रमुख उपस्थितीत राहणार आहे. उद्घाटनानंतर मुख्य सभागृहात 12 वाजता विदभार्तील दुग्धव्यवसाय वाढीच्या संधी विषयावर महत्वाची परिषद होईल. भारतातील कृषी उत्पादनांचे उत्पादन करणाऱ्या अनेक नामवंत कंपन्या, संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे, प्रगत कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि सेवा क्षेत्रातील आघाडीच्या संस्थाचा यात सहभागी राहणार आहे. आयआयटी खरगपूर, एफटीपीआयचे स्टार्टअप्स तसेच, माहिती तंत्रज्ञानाचे स्वतंत्र स्टॉल्स राहणार असून ड्रोनची प्रात्यक्षिके देखील बघायला मिळतील. शेतकरी, उत्पादक, ग्राहक, कृषी विद्यार्थी आणि कृषीप्रेमींनी ॲग्रोव्हिजनला भेट द्यावी तसेच, शेतकऱ्यांनी कार्यशाळा व परिषदांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, आयोजन सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर व समिती सदस्यांनी केले आहे.

# पार्श्वनाथ पब्लिक स्कुलमध्ये बालदिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :



दुगधामना येथील पार्श्वनाथ पब्लिक स्कुल मध्ये बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्श्वनाथ पब्लिक स्कुलचे संचालक उदय टेकाडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्या अन्नु पाल, उपप्राचार्या सुजाता गुरवे उपस्थित होते. उदय टेकाडे यांनी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्हार अर्पण करून पंडीत नेहरू यांना अभिवादन केले. "पंडीत जवाहरलाल नेहरु आणि बालक दिन" या विषयावर शाळेमध्ये चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत उत्कृष्ट चित्र काढणाऱ्या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली. प्रथम क्रमांक पलक प्रसाद, द्वितीय क्रमांक त्रिषा झा,तर तृतीय क्रमांक सुहानी मस्के यांनी पटकावला. कार्यक्रमाचे संचालन जयश्री जामगडे यांनी तर आभार रुपाली इंगळे यांनी मानले.

विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात वर्ग १ते १० च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. वर्ग १ ला ने बिस्किट इटिंग हा खेळ खेळला आणि या खेळामध्ये वेद, मित, धनश्री, खुशी, अंकुश, दिव्यांनी, आरुषी आरव, साक्षी, स्वास्ति, हर्षिता यांनी सहभाग घेतला. या खेळांमध्ये वेद ने प्रथम क्रमांक पटकावला. वर्ग २ रा जंप ओव्हर हा खेळ खेळला. या खेळा मध्ये मारिया बेग, पुजा भारद्वाज, रिया पासवान, जोयान बेग, क्रिष्णा येसने, ओम किनकर, निलेश गिरहेपुजे, धनेश गुरपुडे, ओम ज्ञा, जयेश छत्रे, अंश बाविसताले, लविश ठाकरे, दक्ष बोरकर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या मध्ये जोयान बेग यानी प्रथम क्रमांक पटकावला वर्ग ३ रा कलेक्ट बास्केट बॉल यामध्ये अलिषा बेग, दिशा राऊत दीपिका तिवारी, नव्या पटेल, श्रेया पटेल, वैष्णवी मस्के, श्रद्धा कासूर्दे, संचाली बनकर, महिमा मेश्राम, शौर्य मंघटे, वंश बनकर, हितांशू ठवकर, मीत वानखेडे,शिवम विश्वकर्मा, विवान बोरकर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेमध्ये वैष्णवी मस्के हिने प्रथम क्रमांक पटकावला. वर्ग ४ था पासिंग द बॉल हा खेळ खेळला. या खेळामध्ये प्रभात, नीरव, अलीशा, त्रिशा, सत्यम, सान्वी, समीर, भूमी, हिमांशू, प्रियांशी, प्रांशू, योगेश्वरी, अहील, मोनिका या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या स्पर्धमध्ये सत्यम ने प्रथम क्रमांक पटकावला. वर्ग ५ वा एअर इन बॉलूनस- या खेळामध्ये रिया थेतमले, खुशी किनकर, क्रिशा राऊत, काव्या चीचमलकर, जिशा बोरकर, हिमांशी येसने,स्वरा गजभिये, मंथन गुरपुडे, दिव्यांश पारधी, अंश खांडेकर,वंश खांडेकर, अमित कालभुत,पियूष बागडे हर्ष चतुवेर्दी या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या मधे रिया थेटमाले नी तसेच अमित कालभूत या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. वर्ग -६ वा लिंबू चममचहा खेळ खेळ खेळला. या खेळामध्ये प्राजक्ता गजाम, प्रिया तिवारी, पलक प्रसाद,काव्या दाते या खेळा मध्ये पलक प्रसाद हिने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच बॅलन्स द पेन या खेळामध्ये विराज माळवे निशांत दाते,कुणाल मस्के, नमन बारंगे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या खेळामध्ये कुणाल मस्क नी प्रथम क्रमांक पटकावला.

वर्ग ७वा हिटिंग द बॉल हा खेळ खेळला. या खेळा मध्ये एकता रंगारी, यशश्री खोब्रागडे,लावन्या बागडे सक्षम पाईकराव,संचित गेडाम, लकी मस्के ह्या विद्यार्थांनी सहभाग घेतला. या खेळामधे एकता रंगारी हिने प्रथम क्रमांक पटकावला.वर्ग 8 वा.एअर इन बलून हा खेळ खेळला.

ह्या खेळामधे सागर पटेल, प्रकाश माझी, साक्षी चव्हाण, अलिना बेग,खुशी नशिने, विवेक उप्रिकर नयन तागडे, प्रतीक, कार्तिक ठाकूर, कार्तिक बडोले या विद्यार्थ्यानी सहभाग घेतला.या खेळा मधे सागर पटेल नी प्रथम क्रमांक पटकावला. वर्ग 9-वा व,म्युझिकल चेअर हा खेळ खेळला.या खेळा मध्ये शशांक गजभिये,आर्यन मेश्राम, तमन्ना, झा कृष्णा, नैतिक, खुशबू प्रसाद वांशिक बदन या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि या खेळामध्ये वंशिका बदन हिने प्रथम क्रमांक पटकावला. वर्ग १० वा बॉलन फ्रॉम बॅक साईड या खेळामधे कुणाल कटारे,पलक मस्के आयुष नारनवरे, अथर्व, अथर्व वानखेडे, अथर्व तलखंडे या विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता. या खेळामध्ये पलक मस्के हिने प्रथम क्रमांक पटकावला.२ -कपस प्यारमिड उसिंग बॉलोन या खेळा मधे ओम मस्के, आयुष गौतम, सुहानी मस्के,दक्ष जगताप, आयुष वासनिक, शांतनू गजभिये,आयुष गौतम यांनी सहभाग घेतला- या खेळा मध्ये आयुष गौतम याने प्रथम क्रमांक पटकावला.

3-हेड,शोल्डर, नीस कप या खेळा मधे नयन खोब्रागडे,मयूर मस्के सिम्मी झा, आदित्य सेलोकर अमन सोलंकी या विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता.या खेळा मधे नयन खोब्रागडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.खेळा मधे जिंकनाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले.विद्यार्थ्यांसाठी सर्व शिक्षिकान कडून पेन पेनसिल भेट म्हणून देण्यात आले.



# रामकृष्ण वाघ कॉलेज येथे शंभर टक्के मतदानाचा आग्रह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित, रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे, पालक शिक्षक सभेच्या निमित्ताने मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. मारोती वाघ हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे डॉ.एम.एस. वानखेडे (प्राचार्य रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफर्स अँड कॉमर्स), आय.क्यू.एस.सी समन्वयक प्रा. पंकज झगडे, प्रा. ढोबळे मॅडम इ. मान्यवर उपस्थित होते.

प्राध्यापक संजय पाठक यांनी उपस्थितांकडून मतदान शपथविधी सामूहिकरीत्या घेतली. यावेळी डॉ.मारोती वाघ यांनी नागरिकांना निवडणुकीत सक्रिय सहभाग घेण्याची व शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. पालक शिक्षक सभेच्या निमित्ताने उपस्थित असलेल्या पालकांना मतदान करण्याची शपथ दिली तर, प्राध्यापक पाठक यांनी उत्तम सरकार निवडण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन मतदान करण्याचे व देशाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शुभांगी वाघ यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

# पिस्तूल-काडतूससह तरुणास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

पारडी पोलिसांनी ठाण्यांतर्गत गस्ती दरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर एका तरुणाला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ एक देशी बनावटीची पिस्तूल आणि जिवंत काडतूस मिळाले. पोलिसांनी पिस्तूल आणि काडतूस जप्त करून तरुणाला अटक केली. चेतन प्रकाश कासार (19) रा. गोंडपुरा, पारडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

मध्यरात्री 1 वाजताच्या सुमारास पारडी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान एक तरुण पिस्तूल घेऊन फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर जबलपूर मार्गावर सापळा रचून संशयित चेतनला ताब्यात घेण्यात आले. पंचासमोर त्याची झडती घेतली असता पॅन्टमध्ये एक देशी बनावटीची पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस मिळाले.

पोलिसांनी 20,500 रुपये किंमतीचा माल जप्त करून चेतनला अटक केली. त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक रंजित शिरसाट, उपनिरीक्षक अरविंद कोल्हारे, हवालदार नितीन बोबडे, संदीप लांडे, दिलीप अवगान यांनी केली.

# एम्समध्ये राष्ट्रीय फार्माकोलॉजी परिषद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

अ.भा. आयुर्विज्ञान संस्थेत नॅशनल असोसिएशन ऑफ फामाकोलॉजी अँड थेराप्यूटिक्सच्या मार्गदर्शनाखाली २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान पदव्युत्तर फामाकोलॉजी विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली असल्याची माहिती एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सर्वोतम आरोग्य सेवेसाठी आधुनिक नवनवीन सीमांचा शोध' हा या परिषदेचा विषय आहे. या परिषदेत औषध निर्माण कंपन्यांमधील तज्ज्ञ तसेच राष्ट्रीय महत्वाच्या संस्थांमधील शैक्षणिक तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले आहे. ५१० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होतील.

परिषदेचे आयोजक सचिव व एनपीटीचे सरचिटणीस डॉ. गणेश डाखळे यांनी सांगितले की, २१ नोव्हेंबरला कृत्रिम बुद्धिमतेच्या नैदानिक संशोधनासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी १२० सहभागींसाठी दोन परिषदपूर्व कार्यशाळा होतील.

प्राध्यापक, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन सक्षम आरोग्यसेवक बनवता येईल, अशा वैद्यकीय शिक्षण विषयांवर चर्चा होईल.

समाकलित संशोधन, ऑन्कोलॉजी व लस चाचण्या तसेच नैदानिक चाचण्यांच्या संदर्भात नवीन औषध विकासाचे महत्त्व, यावर चर्चा होईल. संशोधन सादर करण्याची २५० विद्यार्थी व प्राध्यापकांना संधी दिली जाणार आहे. या माध्यमातून तरुण संशोधकांना व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनीष श्रीगिरीवार. डॉ. अनंत खोतइतर डॉक्टर्स पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

# आता सर्वेक्षक करणार मोजणीचे काम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. २१ :

काटोल उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयात कार्यरत निमतानदार (सर्वेक्षक) संदीप भोरकर यांची जिल्हा अधीक्षक कार्यालय नागपूरच्या वतीने नरखेड उपअधीक्षक कार्यालयात तात्पुरती बदली केली आहे. आता ते नरखेड विभागातील मोजणीचे काम करणार आहेत. सततच्या तक्रारींमुळे त्यांची बदली करण्यात आली आहे.

काटोल भूमिअभिलेख ` उपधीक्षक कार्यालय काटोल येथील निमतानदार (सर्वेक्षकाने) पोट हिस्सा मोजणी प्रकरणात मुद्दाम चुक करून कार्यालयाचे उंबरठे झिजविण्याची वेळ आणणाऱ्या संदीप भोरकर यांच्या अनेक तक्रारी आहेत. अनेकांना नाहक त्रास असल्याने भोरकरांच्या तक्रारी नागपूर येथील वरिष्ठ कार्यालयात आहेत. वरिष्ठांशी लागेबांधे असल्याने त्यांच्यावर कारवाई होत नव्हती. भोरकर काटोल कार्यालयात रुजू झाले तोपासून कर्मचाऱ्यांच्या तक्रारी आहेत. अनेक जन माझं काम होणार नाही म्हणून लेखी तक्रार करीत नसे. विचारणा केली असता कुठे जायचे ते जा, असे सांगून ते दमदाटी करीत असल्याचे अनेकांनी सांगितले. त्यांच्या चुकीमुळे अनेकांना कार्यालयाच्या पायऱ्या झिजविण्याची वेळ आल्याचे पुढे आले होते. पीडित शेतमालक मुकेश बघेल (रा. नागपूर) यांचे काटोल तालुक्यातील चमेली-हरदोली येथील शेतमोजणी चुकीची करून दुरुस्ती होत नसल्याच्या तक्रारी आहेत. मोहम्मद असलम मोहम्मद इस्माईल शेख (रा. गिट्टीखदान) यांचे डोरली भिंगारे क्षेत्रातील शेतजमीन मोजणी करतेवेळी केलेल्या चुकीमुळे झालेल्या नुकसानीची तक्रार वर्षभरापासून कार्यालय व वरिष्ठ कार्यालयाचे उंबरठे शिजवले. मात्र अद्याप कारवाई झाली नाही. त्यांच्या प्रकरणात दुरुस्ती करून न दिल्याने मनस्ताप होत असल्याचे त्यांनी सांगितले. यातील अनेकांची कामे सोप्या पद्धतीने होणार होती.

मात्र तक्रारदारांची कामे भोरकर यांच्या चुकीने क्लिष्ट झाली. काहींची झाली नाहीत. अशा अनेक तक्रारी असल्याने त्यांची नरखेड उपअधीक्षक कार्यालयात तात्पुरती बदली करण्यात आल्याचे आदेश निघाले.

यातून काटोल भूमिअभिलेख कार्यालय मुक्त झाले असले तरी अनेकांना नाहक त्रास होत आहे. प्रत्यक्षात ही कारवाई नाही. या कर्मचाऱ्याला पाठीशी घालण्याचे काम केल्याचा आरोप काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केला आहे.

# हक्क मतदानाचा... संवीधान रक्षणाचा !

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

वयाच्या ९६ व्या वर्षी एका वीर शहीदाच्या मातेने व्हीलचेअर वर बसून आपला मतदानाचा हक्क बजावला. रामनगर निवासी शहीद विजय सरमुकद्दम यांच्या मातोश्री शोभा सरमुकद्दम यांनी वयाच्या ९६ व्या वर्षी आपले समवैधानीक कर्तव्य पार पाडले.

विशेष म्हणजे यापूर्वी त्यांनी लोकसभेच्या १७ निवडणुकीत आणि विधानसभेच्या अनेक निवडणुकीत मतदान केले आहे. पुढच्या लोकसभा निवडणुकीतही मतदान करण्याचा त्यांचा निर्धार आहे. आजही मतदान करतांना त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. अशाच लोकांमुळे भारतात लोकशाही जिवंत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून १४ शिष्यवृत्ती योजना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

शिष्यवृत्ती न मिळाल्याच्या विद्यार्थ्यांच्या अनेक तक्रारी असतात. यामुळे विद्यार्थ्यांना लाखो रुपयांचा भूर्दंडही बसत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा यासाठी शासनाकडून विशेष मोहिम घेतली जाणार आहे. राज्याच्या उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून १४ शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात. मात्र प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेत शिष्यवृत्तीसाठी अतिशय कमी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरले आहेत.

येत्या २५ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विशेष मोहीम राबवावी, अशा सूचना शिक्षण विभागातर्फे देण्यात आले आहेत.

पुणे विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयातर्फे शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डेक्कन कॉलेज, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गोखले इन्स्टिट्यूट, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ यासह विद्यापीठांशी संलग्न सर्व अनुदानित विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संलग्न महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज भरून घेण्यासाठी विशेष मोहीम राबवावे. उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेत अतिशय कमी ऑनलाईन अर्ज महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त झाले आहेत,असे शिक्षण विभागातर्फे वेळोवेळी घेण्यात आलेल्या ऑनलाईन मीटिंग, प्रसिद्ध करण्यात आलेली परिपत्रके, तसेच वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांमधून कळविण्यात आले आहे.

शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा, इंटरनेट सुविधा उपलब्ध करून द्यावी. महाडीबीटी पोर्टलवर विशेष मोहीमे अंतर्गत राबविण्यात आलेल्या सप्ताहाच्या अनुषंगाने कार्यवाहीचा अहवाल उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयास सादर करावा.

# दक्षिण नागपुरात उत्साहात मतदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघात बुधवारी उत्साहात मतदान झाले. बुधवारी सकाळी सात वाजता मतदान सुरू झाले. बिंझाणी महाविद्यालयाच्या बूथ क्रमांक ५३, ५४ वर सकाळपासूनच मतदारांच्या रांगा होत्या. येथील खोली क्र. ११मध्ये मात्र कर्मचारी संथ होते. एक मतदार दुसऱ्या दाराने आत आला. तेथील नाव तसेच फोटो तपासण्याची जबाबदारी असलेला कर्मचारी त्या मतदाराचे नाव शोधत होता.

चंदननगरातील कामगार कल्याण केंद्र, हनुमान नगर महानगरपालिका शाळा, जुना सुभेदार ले- आऊटमधील महापालिका शाळा, भगवान नगरातील एसरा कॉन्वेंट, रिंगरोडवरील संजय गांधी हायस्कूल, जकाते हायस्कूल, महात्मा गांधी नगरातील संजय हायस्कुल, रामभाऊ म्हाळगी नगरातील महापालिका शाळा, आशीर्वाद नगरातील दादासाहेब ठाकरे हायस्कूल, बीडपेठमधील संजय गांधी स्मृती शाळा, नॅशनल हायस्कुल, सावित्रीबाई फुले उर्दु शाळा, ताजुद्दीनबाबा आयटीआय, ताज हायस्कुल आदींसह अनेक केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांचा उत्साह दिसून आले.

सकाळच्या सत्रातच मतदान कसे उरकता येईल, यावरच नागरिकांचा भर दिसला. हनुमाननगर, दुर्गानगर, भगवाननगर, विश्वकर्मानगर, रामेश्वरी, ओंकारनगर, अमरनगर, विठ्ठलनगर, जानकीनगर, बीडपेठ, आशीर्वादनगर, ताजबाग परिसरातील मतदान केंद्रावर मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय होती. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. दुपारच्या सत्रात मतदानासाठी येणाऱ्यांची संह्यया काहीशी मंदावलेली दिसली. शिवाय मतदानाची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याचे दिसून आले. ज्येष्ठ व दिव्यांगाना मतदान करता यावे म्हणून काही राजकीय पक्ष्याच्या वतीने ऑटो-रिक्षाची व्यवस्थाही केली होती. त्यासाठी प्रशासनातर्फे दिव्यांग रथ होता.

सर्वच मतदान केंद्रांबाहेर कार्यकर्ते सकाळी न्याहारी, दुपारी आस्वाद घेत होते. अनेक ठिकाणी नावे शोधण्पासाठी लॅपटॉपचा वापर दिसला. मतदार यादीतून व ॲपमधून नावे शोधून दिली जात होती. मुख्य म्हणजे मतदार यादीसंबंधी किरकोळ अपवाद वगळता तक्रार दिसली नाही. मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास मज्जाव असल्याचे ठळकपणे प्रदर्शित केले होते.

पोलिसही तसे सांगत असल्याचे दिसले. दक्षिण नागपुरातील सर्वच केंद्रांवर पोलिस बाहेर गृहरक्षक तैनात होते. सर्वच केंद्रांवर मतदान संथ होत असल्याचे दिसून आले.

# काँग्रेसकडून आमदारांसाठी विशेष विमानाची व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी काल मतदान झाले. काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे. येथील ६२ जागांपैकी ३५ ते ४० जागा मिळतील, अशी अपेक्षा काँग्रेसला आहे. त्यामुळे मतदान होताच नियोजन सुरू झाले आहे.

मतदानाचा टक्का वाढल्यानंतर काँग्रेसचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावर पूर्व विदभार्तील आमदारांच्या व्यवस्थेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काँग्रेसच्या आमदाराशी दगाफटका होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येत आहे. २३ नोव्हेंबरला निकाल येताच आमदारांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच निवडून येण्याची शक्यता असलेल्या अपक्ष उमेदवारांच्या संपर्कात राहण्याची जबाबदारी विजय वडेट्टीवार यांच्यावरच सोपवण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर लगेचच ह्यएक्झिट पोल्सह्नचे अंदाज यायला सुरुवात झाली. जवळपास सर्वच पोल्सनी महायुतीची सत्ता पुन्हा येणार असल्याचा अंदाज व्यक्त केला. महाविकास आघाडीही बहुमतापासून किंचित लांब असल्याचे दिसते आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निकाल आल्यानंतरच निकालाचे खरे चित्र समजू शकेल. मात्र तत्पूर्वी ह्यएक्झिट पोल्सह्नी पक्षनिहाय जे अंदाज व्यक्त केले आहेत, त्यावरून काँग्रेस तयारीला लागले आहे.

लोकसभा आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या वेळी विविध वृत्तवाहिन्या आणि संस्थांचे अंदाज साफ चुकले असताना राज्य विधानसभा निवडणुकीतही विविध संस्थांनी संमिश्र अंदाज वर्तविले आहेत. काही संस्थांनी महायुती आणि महाविकास आघाडीत फार अंतर नसेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. रिंगणातील सहा पक्ष, छोटे पक्ष तसेच बंडखोरांमुळे नेमके चित्र स्पष्ट होत नाही.

मात्र, काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे. पण, भाजपची राजकारणाच्या शैली आता जगजाहीर आहे. त्यामुळे काँग्रेस कुठलाही धोका पत्करण्यास तयार नाही. त्यासाठी आतापासून पावले टाकली जात आहेत. आमदारांना कुठल्याही प्रकारचा दगाफटका होऊ नये म्हणून आमदारांना सुरक्षित स्थळी तातडीने नेण्यासाठी विशेष विमान नागपुरात सज्ज ठेवण्यात आले आहे, अशी माहिती आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६७ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 51 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. गुरूवार (21) रोजी शोध पथकाने 67 प्रकरणांची नोंद करून 50,500/- रुपयाचा दंड वसूल केला.





हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 10 प्रकरणांची नोंद करून 4,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 5 प्रकरणांची नोंद करून 500/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 12,00/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 8,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 15 प्रकरणांची नोंद करून 22,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्याचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकाने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 3,000/ रुपयांची वसुली करण्यात आली.

सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/ साठवणे या अंतर्गत्त 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 19 प्रकरणांची नोंद करून 3,800/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 6 प्रकरणांची नोंद करून 6,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धंतोली झोन अंतर्गत मे. अनंत आनंद डेव्हलपर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. बालाजी एंटरप्राईजेस यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने 2 प्रकरणांची नोंद करून रू. 15,000/- दंड वसूल केला.

# काटोल विधानसभेत ७० मतदारांनी पार पाडले आपले राष्ट्रीय कर्तव्य

## २८१३६७ मतदारांपैकी १९६८०१ मतदारांचे मतदान

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २१ :

विधानसभा मतदारसंघात एकूण २८१३६७ मतदारां पैकी १९६८०१मतदारांनी मतदान केले . यात १४२६२३ पुरुष मतदारां पैकी १०२२७८तर १३८७३८ महिला मतदारानां पैकी ९४५२३ मतदारांनी मतदान केले.

काटोल विधानसभा निवडणुक निर्णय अधिकारी पियुष चिवंडे,सह निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार राजू रणवीर, उमेश खोडके, भागवत पाटील, संजय भुजाडे, संजय डांगोरे, तसेच काटोल उपविभागीय पोलिस अधिकारी बापू साहेब-रोहोम यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढाळी, काटोल, नरखेड, जलालखेडा येथील पोलीस स्टेशन अधिकारी तसेच निवडणूक आयोगाचे माध्यमातून राज्यातील विविध शासकीय,निम शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्याने निवडणूक पार पडली. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे वरिल जीवघेणा हल्ल्याची घटना वगळता संपुर्ण मतदार संघात शांततेत पार पडली.




कोंढाळी-नगर पंचायतीचे ७५५६ महिला पुरुष मतदारांनी (६९.७४%) ७०% बजावला. काटोल विधानसभा मतदार संघातील नगर पंचायत कोंढाळी येथील नविन मतदार यादी नुसार ५४३४ पुरूष व ५४४२ महिला असे एकूण १०८७६मतदार असून २० नोव्हेंबर रोजी विधानसभेसाठी झालेल्या मतदानात -३९१३ पुरूष तर३६४३ महिला असे एकूण ७५५६-(७०%)मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

कोंढाळी नगर पंचायत मधील विद्यमान मतदार यादीत अनेक त्रुटी आढळून आल्या. यात सध्याच्या मतदार यादीत एकाच कुटुंबातील मतदारांचे नांव दुसर्याच्या - दुसर्या वार्डात टाकण्यात आल्याने ज्येष्ठ मतदारां सोबत नेता आले नाही. या मुळे दोन टक्के मतदान प्रभावित झाले.

**मतदार ५०टक्के मतदारांना चिठ्ठया मिळाल्याच नाही**

निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनेनुसार मतदारांना मतदान सुलभ होण्यासाठी मतदार कुठल्या मतदान केंद्रांवर मतदान करेल या बाबत चे माहिती पत्र प्रत्येक मतदाराला देण्याचे निर्देश होते. मात्र कोढाळी नगर पंचायत क्षेत्रातील याद्यांमध्ये अनेक त्रुट्यांचा फटका मतदाराला बसला. यातूनही २ते ३टक्के मतदान प्रभावित झाले आहे.

**राजकिय पक्षांचे कडूनही मतदार सुचना पत्र वाटपात दिरंगाई**

मतदारांना मतदान केंद्रावर सुलभतेने व नियोजीत स्थळी पोहोचता यावे या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने राजस्व 'धी तीत अन्य सहयोगी प्रशासनाचे सहकार्याने या पुर्वी व आताही प्रत्येक राजकीय पक्षा कडून घरो घरी जाऊन संबधीतीत मतदाराला बुथ चे माहिती बाबा माहिती पत्र (चिठ्ठया) मतदारां पर्यंत पोहचविल्या जात होत्या, मात्र मतदार यादीतच कुटूंबियनिहाय यादी नसल्याने, राजकिय पक्षांचे कार्यकर्ते ही मतदार यादीमधील अनेक मतदारांना मतदान केंद्र निहाय माहीती पत्र (चिठ्या) पोहचवू शकले नाही.

निवडून विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्या आधीच कुटूंबनीहात मतदार यादी बनविण्यासाठी योग्य नियोजन करावे, अशी मागणी मतदारांनी व राजकिय पक्षांचे बुथ निहिय कार्यकर्त्यांनीही केली आहे.

# महायुतीचा विजय निश्चित : नितीन गडकरी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

गत दहा वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नाने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाली आहेत. रस्ते, उड्डाणपूल, मेट्रो, सिंचन, कृषी क्षेत्रातील चौफेर विकास कायार्मुळे मतदारांनी विकासाला मतदान असल्यामुळे महायुतीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

टाऊन हॉल, महाल येथील मतदान केंद्रावर सहकुटुंब मतदान केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.मध्यवर्ती नागपूर शहराचा चौफेर विकास झाल्यामुळेच मतदारांनी विकासाला प्राधान्य दिले आहे. शहरातील अरुंद रस्ते चांगले सिमेंटचे झाले आहेत. नागपूरच्या मतदारांनी विचार न करता आम्हाला निवडून दिले आणि सेवा करण्याची संधी दिल्यामुळे शहराचा सर्वांगिण विकास करता आला. याचे श्रेय मतदारांना जाते. आगामी काळातही राज्यात विकास कामे होणार आहे.

आम्ही कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही. विकास कायार्ला आम्ही सुरुवातीपासून प्राधान्य देत आलो, तरी सुध्दा विरोधकांनी सातत्याने खोटा प्रचार करण्याचे काम सोडले जनतेची दिशाभूल करण्याचे काम कोणी करु नयेत.

केंद्र व राज्य सरकारने मुस्लिम असो किंवा दलित असो, सर्वच समाजातील लोकांना विविध योजनांचा फायदा मिळवून दिला आहे. तरी सुध्दा विरोधकांनी मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे कार्य कायम सुरुच ठेवले आहे. काँग्रेसच्या खोट्या प्रचारापासून मतदारांनी सावध राहण्याची गरज आहे. राज्यातील जनतेला विकास कायासोबतच इतर अनेक महत्वाच्या प्रश्न मार्गी लावण्यासाठी महायुतीच्या सरकारची गरज आहे.

पत्रकारांशी संवाद साधल्यानंतर गडकरी यांनी महाल येथील एका बुथवर जाऊन कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे नसल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत निवडणूक आयोगाची सिस्टीम फुल प्रूफ राहिली पाहिजे, याकडे अधिक गंभीरपणे देण्याची गरज व्यक्त केली.

# विधानसभा निवडणुकीमुळे एसटी विस्कळीत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

जिल्ह्यातील मतदान केंद्रांपर्यंत पोलिंग पार्टी व निवडणूक साहित्य पोहोचून देण्यासाठीएसटी बसेसची सेवा घेण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेत २३४ बसेस व्यस्त असल्याने नागपूर विभागातील एसटीच्या ८८४ नियमित फेऱ्या रद्द करण्यात आल्या. यामुळे प्रवाशांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागला.

नागपूर ग्रामीण क्षेत्रातील सर्व सहाही मतदार संघांतील मतदान केंद्रावर कर्मचारी व इव्हीएम मशीन पोचविण्यासाठी महामंडळाकडून बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परिणामी फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. सावनेर आगाराकडून सोडण्यात येणाऱ्या सर्वाधिक १९२ फेऱ्या रद्द राहिल्या. याशिवाय घाटरोड आगारातून सुटणाऱ्या १३३, गणेशपेठ ३०, उमरेड ११७, काटोल १२१, रामटेक १०२, इमामवाडा ८६ आणि वर्धमाननगर आगारातून सुटणाऱ्या १०३ बसफेऱ्या मंगळवारी रद्द राहिल्या.

बसेसची संख्याच कमी असल्याने प्रवाशांना बसच्या प्रतीक्षेत विविध बसस्थानकावर ताटकळत राहावे लागले. दुपारी ४ नंतर हळूहळू बसेस आगारात परत आल्यानंतर नियमित फेऱ्या सोडण्यात आल्या.

यामुळे रात्री प्रवाशांना दिलासा मिळू शकला होता. अशीच स्थिती बुधवारी बघायला मिळाली. रात्री उशीरापर्यंत बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी होती. शहरातील मतदान केंद्रांपर्यंत कर्मचारी, ईव्हीएम व मतदान साहित्य पोहोचवून देण्यासाठी आपली बसची मदत घेण्यात आली. प्रशासनाच्या मागणीवरून शहर बस वाहतूक विभागाच्या ताफ्यातील ४२५ बसेत उपलब्ध करून देण्यात आल्या. यामुळे शहरांतर्गत सार्वजनिक प्रवासी वाहतूक विस्कळीत झाल्याचे चित्र होते. शहरांतर्गत सेवेसाठी केवळ ४७ बसेसच उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. रस्त्यांवर आपली बसची हजेरी नव्हतीच. ऑटोचालकांनीही संधीचा फायदा घेत प्रवाशांकडून अतिरिक्त भाडे वसूल केले. बुधवारीही प्रवाशांना बसची प्रतीक्षा करावी लागली. बाहेरगावच्या प्रवाशांनी बसस्थानकातच मुक्काम ठोकल्याचे अनेक प्रकार घडले.

# तेज ज्ञान फाउंडेशनच्या रजत जयंती ध्यान महोत्सवाची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

हॅपी थॉट्स नावाने ओळखली जाणारी तेज ज्ञान ग्लोबल फाउंडेशन ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था असून जगभरात १२५ ठिकाणी साजर केला जाणार आहे.

स्थापना दिनाच्या आरोग्य महोत्सवी वर्षात प्रवेश करित आहे. या विशेषप्रसंगी तेज ज्ञान फाउंडेशन तर्फे येत्या 24 नोव्हेंबर २०२४ ला, अंध विद्यालय, वसंत नगर साउथ अंबाझरी रोड नागपूर येथे रजत जयंती ध्यान महोत्सव (सिल्वर जुबली सेलिब्रेशन ) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



त्यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पाहुणे म्हणून नागपूर पोलीस कमिशनर डॉ. रवींद्र कुमार सिंगल, निखिल चंदवानी आणि शेपाली दुधबडे यांची उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती पत्र परिषदेत दिली.

तेज ज्ञान फाउंडेशन ला २५ वर्ष पूर्ण होत आहेत च्यावतीने पत्रपरिषदेत उपस्थित मंचावरील पंकज बुटले, सुवर्णा कोंडांवार, विद्या बुटले, सुरेश फुले, आशिष मोटघरे आणि तुकाराम बावनकर यांची उपस्थिती होती.

# इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन तर्फे गुणवंत पाल्यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन तर्फे सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विज्ञान भारतीचे अध्यक्ष व माजी संचालक सीएसआयआर नीरी यांनी पाल्यांना व पालकांना मुलांनी ज्या विषयत रुची त्यातच करिअर करावे व पालकांनी त्याला आपल्या इच्छा लादू नयेत असे सांगितले व एक ध्येय निश्चित करून त्याप्रमाणे वाटचाल करावी असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ईआर. सतीश रायपूरे, अध्यक्ष क्‍ए (क) स्थानिक केंद्र होते. त्यांनी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमचे प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष अनिल मानापुरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन अविनाश खाईवाले व यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता रक्षक दलाल गोविंद देहेडकर, अविनाश खाईवाले, नारायण घोगरे, अमित बदकी यांनी परिश्रम घेतले.

# कामावर असलेल्या मतदारांना मतदानासाठी सुविधा उपलब्ध करावे : महा.सचिव राधिका हेडाऊ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

लेबर प्रोग्रेसिव्ह फेडरेशन यांच्यावतीने महाराष्ट्र सचिव राधिका हेडाऊ यांनी कळविले की, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी सर्व मतदारांना आपल्या मतदानाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी निवडणूक विभागातर्फे आवाहन करण्यात आले आहे.जे मतदार औद्योगिक क्षेत्र, निमऔद्योगिक क्षेत्र, छोट्या आस्थापना येथे मतदानाच्या दिवशी कार्यरत आहेत त्यांना त्या व्यवस्थापनांनी मतदानासाठी सुट्टी अथवा सवलत द्यावी. असे परिपत्रक कामगार विभागातर्फे निर्गमित करण्यात आलेले आहेत. शक्य असेल त्या आस्थापनांनी लोकशाहीच्या उत्सवात मतदारांना उत्स्फूर्त सहभाग घेता यावा यासाठी सुट्टी द्यावी. हि सवलत भरपगारी आहेत.

याप्रसंगी उदाराम घाटे, विजय निनावे, दिलीप दाखोडे, रवी निमजे, नामदेव पिंपळीकर, देवेंद्र पाटील, रुपेश विजयकर, मनीषा कांन्द्रीकर, वनिता निनावे, मनीषा निमजे, मंदार टोणपे यावेळी उपस्थित होते. असे लेबर प्रोग्रेसिव्ह फेडरेशनच्या महाराष्ट्र सचिव राधिका हेडाऊ यांनी सांगितले.

# गायिका पल्लवी नगराळे यांच्या बहारदार गीतांची प्रस्तुती




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

दिवाळीचे औचित्य साधून तेजस्विनी बहुउद्देशीय सेवाभावी विकास संस्था, नागपूर द्वारा महाराजा सेलेब्रेशनस येथे खास महिलांसाठी भव्य दिवाळी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सिनेकलाकार भाग्यश्री उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले व महिलांनी प्रत्येक क्षेत्रात कार्य करावे करावे अशी प्रेरणा दिली.

यावेळी मंत्रमुग्ध म्युझिकल ग्रुपच्या प्रसिद्ध गायिका पल्लवी नगराळे यांनी आपल्या सुमधूर गायनातून मराठी-हिंदी गीते सादर करून सर्व महिला श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सोबतच गायक दिनेश तिवारी, सतीश गिरी, जगन सिंग तसेच ऑरगन-शंकर थोरात, ढोलक- सुनील ईंगळे, ऑक्टापॅड-प्रकाश निमगडे यांची साथसंगत लाभली.

यावेळी ग्रुप कडून भाग्यश्री स्पेशल प्रश्नमंजुषा ठेवण्यात आली होती. महिला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे संचालन मुकुंद ढोक यांनी तर आभार वैशाली केळकर यांनी मानले.

# नागपूरचा पारा १३.५ अंशांवर

नागपूर : गेल्या दोन तीन दिवसांपासून शहरातील किमान तापमानाचा पारा चांगलाच घसरला असून, आता थंडीचा अनुभव येत आहे. मंगळवारी कमाल ३०.४ अंश सेल्सिअस तर किमान १३.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. विदर्भात सर्वात कमी किमान तापमान गोंदियाचे १३.२ अंश होते. उत्तरेकडील थंड वारे विदर्भाकडे येत असल्याने नागपुरातील तापमानाचा पारा घसरत आहे.

परिणामी थंडी वाढू लागली असून किमान तापमान घसरणार असल्याची माहिती हवामान दिली आहे. दिवाळी दरम्यानच्या काळात थंडीचे प्रमाण कमी होते. मात्र आता थंडी हळूहळू वाढत असल्याने स्वेटर, मफलर, शाल, जॉकिट बाहेर निघाल्या आहेत. पुढील काही दिवसांमध्ये नागपूरचा पारा घसरण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तापमानात १ ते २ अंशांनी घट झाल्याने गारठा वाढला आहे.

# निरोगी जीवनासाठी निसर्गोपचाराची नितांत गरज : गौरी चांद्रायण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

विदभार्तील एकमेव संजीवन निसर्गोपचार आणि योग केंद्रात सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असून यामुळे अनेकांना लाभ झाला आहे. निसर्गोपचारामुळे अनेकांना लाभ झाला असून आपले आरोग्य ठणठणीत ठेवण्यासाठी प्रत्येकांनी निसर्गोपचाराकडे वळावे, असे आवाहन ॲड. गौरी चांद्रायण यांनी केले. संजीवन सोशिओ मेडिकल फाऊंडेशन संचालित संजीवन निसर्गोपचार आणि योग केंद्राच्या वतीने आमगाव (देवळी) हिंगणा येथे निसर्गोपचार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.



राष्ट्रीय निसर्गोपचार दिनानिमित्त पाच दिवसीय निसर्गोपचार शिबिराचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात प्रामुख्याने मेडीकल कॉलेजचे माजी अधिष्ठाता डॉ. हरिभाऊ कानडे, आयुवेर्दाचार्य डॉ. कानडे, होमियोपॅथ डॉ. ज्योती नेत्ररोग तज्ञ डॉ. आकांक्षा अग्रवाल, पॅथालॉजिस्ट डॉ. सिध्दम आदी उपस्थित होते. आपली जीवनशैली निरोगी करण्यासाठी आवश्यक बदल आणि नैसर्गिक घरगुती उपचारांबाबत डॉ. मानधाता विश्वकर्मा यांनी मार्गदर्शन केले. संजीवन निसर्गोपचार केंद्रात गत दोन वर्षात ५ हजार ८०० व्यक्तींवर नॅचरोपॅथीचे उपचार केले गेले असून त्यांना व्याधीमुक्त करण्यात आल्याचे डॉ. उगेमुगे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव डॉ राजू मिश्रा, डॉ. राखी खेडीकर यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. विश्वकर्मा यांनी आभार मानले. शिबिराला शिबिरार्थींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# ग्रीन फाउंडेशनच्या सत्रांना उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन नागपूर चॅप्टरने व्हीएनआयटी येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत ग्रीन फाऊंडेशन नागपूरने "शाश्वत पायाभूत सुविधा विकास, जैवविविधता आणि हवामान बदलावरील प्रभाव" या विषयावर चार सत्रांचे यशस्वी आयोजन केले. ग्रीन फाउंडेशनचे अध्यक्ष व नीरीचे माजी संचालक डॉ. सतीश वटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रांमध्ये ग्रीन फाउंडेशनचे सत्र समन्वयक डॉ. डी.जी. गारवे, कॅप्टन डॉ. एल. बी. कलंत्री यांची उपस्थिती होती. आयसीडब्ल्यूएसडीचे सल्लागार अध्यक्ष्ज्ञ व व्हीएनआयटीचे माजी प्रा.डॉ.व्ही.एम. म्हैसाळकर यांची ही संकल्पना होती.



डॉ. सतीश वटे यांनी प्रास्ताविकातून पृथ्वीवरील पाण्याच्या अस्तित्वाचे महत्त्व विशद केले.

पहिल्या सत्रात एनिया डिझाइन प्रा. लिमिटेडचे कार्यकारी संचालक वास्तुविशारद वेदप्रकाश पूर्णेंदू यांनी ह्यग्रीन इन्फ्रास्ट्रक्चर बिल्डिंग विथ नेचर या विषयावर आपले विचार आणि अनुभव सांगितले.

दुस-या सत्रात ह्यएनलिव्हिंग बायोडायव्हर्सिटी ऑफ नागपूर सिटी विषयावर ग्रीन फाउंडेशनचे जैवविविधता तज्ञ दिलीप चिंचमलतपुरे आणि नागपूर विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. नितीन डोंगरवार यांचे मार्गदर्शन लाभले.

**जाहिरनामा / सायटेशन नोटीस**

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांचे न्यायालय**

सक्सेशन केस नं. ८६/२०२४
पे.ता. : ०३/०१/२०२५
प्रोसेस नं. १७७४ /२०२४

Applicants : Ravindra S/o Shalikramji Deoke, Aged 54 Years, Occu. Private, Ro Ramkrushna Society, Tara Mata Chowk, Yerkheda, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
2. Smt. Pramila W/o Pralhad Deshmukh, Prior to Marriage Pramila D/o. Shalikramji Deoke, Aged 56 Years, Occu. Housewife, R/o Near Hanuman Mandir, Telipura, Yerkheda, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
3. Archana W/o Suresh Tadse, Prior to Marriage - Archana D/o. Shalikramji Deoke, Aged 51 Years, Occu. Housewife, R/o Near Durga Mandir, Lakadganj, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur
4. Avinash S/o Shalikramji Deoke, Aged 47 Years, Occu. Private, R.o Near Tara Mata Mandir, New Yerkheda, Tah Kamptee, Dist. Nagpur
---- V/S ----
Non applicant - NIL

मयतः-Kamalbai Shalikram Devke, who died on 04/01/2024, मयत ठिकाण तारामाता चौक येरखेडा कामठी

सदरहु अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Kamalbai Shalikram Devke, who died on 04/01/2024, याचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क स्तर, कामठी यांनी दि. ०३/०१/२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारांना Kamalbai Shalikram Devke, यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

**जाहिर नोटीस**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांचे न्यायालय**

सक्सेशन केस नं. ०४/२०२४
पे.ता. : २३/१२/२०२४
प्रो. नं. १७०३

अर्जदार : १. झमीर अहमद दिदार अहमद, रा. प्लॉट न. १८/अ, हाऊस नं २०४५, कलमना रोड, मोह अली बी.एड. कॉलेज जवळ, सीव्हील कॉलनी, येरखेडा, कामठी, नागपूर
२. झूबेर अहमद दिदार अहमद रा. हाऊस नं. २०४५, कलमना रोड, मोह. अली बी.एड. कॉलेज जवळ, बी.बी. कॉलनी येरखेडा, कामठी, नागपूर
३. रूखसाना रूबी आबीद झहीर रा. प्लॉट नं. ३२, उमर बील्डींग, नवीन ग्रामपंचायत जवळ, टीचर कॉलनी, न्यू येरखेडा, कामठी, नागपूर
४. रखशंदा रूही मोहम्मद अफझल अन्सारी, रा. प्लॉट न. १६६, कलमना रोड, सीव्हील कॉलनी, येरखेडा, मोह. अली बी.एड. कॉलेज जवळ, कामठी, नागपूर
५. समीना कौसर आतीफ अख्तर, रा. व्हेटर्नरी कॉलेज जवळ, डॉ शेख बुनकर कॉलनी, कामठी, नागपूर
---- विरुध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही

सदरहु अर्जदाराने सक्सेशन सर्टीफिकेट ॲक्टचे ३७२ अन्वये, श्री दिदार अहमद मोहम्मद याकूब उर्फ दिदार अहमद फारूकी मयत दि. ०२/१०/२०२३ रा. कामठी जि. नागपूर यांचे सक्सेशन सर्टीफिकेट मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांनी दिनांक २३/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व सबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारसान नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला श्री दिदार अहमद मोहम्मद याकूब उर्फ दिदारअहमद फारूकी मयत दि. ०२/१०/२०२३ रा. कामठी जि. नागपूर यांचे वारसान सर्टिफिकेट मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/११/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

# दुपारनंतर मतदान केंद्रांवर गर्दी वाढली

## बेसा, वेळा, बहादूरा, हुडकेश्वरमध्ये अनेक ठिकाणी ७० टक्क्यांहून अधिक मतदान







■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २१ :

बेसा, पिपळा, बेलतरोडी, घोगली, शहराच्या सीमेला लागून असलेले हे संकुल नगर पंचायत बेसा अंतर्गत येते. या संकुलातील 30 बूथवर काही ठिकाणी 55 टक्के तर काही ठिकाणी 70 टक्क्यांहून अधिक मतदान झाले. या संकुलातील पिपळा, बेलतरोडी, बालपांडे महाविद्यालय या बुथवर दुपारी दोन वाजेपर्यंत मतदारांची गर्दी दिसून येत असल्याने अनेकांनी उत्साहात मतदान केल्याचे नगर पंचायत बेसा प्रशासक भारत नंदनवार यांनी सांगितले. नंतर गर्दी कमी होऊ लागली.

बहादुरा नगर पंचायत अंतर्गत बहादुरा येथे 7 बुथ, खरबी येथे 16 बूथ आणि गोंही सोम येथे 7 बूथ होते. सुमारे 30 हजार मतदारांची नावे यादीत असतानाही केवळ 80 टक्के मतदान झाल्याची माहिती बहादुरा नगर पंचायतीचे प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे यांनी दिली. दुपारी 12 नंतर मतदारांची संख्या वाढू लागल्याने शांत वातावरणात सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्याचे प्रशासक राजेंद्र चिखलखुंडे यांनी सांगितले. असे हुडकेश्वर खुर्दचे माजी सरपंच कमलाकर शेंडे यांनी सांगितलेसर्वच भागात शांततेत मतदान झाले.

ग्रामपंचायत बेला हरी अंतर्गत 2, गोताडपांजरी 2 आणि शंकरपूर येथे 2 असे एकूण 6 बूथवर सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदान झाले होते, गेल्या निवडणुकीत हा आकडा 65 होता, तो आता एक पुरुष झाला आहे प्रत्येक बूथवर एक महिला पोलीस कर्मचाऱ्यांसह एक महिला दिसली.

त्यामुळे त्यांना मतदान केंद्राच्या 100 मीटरच्या आत फोटो काढण्यास पोलिसांनी मनाई केली. पिपळाचे माजी सरपंच नरेश भोयर म्हणाले की, मतदारांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली असून, हुडकेश्वरमध्ये दुपारी 4 नंतर मतदान करा, असे सांगण्यात येत असल्याने मतदारांची गर्दी कमी होती दृश्यमान आणि मतदान प्रक्रिया परिसरात शांततेत पार पडली.

बुधवार 4 रोजी खुर्द किरणापूर, कान्हळगाव आणि धामणा येथे 1618 मतदारांच्या विरोधात 77 मते पडल्याने काही जण मतदानावर येऊ शकले नाहीत.

# मेयोत आणखी वाढणार ४१ एमएसएफ जवान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने (मेयो) सुरक्षा अधिक वाढवण्यासाठी वाढीव सुरक्षा रक्षकांची मागणी केली असून महाराष्ट्र सुरक्षाफोर्स' च्या (एमएसएफ ) आणखी ४१ जवानांच्या तैनातीस प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. मेयो व एमएसएफ' यांच्यात लवकरच सामंजस्य करार होईल.

मेयो'त सुरक्षा रक्षकांची संख्या १४० होईल. नागपुरातील सर्वात पहिला दवाखाना असलेले मेयो रुग्णालय सर्वसामान्यांचे आशास्थान आहे. २४ तास रुग्ण व नातेवाइकांची वर्दळ असते. मुख्य प्रवेशद्वारालगत रेल्वे स्थानक असल्याने वर्दळ आणखी वाढली आहे. मेयोची सुरक्षा ह्यमहाराष्ट्र सुरक्षा फोर्स' चे ६८ जवान व मॅस्को कंपनीचे ३१, असे एकूण ९९ सुरक्षा रक्षक सांभाळत आहेत. एका पाळीत जवळपास ३३ सुरक्षा रक्षक तैनात असले तरी मुख्य प्रवेशद्वारासह वार्ड, रुग्णालय , महाविद्यालय, वसतिगृहे व कार्यालयाचा विस्तीर्ण परिसर सांभाळणे कठीण जात आहे.

याची दखल घेत अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी वाढीव सुरक्षा रक्षकाची मागणी सरकारकडे केली होती. त्यानुसार एमएसएफ' ह्या ४१ जवानांना प्रशासकीय मंजुरी मिळाली. तातडीने जवान उपलब्ध होण्यासाठी मेयो प्रशासनाने सुरक्षा ठेव डिपॉझिट, एक महिन्याचे अग्रिम जमा केले. लवकरच ह्यएमएसएफ' सोबत सामंजस्य करार होणार आहे. मेयोच्या सुरक्षेसाठी ४१ नवे एमएसएफ जवान उपलब्ध होतील.

१०० नवे सीसीटीव्ही कॅमेरे रुग्णालय परिसरात लावण्यात आले. संपूर्ण परिसरात प्रकाश राहील, या दृष्टीने आवश्यक तिथे विजेचे दिवे बसविण्यात आले आहेत. रुग्णालयात नातेवाईकांची गर्दी होऊ नये यासाठी प्रवेश पत्र दिले जात आहेत. संपूर्ण सुरक्षेचा विचार करून व्यवस्था केली जात असल्याचे वैद्यकीय उपअधीक्षक व सुरक्षा प्रमुख डॉ. सागर पांडे यांनी सांगितले. विद्यार्थी, डॉक्टर, परिचारिका व कर्मचाड्ढयांचा सुरक्षेसाठी ह्यइमर्जन्सी कॉल' येताच त्याचा अलर्ट सर्व सुरक्षा रक्षकांना जाईल. काही मिनिटांत ते घटनास्थळी धाव घेतील. याची रंगीत तालीमही झाली आहे.

# सोन्याच्या दरात वाढ



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

सोन्याच्या दरात मागील काही महिन्यांपासून सातत्याने बदल होण्याचा क्रम कायम आहे. दिवाळीच्या दरम्यान हे दर उच्चांकावर होते. परंतु त्यानंतर हळू- हळू दरात घसरण हऊन ते ७५ हजार रुपये प्रति दहा ग्रामहून खाली घसरले. आता पून्हा सोन्याच्या दरात वाढ होऊन मोठे बदल होतांना दिसत आहे.

नागपुरसह राज्यातील अनेक भागात दिवाळीत सोन्याचे दर उच्चांकीवर असतांनाही ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात दागिन्यांची खरेदी केली. नागपुरातील सराफा बाजारत धनत्रयोदशीला (२९ ऑक्टोबर) बाजार उघडल्यावर सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार २०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार ७०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार ८०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार ५०० रुपये होते. हे दर लक्ष्मीपूजनाला (१ नोव्हेंबर) वाढून २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार ४०० रुपयेपर्यंत गेले.

नागपुरात १८ नोव्हेंबरला २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७५ हजार १०० रुपये, २२ कॅरेटसाठी ६९ हजार ८०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५८ हजार ६०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४८ हजार ८०० रुपये असे नोंदवले गेले. हे दर गुरूवारी (२१ नोव्हेंबर) २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७६ हजार ८०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७१ हजार ४०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५९ हजार ९०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४९ हजार ९०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे नागपुरात १८ नोव्हेंबरच्या तुलनेत २१ नोव्हेंबरला २४ कॅरेटमध्ये १ हजार ७०० रुपये, २२ कॅरेटमध्ये १ हजार ६०० रुपये, १८ कॅरेटमध्ये १ हजार ३०० रुपये, १४ कॅरेटमध्ये १ हजार १०० रुपये प्रति दहा ग्राम अशी वाढ नोंदवण्यात आली आहे. दरम्यान भविष्यात सोन्याच्या दरात आणखी मोठी वाढ होण्याची शक्यता नागपुरातील सराफा व्यवसायिकांकडून वर्तवली जात आहे.

# २० लाखांच्या दागिन्यांवर हातसाफ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

चोरांनी दिवसाढवळ्या घरफोडी करून 20 लाख रुपयांच्या दागिन्यांवर हातसाफ केला. ही घटना अजनी पोलिस ठाण्यांतर्गत मानेवाडा रिंगरोडवर घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे ही संपूर्ण घटना केवळ 10 मिनिटात घडली. पोलिसांनी भारती विरेंद्र डोंगरे (37) रा. पीपीपी टॉवर, मानेवाडा रिंगरोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भारती गृहिणी आहे तर त्यांचे पती विरेंद्र शेती करतात. डोंगरे कुटुंब मुळचे धामणगाव रेल्वे अमरावती येथील रहिवासी आहे. गत 7 नोव्हेंबर रोजी विरेंद्र शेतीच्या कामाने धामणगावला गेले होते. घरी भारती आणि त्यांची मुलेच होती. शनिवारी रात्री भारती घराला कुलूप लावून मुलांसह माहेरी मनीषनगर येथे गेल्या होत्या. रविवारी सायंकाळी घरी परतल्या असता दाराचे कुलूप तुटलेले होते. त्यांनी आत जाऊन पाहिले असता बेडरूममधील सर्व सामान विखूरलेले पडून होते. पतीलाही घरी चोरी झाल्याची माहिती दिली. कपाटातून 26 तोळे सोन्याचे दागिने, जवळपास 800 ग्रॅम चांदीचे दागिने आणि रोख 50 हजार रुपये चोरी झाले होते. तत्काळ घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. अजनी पोलिस घटनास्थळी पोहोचले.

# २.३८ लाखांच्या मालावर हातसाफ

**नागपूर :** कार्यक्रमानिमित्त बाहेर गेलेल्या कुटुंबाचे घरफोडून अज्ञात आरोपीने 2 लाख 38 हजार रुपयांच्या मालावर हातसाफ केला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी गणपती श्रीराम डायरे (52) रा. जयदुर्गानगर, भांडेवाडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 16 नोव्हेंबरच्या सायंकाळी डायरे कुटुंबासह घराला कुलूप लावून कार्यक्रमासाठी उमरेड येथे गेले होते.

या दरम्यान अज्ञात आरोपीने दाराची टिचकनी आणि कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील रोख 30 हजार आणि सोन्याचे दागिने असा एकूण 2,38,000 रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. डायरे कुटुंब उमरेडवरून घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पुढील तपास सुरू आहे.

# राज्यभरातील कारागृहात तब्बल ७९ टक्के कच्चे कैदी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

राज्यभरातील कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात आले असून यामध्ये तब्बल ७९ टक्के कच्चे कैदी (न्यायाधीन कैदी) आहेत. या कैद्यांविरोधातील खटले विविध न्यायालयात प्रलंबित आहेत. उर्वरित २१ टक्के कैदी गुन्ह्यात दोषी आढळल्यामुळे शिक्षा भोगत आहेत.

ठाणे आणि येरवडा कारागृहात सर्वाधिक कच्चे कैदी आहेत. कच्च्या कैद्यांमध्ये मुंबई तिसऱ्या तर नागपूर कारागृहाचा सहावा क्रमांक लागतो. कच्च्या कैद्यांच्या मोठ्या संख्येमुळे शासनावर आर्थिक भार वाढत आहे.

राज्यभरात ६० कारागृहे असून त्यामध्ये तब्बल ४० हजार ९०० वर कैदी आहेत. यामध्ये दोषसिद्धी म्हणजेच शिक्षाधीन कैदी आणि कच्चे कैद्यांचा समावेश आहे. यामध्ये न्यायालयाने शिक्षा सुनावली असे ७ हजार ७०० कैदी आहेत. त्यात ७ हजार ७० पुरुष तर २४५ महिला आहेत. तसेच राज्यात जवळपास ३३ हजार ३०० वर कच्चे कैदी आहेत. त्यात ३१ हजार ७०० पुरुष तर १३४२ महिला आहेत. या कैद्यांसोबतच १५ तृतीयपंथीसुद्धा कच्चे कैदी म्हणून बंदिस्त आहेत.

शिक्षाधीन कैद्यांकडून कारागृह प्रशासन विविध कामे करवून घेते. त्यांच्या वागणुकीबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करून शिक्षेत माफी देता येते. तसेच शिक्षाधीन कैद्यांना कारागृहातून शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येते.

कच्च्या कैद्यांबाबत याच्या अगदी उलट चित्र आहे. त्यांच्यावर शासनाचा खूप खर्च होतो. कच्च्या कैद्यांची विविध न्यायालयात प्रकरणे सुरू असतात. त्यांना न्यायालयात वेळेवर उपस्थित करणे, त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करणे आणि पोलीस वाहनांची व्यवस्था करणे, इत्यादी कामाचा भारही शासनाला सहन करावा लागतो.

विविध न्यायालयात खटले प्रलंबित असल्यामुळे राज्यभरातील कारागृहात जवळपास ७९ टक्के कच्चे कैदी ठेवण्यात आले आहेत. त्यांना घरगुती वापरायच्या कपड्यात कारागृहात ठेवल्या जाते. त्यांना कोणतेही शारीरिक काम देण्यात येत नाही.

त्यांना शिक्षण, शिक्षेत सूट यासह अन्य सुविधा देण्यात येत नाहीत. कारागृहात कच्च्या कैद्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, असे राज्य कारागृह विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर यांनी सांगितले.













नागपूर : मतदार म्हणुन नोंदणी झाल्यानंतर आयुष्यात पहिल्यांदाच मतदान करण्याचा आनंद काही औरच असतो. नागपूर येथे अशाच तरुण-तरणींनी पहिल्यांदा मतदान करण्यासाठी केंद्रावर मोठी गर्दी केली होती. त्यांच्या चेह-यावरचा आनंद ओसंडुन वाहत होता. दरम्यान ईव्हीएम मशीन सुरक्षित ठेवलेल्या ठिकाणी पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे.